आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

सोमवार, १ जानेवारी २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १३८

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६




जीवेत शरदः शतम्


● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) MONDAY 1 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-138 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-8+12 ● PRICE-05















आधुनिक केसरी

**प्रा. डॉ. प्रभू गोरे, मुख्य संपादक**

भारतात पहिल्यांदाच बीएसएनएलच्या सहकार्याने एऑन प्लेच्या प्लॅटफॉर्मवर माहिती आणि मनोरंजनाचा खजाना बरोबरच सर्व भाषेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, डिजीटल मिडीया एका क्लिकवर आणण्याचा प्रयोग यशस्वी करून तरूणांसाठी नव्या डिजीटल रोजगाराचे दालन खुले केले. तर महाराष्ट्रासह तीन राज्यात पंचवीस हजारापेक्षा जास्त सदस्य संख्या असलेल्या संघटनेला विविध उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक चेहरा दिला. पारंपारिक आर्थिक धोरण बदलून वृत्तपत्रांनी उत्पादन खर्चावर आधारीत विक्री किंमत ठेवावी आणि केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रूपयाची सूट द्यावी यासाठी राज्यात जनजागृती करत पत्रकारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी लढा उभारला. याची दखल घेवून एबीपी माझा वृत्तवाहिनीने महाराष्ट्राचे अनमोल रत्न या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मान केला आहे. तर लोकमत मिडीया ग्रुपने आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवार्ड दुबई येथे प्रदान करून दोन्ही माध्यम समुहांनी वसंत मुंडे यांचा कार्याचा गौरव केला.

# नव्या परंपरांचे निर्माते...!

परळी वैजनाथ तालुक्यातील लाडझरी येथुन शिक्षणासाठी अंबाजोगाईत आलेल्या वसंत मुंडे यांनी शालेय जीवनातच रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना एका पत्रकाराच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला. महाविद्यालयात असतानाच विभागीय वृत्तपत्रात काम करण्याची संधी मिळाली. तेव्हा ऊसतोड मजुरांबरोबर जावून त्यांच्या समस्यांवर प्रदिर्घ लेखमाला लिहिली आणि चळवळीतील कार्यकर्त्यांचे लक्ष वेधले घेतले. याच मालिकेवर त्यांना समर्थन संस्थेने शिष्यवृत्तीही जाहिर केली. मुंडे यांना कमी वयातच राज्यस्तरावरील दैनिकात संधी मिळाली आणि त्यांच्या लेखणीचा दबदबा राज्यभर निर्माण झाला. बीड जिल्ह्यातील राजकारण, समाजकारणाचे वेगळेपण नेमकेपणाने हेरून मुंडे यांनी सातत्याने मांडले. चांगल्या विषय भरभरून लिहिले. दुष्काळ व नापीकी मुळे काही वर्षांपूर्वीपासून शेतकरी आत्महत्यांचा विषय चर्चेत असतो. मात्र काही शेतकरी मात्र हतबल न होता परिस्थितीला हारवून उपलब्ध साधनांमधून नवीन प्रयोग यशस्वी करता. अशा शेतकऱ्यांच्या यशोगाथा मांडल्या, आणि शब्द शिवार पुस्तक शब्दबध्द केल. यातुन परिस्थितीत झगडणाऱ्या शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी,समाजातील नकारात्मक भावना कमी व्हावी त्यामागचा उद्देश. पुस्तकाच्या प्रस्तावनेतच वसंत मुंडे यांच्या लेखणीचे कौतुक करताना हिवरे बाजारचे सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री श्री.पोपटराव पवार लिहितात - अनेक नवनवीन प्रयोगांची दखल श्री.वसंत मुंडे ह्यांनी घेतली आहे. नवीन तंत्रज्ञान आपण स्वीकारावं, असं शेतकऱ्यांना वाटू लागल्याचं चांगलं चित्र त्यांनी मांडलं आहे. हे बदल टिपणं, असे प्रयोग करणाऱ्यांना प्रोत्साहन देणं, ही आश्वासक पत्रकारिता म्हणता येईल. समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांच्या अडचणींचे काय? यावर कोणी बोलण्यास तयार नसते. वृत्तपत्रांचे व्यवस्थापन आणि कर्मचारी कोणत्या परिस्थितीला तोंडे देऊन काम करतात, पत्रकारांना मिळणारा मान सन्मान त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण शकतो का? माध्यमांची वाढत्या संख्येमुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांचे काही प्रश्न आहेत ही जाणीवच कोणी करून घेत नाही. हे लक्षात घेवून आपले प्रश्न आपण मांडायला हवेत या भूमिकेतून वसंत मुंडे यांनी संघटनेच्या व्यासपीठावरुन वृत्तपत्र आणि पत्रकारांचे प्रश्न मांडायला सुरूवात केली. सामान्यांचे प्रश्न मांडणाऱ्या माध्यमांचे उघडपणे पहिल्यांदाच प्रश्न मांडले जावू लागल्याने वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर पत्रकारांचे मजबूत संघटन उभा राहिले. महाराष्ट्रासह तीन राज्यात संघटनेचे पंचवीस हजाराहून अधिक सभासद निर्माण झाले. आपले प्रश्न कोणीतरी पोडतिडकीने मांडतो आहे हे लक्षात घेवून वृत्तपत्र व इतर माध्यमातील ज्येष्टांनीही मुंडेंच्या नेतृत्वाला पाठबळ दिले. संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा स्विकारल्यानंतर मुंडेंनी राज्यभरात वृत्तपत्राचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर स्वतंत्र सहा विभागीय अधिवेशने घेवून जनजागृती केली. माध्यमात काम करणाऱ्यांना आर्थिक पातळीवर सक्षम आणि उचित सन्मान मिळाला पाहिजे. वृत्तपत्रांनी पारंपारिक आर्थिक धोरण बदलून उत्पादन खर्चावर आधारीत वृत्तपत्राची विक्री किंमत ठरवावी असा आग्रह धरला. परिणामी राज्यभरातील चारशेपेक्षा अधिक वृत्तपत्रांनी आपल्या किमती दुप्पट करण्याचा निर्णय घेतला. तर सरकारने कर्मचाऱ्यांना पाच दिवसाचा आठवडा करून दोन सुट्ट्या दिल्या आहेत. वृत्तपत्र मात्र वर्षातून केवळ पाच ते सहाच वेळा सुट्या घेतात.कर्मचाऱ्यांचीही हिच परिस्थिती. सद्यस्थितीत माहितीची अनेक माध्यमे उपलब्ध झाल्यामुळे वृत्तपत्रांनीही आता आठवड्याला एक सुट्टी घेण्याची कल्पना मांडून यातील आर्थिक गणित आणि होणारा फायदाही मांडला. याचे काही वृत्तपत्रांनी स्वागत केले. तर वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना केंद्र सरकारने आयकरात वार्षिक पाच हजार रूपयाची सुट द्यावी असा प्रस्तावही त्यांनी दिला आहे. राज्य सरकारने राज्यातील ग्रामपंचायतींना वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी दहा हजार रूपयाची तरतूद करावी ही मागणीही त्यांनी लावून धरली आहे. वृत्तपत्र क्षेत्राला आर्थिक पातळीवर आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांचा प्रयत्न देशपातळीवर चर्चेत आहे. कोरोनाच्या काळात पत्रकारांसाठी राज्यभर मदत कक्ष सुरू करून काही कोटी रूपयांच्या जमा केलेल्या जिवनावश्यक वस्तू गरजुंपर्यंत पोहोचविण्याचे काम केले.संघटनेच्या रूग्णवाहिका प्रशासनाकडे दिल्या. रक्तदान शिबीरे घेवून एका दिवसात 1600 पिशव्या रक्त संकलीत केले. नैसर्गिक आपत्तीत लोकसहभागातून आपदग्रस्तांना मदत उभा केली. विविध सामाजिक उपक्रम राबवून संघटनेला सामाजिक चेहरा दिला आहे. शासनाच्या अधिस्विकृती पत्रिका समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना वसंत मुंडे यांनी हे पद मिरवण्यासाठी नाही तर पत्रकारांना न्याय देण्यासाठी आहे हे कामातून दाखवून दिले. विभागातल्या सर्व जिल्ह्यामध्ये पत्रकारांबरोबर खुली चर्चा घेतली आणि अधिस्विकृती पत्रिका मिळण्यासाठीच्या अडचणीही समजून घेत कोटा पध्दत बंद करून तालुका पातळीवरील पत्रकारांना अधिस्विकृती देण्याचा निर्णय घेतला. ज्येष्ट पत्रकारांना त्यांच्या घरी जावून अधिस्विकृती पत्रिका देण्याचा निर्णय राज्यभर नावाजला गेला. मुद्रीत माध्यमात काम करताना बदलत्या काळानुसार डिजीटल क्रांतीमुळे या क्षेत्रात आता प्रयोग केला पाहिजे हे लक्षात घेवून मुंडे यांनी मागील तीन वर्षाच्या अथक परिश्रमातून भारतात पहिल्यांदाच बीएसएनएलच्या सहकार्याने एऑन प्लेच्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर सर्व भाषेतील वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल्स, डिजीटल मिडीया एका क्लिकवर आणला आहे. माहिती आणि मनोरंजनाबरोबरच या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून तरूणांना डिजीटल रोजगाराची नवी संधीही उपलब्ध केली आहे. डिजिटल बाजारपेठ अनेक नवीन संधी निर्माण करत असल्याने या क्षेत्रात ही वसंत मुंडे यांनी नवा प्रयोग करून आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली आहे. राज्यव्यापी पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष, गावपातळीपासून शहरापर्यंत संघटनेचे व्यापक जाळे निर्माण करताना राज्यभर त्यांनी अनेक संस्था आणि माणसे जोडली, उभी केली त्यामुळे त्यांचा राज्यभर मोठा चाहता वर्ग आहे. लोकशाहीतील प्रमुख घटक असलेल्या वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि त्याला बळकटी आणण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न, बदलत्या काळानुसार डिजीटल क्रांतीत एऑन प्लेची निर्मिती, या त्यांच्या सततच्या कामाकडे माध्यमांचे आणि सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घेतले नाही तर नवलच! वृत्तपत्रात शक्यतो इतर संस्थेमधील व्यक्तीचा कामाचा गौरव करण्याची परंपरा नाही. मात्र लोकमता मिडीया ग्रुपने आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवार्ड देऊन दुबईत वसंत मुंडेंचा सन्मान केला. तर महाराष्ट्रातील आघाडीची एबीपी माझा वृत्तवाहिनीने यावर्षी मानाच्या महाराष्ट्राचे अनमोल रत्न या पुरस्कारासाठी निवड झाली. या दोन्ही नामांकीत माध्यमसमूहांनी पुरस्काराच्या माध्यमातून श्री. वसंत मुंडेंच्या कार्याचा गौरव केला आहे. पत्रकारितेच्या प्रदीर्घ वाटचालीत श्री.वसंत मुंडे यांनी आपल्या व्यवसायाला आणि व्यवसायातील सहकाऱ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी उभा केलेला लढा आणि निडरपणे सामान्यांचे प्रश्न मांडताना घेतलेली भूमिकेने विश्वासार्हता निर्माण केली आहे. अशा या लढवय्या पत्रकार कार्यकर्त्याला वाढदिवसाच्या मनःपूर्वक सदिच्छा!



AEONPLAY

**मांडणी व सजावट**
**अतुल खंडगावकर**

# माध्यमांचे अर्थकारण नव्याने मांडणारे नेतृत्व

आधुनिक केसरी



बीड हा केवळ ऊसतोड कामगारांचा किंवा बेरोजगारांचा जिल्हा नाही; तर तो नेतृत्व करणाऱ्यांचा देखील जिल्हा आहे. इथल्या मातीत नेतृत्वाची बिजं जन्मजात असतात की काय असं वाटतं. 'अभ्यासोनि प्रकटावे' हा वसा घेऊन पुढे जाणाऱ्यांची संख्या कमी का असेना, पण ती निश्चित आहे. तसेच बीड पत्रकारांचादेखील जिल्हा आहे. इथे भरपूर पत्रकार आहेत - रोजगार शोधू पाहणारे, न्यायाची तडफ असलेले आणि नाव कमावू पाहणारे. या सगळ्यांची लढाई आधी स्वतःशी आणि नंतर व्यवस्थेशी आहे. हे लढे एकेकाळी कसे एकाकी बिनसूत्री होते. या लढ्यांना एका साधारण वीस वर्षांपूर्वी आलेले वसंत मुंडे वसंत मुंडे यांनी सूत्रात बांधलं. पत्रकारितेत यांचं नाव आज राज्यभर पोहोचलं आहे. त्याला कारण पत्रकारांचे प्रश्न आणि ते सोडवण्याची कला! 'कला' हा शब्द यासाठी की, नुसती तडफ असून चालत नाही नुसता वेळ देऊनदेखील भागत नाही. प्रश्नांची जाण निर्माण करुन ते सोडवून घेण्यासाठी एक हातोटी माणसाच्या अंगी असावी लागते. ती मुंडेंमध्ये आहे. तुमचं 'बेसिक' पक्कं असेल तर छोटछोटे उपायदेखील मोठे परिमाणकारक ठरू शकतात, हे आता त्यांनी सिद्ध केलंय. एक वेळ राजकीय संघटन तितकंसं त्रासदायक नसेल इतकं पत्रकारांचं असतं. कारण पत्रकार नेहमी प्रश्न उपस्थित करण्याच्या आणि बोट दाखवण्याच्या भूमिकेत असतात.

**प्रश्न जाणून लढ्याची आखणी**

वसंत मुंडे यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून जिल्हाध्यक्षपदापासून काम केलं. पुढे मराठवाडा अध्यक्ष, राज्य कार्याध्यक्ष; आणि आता प्रदेशाध्यक्ष. शिवाय राज्य शासनाच्या अधिस्वीकृती समितीचे ते विभागीय अध्यक्ष आहेत. या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न त्यांना उमजले आणि लढा सुरू झाला. पत्रकारांचं मानसिक स्थैर्य ते आर्थिक सुबकता यासाठीचा त्यांचा लढा यशाच्या वाटेवर आहे. तेही राज्यातील अग्रगण्य दैनिक लोकसत्तामध्ये काम करत असताना.

पत्रकारांना प्रश्न असतात, दैनिकांच्याही समस्या असू शकतात किंवा एकूणच पत्रकारितेमध्ये अस्थैर्य वगैरे असू शकते; यावर विश्वास न बसणारा अलीकडचा काळ. त्यामुळे लढा, न्याय, अन्याय, प्रश्न, मागणी... हे फक्त बातमीतच वापरायचे शब्द, असा समज झालेला. इतरांचं सोडा पण पत्रकारांचंही तसंच! दिव्याखाली अंधार असावा अगदी तसं. परंतु 'पत्रकारांचेही प्रश्न आहेत आणि ते सोडवले पाहिजेत' हे ठणकावून जर कुणी सांगितलं असेल, तर ते वसंत मुंडेंनी! स्वतः उपाशी असणारा दुसऱ्याचं काय भलं करेल? हे साधं-सोपं गणित! पण ते कुणाला वळत नव्हतं. अन्यायाच्या छायेत जगणारा दुसऱ्याला न्याय देऊ शकेल काय? त्याचे प्रयत्न खरंच प्रामाणिक असतील काय? हा खरा प्रश्न विचारण्याची धमक मुंडेंमध्ये आहे. आज परिस्थिती बदलत आहे. पत्रकार, छोटी दैनिकं, मीडिया हाऊसेस जागरुक होत आहेत. पत्रकारितेच्या अर्थकारणाचं रुतलेलं चाक गती घेण्याच्या बेतात आहे. वसंत मुंडेंचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत ते नक्की फळाला येतील. **सोबतीला घेऊन चालणारे सक्षम नेतृत्व :** प्रत्येक क्षेत्रात संघटना असतात. पुढारपण करणारे असतात. राज्यशास्त्राच्या निकषानुसार नेतृत्वाचा एक पाय संघटनेत आणि दुसरा प्रगतीच्या दिशेने उंचावलेला पाहिजे. तरच ती संघटना, तो समाज प्रगती साधू शकतो. दोन्ही पाय समाजात वा संघटनेत असून चालत नाही. किंवा दोन्ही पाय विकासाच्या दिशेने जाणारेही चालत नाहीत. सोबत घेऊन चालणं, ही संकल्पना सक्षम नेतृत्वाचं दायित्व सांगणारी आहे. वसंत मुंडे यांचं नेतृत्व हे असंच निपुण आहे. त्यामुळेच ते छोट्या दैनिकातल्या पत्रकारांचे प्रश्न घेऊन मुंबई-दिल्लीच्या वाऱ्या करीत असतात. पत्रकारांचे प्रश्न असतात तरी काय? अपुरं मानधन, कामाच्या वेळा निश्चित नसणं, जेवणाच्या वेळा निश्चित नसणं, आरोग्याच्या सुरक्षेची कसलीच हमी नाही आणि पुरेशी सुटीही नाही, कुटुंबासाठी पैसेही नाही आणि वेळही नाही. अशी ही वेठबिगारी! अशा कात्रीत सापडलेल्या पत्रकारांसाठी काय करता येईल; यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न बघून त्यांच्यातलं प्रयोगशील नेतृत्व अधोरेखित होतं. अधिस्वीकृती समितीचं विभागीय अध्यक्षपद आल्यानंतर मुंडे यांनी एक प्रयोग केला, खुल्या चर्चेचा. पत्रकारितेच्या इतिहासात असा प्रयोग यापूर्वी कुणीही केलेला नव्हता. राज्यात अनेक शहरात जाऊन त्यांनी तिथल्या पत्रकारांशी थेट संवाद साधला. तुमचे प्रश्न काय आहेत? अधिस्वीकृती पत्रिका मिळवण्यासाठी कुठल्या अडचणी आहेत वा कुठले जाचक नियम आहेत? पत्रकारांना अधिस्वीकृती सहजपणे कशी मिळेल आणि त्यातून जास्तीत जास्त फायदे कसे मिळवून देता येतील, यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. त्यात त्यांना यशही आले. त्यांच्या कार्यकाळात ज्येष्ठ पत्रकारांना अधिकाधिक अधिस्वीकृती पत्रिका मिळाल्या. महत्वाचं म्हणजे अधिस्वीकृती पत्रिकेसाठी दैनिकांचा कोटा वाढवून घेण्यात मुंडेंनी मोलाचं योगदान दिलं. त्यामुळे तालुकास्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांना आणि मुख्यालयात काम करणाऱ्या पत्रकारांचा अतिरिक्त 'अधिस्वीकृती' मिळाल्या. अर्थात हे सगळं साध्य झालं ते प्रश्न समजून घेतल्याने. त्यामुळे मराठवाड्यातील आणि राज्यातील पत्रकार मुंडेंच्या नेतृत्वावर अढळ आहेत.

**अर्थकारण सावरणारी ब्लू-प्रिंट**

मुंडेंनी पत्रकारांसाठी काम केलं म्हणजे नेमकं काय केलं, हे खऱ्या अर्थाने समजून घ्यायचं असेल तर त्यांनी मांडलेलं 'अर्थकारण' किंवा 'अर्थधोरण' समजून घ्यावं लागेल. तेव्हा खऱ्या अर्थाने मुंडेंची ब्लू-प्रिंट समजून घ्यायला मदत होईल. सोशल मीडिया आणि डिजिटल पत्रकारिता यामुळे छोटी दैनिकं डबघाईला आलेली. त्यात दोन वर्षं पडलेलं कोरोना सावट. त्यामुळे संपूर्ण माध्यमविश्वावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. मीडिया हाऊसेसनी जराही विधिनिषेध न बाळगता कर्मचारी कपात केली. छोटी दैनिकं तर पुरती कोलमडली. मानधनावर काम करणारा जिल्हा आणि तालुका पत्रकार कमालीचा बेचैन झाला. अशा परिस्थितीत वसंत मुंडे गप्प कसे राहतील? लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून विविध पत्रकारोपयोगी उपक्रम राबविणं सुरू झालं. पत्रकारांना धीर मिळाला. पण माध्यमविश्वाला उभं करण्यासाठी कायमचा उपाय आवश्यक होता. मुंडेंनी साधारण २०२०-२१मध्ये दैनिकांच्या किंमती वाढवण्यासंबंधी नवा विचार मांडला. धक्कादायक होतं हे. सगळ्यांनी नजरा टवकारल्या, भिवया उंचावल्या. किंमती वाढवणं कसं शक्य होईल?, लोक पेपर विकत घेतील काय? त्यातून असं काय साध्य होईल? असे प्रश्न समोर येऊ लागले. या काळात त्यांनी भेटीगाठी आणि संवादावर भर दिला. आपलं म्हणणं सोपं करुन सांगितलं. ते पटवून देण्यासाठी तासनतास बोलत राहिले. बाजारपेठेत प्रत्येक उत्पादनाचं स्वतःचं एक मूल्य असतं. ते ठरवण्याचे अधिकार त्या उत्पादकाला असतात. त्यासाठीचा कच्चा माल, मनुष्यबळ, वीज, वाहतूक, वितरण, हा सगळा खर्च गृहीत धरून मग उत्पादनाचं मूल्य ठरवावं लागतं. हेच बाजाराचं गणित असतं. पण वृत्तपत्रक्षेत्र याबाबतीत गाफील होतं. स्वमूल्याची जाणीव माध्यमांना नव्हती खरी. चार पानी दैनिकाच्या एका अंकाचा खर्च वीस ते तीस रुपये आहे, आठ पानी दैनिकाचा खर्च पन्नास-साठ रुपयांच्या घरात आहे. मग दैनिकाचं मूल्य दोन-पाच रुपयेच का, हा तो बिनीचा प्रश्न. वसंत मुंडेंनी तो ठासून बिंबवला! 'हळू हळू किंमती वाढवा, दैनिकाचा खर्च भागला तर आर्थिक साक्षरता येईल' असं बेरजेचं गणित मांडायला सुरुवात केली. त्यात ते यशस्वीदेखील झाले. राज्यात जवळपास दीडशे ते दोनशे दैनिकांनी किंमती वाढवण्याचा निर्णय घेतला आणि वाढवल्यादेखील. विशेष म्हणजे कुठल्याच दैनिकाच्या खपावर विपरित परिणाम झालेला नाही. कुणाचा अंक कमी झाला नाही की कुण्या वाचकाने साधी तक्रारही केली नाही. अगदी बिनबोभाटपणे दैनिकं सक्षम होऊ लागली.



**संजय व्यापारी**
**7743918559**

# नव्या क्रांतीची बीजे रोवणारा पत्रकारांचा नेता

आधुनिक केसरी

सोशल मिडीयाच्या आगमनानंतर पत्रकारिता व्यापक झाली आणि पत्रकार छोटे समजले जाउ लागले. त्यांच्यावरील हल्ले, गैरसोयी, प्रश्न यावर सारेच गप्प असताना आपणच आपला आवाज व्हावा. या जिद्दीने पेटलेले व्यक्तीमत्व म्हणजे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे होय. पत्रकारांचे संघटन करुन नव्या क्रांतीची बिजे रोवली. प्रश्न सरकार दप्तरी मांडले आणि ते सोडविण्यासाठी उभे राहिले. जगाचे प्रश्न वेशीला टांगणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नाला वेशीवर टांगण्यासाठी कुणीतरी हवं, या ध्येयाने त्यांनी पत्रकार संघटनेला मजबूत करण्याचं काम केले. खरं तर योगायोगाने वसंत मुंडे हे पत्रकारीतेत आले. रोजगार हमीवर कामावर असलेल्या मजूरांना त्यांचे हक्काचे पैसे मिळवून देण्याकरीता त्यांनी प्रयत्न केले. त्यातून त्यांचा पत्रकारीतेकडे ओढा वाढला. पत्रकारीता करताना त्यांनी उसतोड कामगारांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. त्यांच्यासोबत राहून त्यांचे दुःख, प्रश्न, त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेतल्या. पत्रकारीता करीत असतानाच त्यांनी संघटनेच्या कामात लक्ष घातलं. 2015 साली ते औरंगाबाद विभाग पत्रकारीता अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष झाले. अधिस्विकृती मिळविण्यासाठी पत्रकारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते याची जाणीव त्यांना होती. अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी अधिस्विकृतीसाठी खुली चर्चा पहिल्यांदा घेतली. पत्रकारांना अधिस्विकृती कार्ड देण्यासाठीच्या अडचणी त्यांनी दूर केल्या. ही प्रकिया सुटसुटीत होण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा सुरु केला. दरम्यान संघटनेच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांचे प्रश्न उचलून धरले. पत्रकार अख्ख्या जगाचे प्रश्न सर्वांसमोर मांडतो. परंतु स्वतःचे प्रश्न मांडण्यात कमी पडतो. पत्रकारांवर दुर्दैवाने कठिण प्रसंग आला तर त्याच्यापाठीमागे कुणीच उभारत नाही ही वस्तुस्थिती आहे. पत्रकारांना योग्य पध्दतीने आरोग्य सेवा मिळाव्यात, म्हाडाच्या माध्यमातून घरे मिळावीत यासाठी वसंत मुंडे हे नेहमी प्रयत्न करताना दिसतात. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य मराठी संघाचे प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर पत्रकारांचे प्रश्न त्यांनी आकमकपणे मांडले. प्रसंगी रस्त्यावर येण्याची तयारी दर्शविली. सध्याच्या बदललेल्या काळात पत्रकारीताही बदलत चालली आहे. परंतु पत्रकारांचे प्रश्न मात्र तसेच आहेत. सरकार सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा विचार करते. पत्रकार हा देखील त्यातला एक घटक आहे. परंतु सरकार पत्रकार या घटकाचा विचारच करत नाही. सरकार समाजातील सर्व घटकांना घरे देण्यासाठी प्रयत्न करते. परंतु पत्रकारांकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. म्हाडाच्या माध्यमातून पत्रकारांना घरे देण्याचा प्रस्ताव पुढे आहे. हाच पॅटर्न तालुका पातळीपर्यंत कसा नेता येईल यासाठी मुंडे प्रयत्न करीत आहेत. पत्रकारांच्या सुरक्षा कायदयाबाबतही त्यांनी वेळोवेळी आवाज उठवलाय. पत्रकार हल्ला विरोधी कायदा पारित करण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. पत्रकारांनी संघटीत होवून आपल्या मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याची गरज असल्याचं मुंडे नेहमी सांगतात. पत्रकारीता करीत असतानाच त्यांनी आपला मित्र परिवारही चांगला सांभाळला आहे. राज्यातील अनेक नेत्यांची त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना लाख लाख शुभेच्छा.



**मनिष केत**
जिल्हाध्यक्ष सोलापूर,
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ.

# सकारात्मक पत्रकारितेचा वसा



वृत्तपत्रे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखली जातात. वृत्तपत्र म्हटले की, पत्रकार डोळयासमोर उभा राहतो. त्यातही काही पत्रकार आपल्या लेखन कौशल्यामुळे कायमच स्मरणात राहतात. यापैकी एक माझे मित्र वसंतराव मुंडे त्यांना मी गेल्या तीस वर्षापासून ओळखतो. अजातशत्रू, निश्चयी पत्रकार असलेल्या तरावांची लेखनशैली शिष्टयपूर्ण आहे. कोणत्याही घटनेवर नेमकेपणाने भाष्य करणे ही त्यांची खासीयत. प्रसंगानुरुप आपल्या लेखणीद्वारे मवाळ तसेच जहालपणे टीका करुन समोरच्याच्या अवगूणांवर प्रकाश टाकण्यात त्यांचा हातखंडा आहे. चौर लिखाण करणाया मोजक्या पत्रकारांमध्ये वसंतरावांचा समावेश होतो.



वसंतराव तटस्थपणे समाजासमोर बातमीच्या माध्यमातून सत्य मांडतात असा माझा अनुभव आहे. सामाजिक, धार्मिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रांची त्यांना माहिती असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. या गुणांमुळे त्यांनी जिज्ञासू पत्रकार म्हणूनही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

पत्रकार संघटनेच्या माध्यमातून त्यांनी आपले वेगळेपण जपत, पत्रकार, प्रतिनिधी, वृत्तपत्र वितरक, कर्मचारी, संपादक यांच्या समस्यांना वाचा ेडली आहे. या माध्यमातून त्यांनी न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. तसेच राज्यकर्ते, अधिकारी व पत्रकार यांच्यात योग्य समन्वय साधून त्यांनी संघटनात्मक कामे मोठ्या प्रमाणात मार्गी लावली याचा मी साक्षीदार आहे. मी मंत्रालयात असताना वसंतराव यायचे.सातत्याने माझ्याशी पत्रकारांच्या समस्या बद्दल चर्चा करायचे. पुढे त्यांना अधिस्वीकृती विभागीय समितीवर काम करण्याची मोठी संधी मिळाली आणि त्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांचे काही प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले. याखेरीज केंद्र शासनाकडेही तेथील मंत्री महोदयांच्या मा\त त्यांचा पाठपुरावांना पत्रकारांच्या कल्याण कामासाठी सुरू असतोच. दैनिक मराठवाडा साथी, दैनिक विवेकसिंधू व इतर वृत्तपत्रांमधून त्यांनी आपली पत्रकारितेची सुरुवात केली. कष्ट आणि प्रचंड मेहनत करण्याची त्यांची नेहमीच तयारी असते. यामुळे त्यांनी संकटावर नेहमीच मात केली असून बीडसारख्या ग्रामीण भागातून येऊन आपल्या कार्यकर्तृत्वाने राज्यस्तरीय पातळीवर आपल्या कार्याचा मोठा ठसा त्यांनी उमटविला आहे.हे खास वैशिष्ट्य... पूर्वी कसलीही ओळख नसताना त्यांनी लोकसत्तेच्या माध्यमातून माझ्या कलागुणांना वाव देणारी एक मोठी बातमी लावली. त्या दिवशी मला त्या दिवशी मला त्यांच्यातील खया पत्रकार मित्राची साक्ष पटली. अशा व्यासंगी पत्रकार मित्रास निरोगी व दिर्घायुष्य लाभो अशा माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.



**डॉ. राजू पाटोदकर**
**9892108365**



# माध्यमांच्या दुनियेतील मदतनीस...

आधुनिक केसरी

राजकीय पक्षांमध्ये विभागणी करून घेतलेल्या, स्वयंभू माध्यमे बाळगणाऱ्या पत्रकारांच्या या युगात पत्रकारितेची व्याख्याच बदलून गेली आहे. घटना-घडामोडींची माहिती आणि त्यांचा मतितार्थ समाजाला समजावून सांगणारा पत्रकार दुर्मिळ होत चालला आहे. प्रस्थापित माध्यमांकडेही संशयाने पाहिले जात असताना पत्रकारांनी आपली विश्वासार्हता कशी जपावी, असा प्रश्न सर्वांना पडणे स्वाभाविक आहे. मात्र, अशा विपरित परिस्थितीतही प्रामाणिक, कष्टाळू पत्रकारांची मोट बांधून त्यांच्यासाठी जे काही करता येईल, ते करण्याची धडपड दाखवून देणारे मोजके पत्रकार महाराष्ट्रात दिसतात. वसंत मुंडे हे त्यांपैकी एक. बीडसारख्या उपेक्षित जिल्ह्यातून एका राज्य पातळीवरील दैनिकात पत्रकारिता करण्याची संधी मिळालेले मुंडे यांनी आधी स्थानिक पातळीवर, नंतर विभागीय आणि आता राज्य पातळीवर पत्रकारांच्या कल्याणासाठी संघटना (महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई) चालविणारे कार्यकर्ते अशी ओळख मिळविली आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत शहरे, तालुके आणि खेड्यांमध्ये राहून पत्रकारिता करीत असलेले कित्येक पत्रकार त्यांनी या चळवळीत जोडून घेतले. पत्रकारांच्या मानधनाचा प्रश्न असो, त्यांच्या निवासस्थानांचा प्रश्न असो की निवृत्तिवेतनाचा. मंत्रालय पातळीवर संघर्ष करून असे जटिल प्रशन सोडविण्याची धडपड ते करीत आले आहेत. कोविड साथीच्या काळात अनेक पत्रकारांना प्राण गमवावे लागले आणि त्यांचे संसार उघड्यावर आले. अशा पत्रकारांच्या कुटुंबांना शासकीय (आणि बिगरशासकीयसुद्धा) मदत मिळवून देण्यातही ते सक्रिय राहिले आहेत. म्हणूनच राज्याच्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये त्यांचे नाव घेतले जाते.



धनंजय लांबे
संपादक दै. पुढारी
9511251300

पत्रकारांच्या अनेक संघटना आहेत. त्या विभागनिहाय सक्रिय आहेत आणि त्यादेखील असे विविध प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न आपापल्या परीने करीत आहेत, मात्र त्याबरोबरच छोट्या वृत्तपत्रांचे प्रश्नही समजून घेण्याचे आणि ते सोडविण्याचे प्रयत्न करण्याचा समंजसपणा मुंडे यांनी दाखविला आहे. काही महिन्यांपूर्वी त्यांनी राज्यभरात विभागीय पातळीवर छोट्या वृत्तपत्रांची आर्थिक घडी कशी मजबूत करता येईल, या दुर्लक्षित विषयावर परिषदा आयोजित केल्या. त्यात जाणकारांनी मांडलेल्या सूचनांचा समग्र अहवाल तयार करून तो सरकारला सादर केला. त्याचा परिणाम म्हणून जाहिरातींच्या दराची पुनर्रचना करण्यात आली. हल्ली सर्वच वृत्तपत्रांवर कमीत कमी मनुष्यबळाच्या साह्याने अंक काढण्याची वेळ आली आहे. कोविड साथीच्या काळात प्रत्येक वृत्तपत्राचा खप घटला आहे आणि त्यामुळे निर्माण झालेली आर्थिक चणचण हे त्यामागील मुख्य कारण. खप पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न प्रत्येक वृत्तपत्र आपापल्या क्षमतेनुसार करीत आहे. उद्योग-धंद्यांनी जाहिरातींसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमांना प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे छापील माध्यमांसमोर आर्थिक गणित जुळविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. शिवाय, इंटरनेटवर अवलंबून असलेल्या माध्यमांचीही गर्दी झाली आहे. अशा वातावरणात 'सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट' या नैसर्गिक नियमानुसार अनेक वृत्तपत्रांची छपाई बंद झाली, तर काहींना आपला व्याप कमी करावा लागला. या सर्व गोष्टींचा परिणाम पत्रकारांच्याही वेतनावर, मानधनावर, रोजगारावर झाला. जोपर्यंत वृत्तपत्रे स्वयंपूर्ण, आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाहीत, तोपर्यंत पत्रकारांना 'अच्छे दिन' येणार नाहीत, हे ओळखून वसंत मुंडे यांनी छोट्या वृत्तपत्रांचे महत्त्व शासनदरबारी पटवून देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. अनेक शहरांमधील पत्रकारांच्या गृहनिर्माण संस्थांसाठी ते प्रयत्नशील आहेत. यासह पत्रकारांनी केवळ छापील माध्यमांवर विसंबून न राहता, आधुनिक माध्यमांकडे वळावे, इंटरनेट युगातील सर्व कौशल्ये आत्मसात करावी, यावरही ते भर देत आले आहेत. आपले काम, पत्रकारिता सांभाळून राज्यभरातील पत्रकारांच्या हितासाठी वर्षानुवर्षे सक्रिय राहणे हेदेखील एक आव्हानच आहे. ते पेलण्याची प्रेरणा त्यांना मिळत राहो आणि त्यांच्या या कार्याला यश मिळो, हीच वाढदिवसानिमित्त सदिच्छा !

# दिलखुलास मैत्रीचे अनोखे दर्शन

आधुनिक केसरी

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे यांनी बीडच्या दौयावर असताना आपले अनेक वर्षांपासुनचे मित्र पत्रकार वसंत मुंडे यांच्या कार्यालयात जाऊन सदिच्छा भेट घेतली. सुरुवातीच्या काळातील आठवणींना ऊजाळा देत मुक्त संवाद साधत मैफिलच रंगली. यावेळी मुंडे, कराड, सावे यांच्यातील दिलखुलास मैत्री अनुभवायला आली. सार्वजनिक जीवनात अलिकडे टोकदार होत असलेल्या भूमिका आणि राजकारणात विशिष्ट उंचीवर पोहोचल्यानंतर वैयक्तिक मैत्री जपण्याचे प्रकार अपवादानेच पहायला मिळतात ते दिसुन आले.

बीड येथे शनिवार दि. 10 डिसेंबर रोजी एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे आले होते. कार्यक्रमानंतर दोघांनीही महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. मागील वीस वर्षात वसंत मुंडे यांनी पत्रकारीतेच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने वेगळा ठसा उमटवला आहे. तर डॉ.कराड, सावे यांनीही राजकीय क्षेत्रात विशिष्ट उंची मिळवली आहे. कराड आणि सावे यांची राजकीय कारकीर्द आणि मुंडेंची पत्रकारीतेची सुरुवात समकालीनच. वसंत मुंडे बीडमधून पत्रकारीता करत असले तरी संघटनेच्या माध्यमातून त्यांचा सुरुवातीलाच संपर्क राहिला आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख या दिग्गजांसह राज्यभरातील पत्रकारीता क्षेत्रातीलही नामवंतांशी संपर्क आल्यानंतर त्यांनी पत्रकारीतेच्या पुढे जाऊन मैत्रीचा घट्ट धागा निर्माण केल्याचे अनेकदा दिसुन आले. योगायोगाने कराड, सावे आणि मुंडे आपआपल्या क्षेत्रात एका विशिष्ट उंचीवर पोहोचले असले तरी तिघांनीही वैयक्तिक मैत्रीवर कुठेही परिणाम होऊ न देता आपले संबंध कायम ठेवल्याचे बीडकरांना अनुभवायला आले. सार्वजनिक जीवनात राजकीय भूमिका अलीकडे टोकदार होत असल्याने वैयक्तिक पातळीवरील सहजता कमी झाल्याचे चित्र सर्वत्र दिसते. तर राजकीय क्षेत्रात विशिष्ट उंची गाठल्यानंतर नेत्यांचे दौरे, भरगच्च कार्यक्रमामुळे घाई गडबडीत पार पडतात. त्यामुळे इच्छा असुनही वैयक्तिक मैत्री असणार्यांना भेटणे आणि ऋणानुबंध जोपासणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत मुंडे, कराड आणि सावे यांच्या भेटीने सार्वजनिक भूमिकांच्या पलीकडच्या दिलखुलास मैत्रीचे उत्कट दर्शन झाले. वृत्तपत्रांचे अर्थकारण या विषयावर वसंत मुंडे यांनी केलेल्या चिकित्सक अभ्यासाची पुस्तिका केंद्रीय अर्थ राज्यमंत्री कराड व सहकार मंत्री सावे यांना देण्यात आली. त्यावेळी दोघांनीही पत्रकारीता क्षेत्रातील वसंत मुंडे यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी संपादक संतोष मानूरकर उपस्थित होते.



# वृत्तपत्रांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवणारे वसंत मुंडे

पत्रकारिता म्हणजे अतिसामान्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम. हेच समजून घेत वसंत मुंडे नावाचा तरुण पत्रकारितेत आला आणि सामान्यांचे प्रश्न मांडता मांडता वृत्तपत्रांचे आणि पत्रकारांचेही प्रश्न मांडू लागला! वाचून आश्चर्य वाटेल, पण वसंत मुंडे यांनी वयाच्या सोळाव्या वर्षांपासूनच भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला. विद्यार्थिदशेत असताना गावालगत रोजगार हमी योजनेत सामाजिक वनीकरणाच्या कामावरील मजुरांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन आर्थिक फसवणूक करण्यात आली. 'लोकमत'चे अंबाजोगाईतील तत्कालीन पत्रकार मोटेगावकर सरांना हा भ्रष्टाचार सांगून त्यांनी मजुरांना न्याय मिळवून दिला. पुढे पत्रकारितेचं औपचारिक शिक्षण घेतल्यानंतर दैनिक लोकसत्तामध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती मिळाली आणि वसंत मुंडे तेथे वीस वर्षांपासून कार्यरत आहेत. लेखणीतून वंचित, उपेक्षित वर्गासाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांना आर्थिक मदत उभी करून दिली. शेती, शिक्षण या विषयांवर सकारात्मक व ऊर्जा निर्माण करणारे विपुल लिखाण केले. त्यातूनच तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी बोलावलेल्या निवडक पन्नास पत्रकारांच्या राष्ट्रीय परिषदेतही मुंडे यांची निवड झाली होती. ऊसतोडणी मजुरांबरोबर राहून लिहिलेल्या लेखमालिकेला 'समर्थ'ने शिष्यवृत्ती दिली. याशिवाय अनेक पुरस्कारही मिळाले. उत्तम संवाद व बिनधास्तपणे मोजक्या शब्दांत विषय मांडण्याची हातोटी हे त्यांचे वैशिष्ट्य.

**प्रश्न मांडले, मार्ग सांगितले :** लेखणीतून सामान्यांचे प्रश्न मांडताना सहकारी पत्रकारांच्या प्रश्नांचीही जाणीव झाली. समाजाचे प्रश्न मांडणाऱ्यांच्या प्रश्नांकडे बऱ्याचदा डोळेझाक होते. राज्यकर्ते आणि समाजालाही पत्रकारांना काही प्रश्न असतील असे वाटत नाही. हे जाणवल्यानंतर मुंडे यांनी पत्रकार संघाच्या माध्यमातून वार्ताहर आणि संपादकांचे प्रश्न मांडत ते सोडवण्याचे मार्गही सांगितले. औरंगाबाद विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर मुंडे यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदाच प्रत्येक जिल्ह्यात शासकीय समितीची पत्रकारांबरोबर थेट खुली चर्चा उपक्रम राबवला. त्यातूनच जाचक अटी शिथिल होऊन अधिस्वीकृती पत्रिका मिळण्याचा मार्ग सोपा झाला. शहरापासून गावपातळीपर्यंतच्या पत्रकारांचे प्रश्न मांडून ते सोडवले जात असल्याने याची दखल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली.

**संपादक नसलेला पहिला अध्यक्ष :** वसंत मुंडे यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या (मुंबई) राज्य अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. संपादक नसताना पत्रकाराची अध्यक्षपदी निवड होण्याची संघटनेच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ होय! तब्बल तेरा हजारांपेक्षा अधिक पत्रकार सदस्य असलेल्या संघटनेचे कामकाज अधिक लोकाभिमुख करण्यासाठी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यावर त्यांनी आधुनिक पद्धतीचा वापर केला.



**आत्मनिर्भर होण्यासाठी संपादकांची गोलमेज परिषद :** समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अडचणीत असलेला वृत्तपत्र-व्यवसाय कोरोनामुळे अधिकच डबघाईला आला. जाहिरातींचा ओघ कमी झाल्याने साखळी वृत्तपत्रासह छोट्याही वृत्तपत्रांचे आर्थिक गणित बिघडले. उत्पादन खर्चाच्या तीस टक्के किंमतीत घरपोहोच वृत्तपत्र देण्याचे पारंपरिक धोरण; त्यात कोरोना, ऑनलाईन वाचनाची सवय यामुळे आर्थिक संकट ओढावले आणि काम करणाऱ्या पत्रकारांना पगारकपातीला सामोरे जावे लागले. अनेकांना तर नोकरीही गमवावी लागली. अशा परिस्थितीत वसंत मुंडे यांनी औरंगाबादमध्ये संपादकांची पहिली गोलमेज परिषद घेऊन वृत्तपत्रांनी आर्थिक आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले. मागील वीस वर्षांत पेट्रोल ३० रुपयांवरुन १२० रुपये, तर डिझेल १६ रुपयांवरुन ९७ रुपये लिटर झाले. एक रुपयाचा चहा दहा रुपये झाला. छपाईचा कागद २५ रुपयांवरुन १०० रुपयांपर्यंत झाला. सरकारने जाहिरातीवर व इतर वस्तूंवर ५ टक्के जीएसटी आणि इतर कर लावल्याने किंमती पाच पटीने वाढल्या. असे सर्व वस्तूंचे भाव वाढत असताना वर्तमानपत्रांच्या किमतीत मात्र एक पटीनेही वाढ झाली नाही. आजही ८ ते १२ पानांची वर्तमानपत्रेही दोन ते पाच रुपयांत घरपोहोच दिली जातात. त्यामुळे उत्पादन खर्चाच्या २० टक्के विक्री किंमत असणारे हे जगातील एकमेव उत्पादन आहे. जाहिराती कमी झाल्याने तोटा भरुन काढण्याचा अशक्य असल्याने विक्री किंमत वाढवण्याचे गणित वृतपत्रांचे मालक, संपादक, वितरक यांना पटवून दिले. लोकपत्रकार भागवत तावरे यांनी शब्दबद्ध केलेली वसंत मुंडे यांची 'वृत्तपत्रांचे अर्थकारण' या विषयावरील मुलाखत राज्यातील तब्बल तीनशेपेक्षा अधिक वृत्तपत्रांनी प्रकाशित करून समर्थन केले. परिणामी राज्यातील तीनशे पेक्षा अधिक दैनिकांनी विक्री किंमत वाढवली. एका पत्रकाराची एकच मुलाखत विविध दैनिकांत प्रसिद्ध होण्याची ही पहिलीच वेळ असल्याने मुंडेंचे नेतृत्व सर्वमान्य झाले.

**साप्ताहिक सुट्टी घ्या, फायद्यात राहा! :** वृत्तपत्र व्यवसायाला ऊर्जित करण्यासाठी केंद्र सरकारने करदात्यांना वृत्तपत्र खरेदीवर उत्पन्नकरात वार्षिक पाच हजारांची सवलत द्यावी, अशी मागणी श्री. वसंत मुंडे यांनी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्याकडे केली असून याबाबत सकारात्मक विचार चालू आहे. पूर्वी माहितीची इतर माध्यमे नसल्याने वृत्तपत्रे नियमित काढण्याचेही धोरण रूढ झाले. मात्र आता इतर साधने उपलब्ध असल्यामुळे वृत्तपत्रांनीही रविवारची सुट्टी घेतली पाहिजे. सरकारनेही आता पाच दिवसाचा आठवडा केला आहे. खासगी उद्योगातही सुट्टी असते. हा विचार मांडताना सुट्टीतून वृत्तपत्रांच्या आर्थिक फायद्याचे आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे गणित त्यांनी मांडले. याचा काही दैनिकांनी स्वीकार केल्याने त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. नव्या उपक्रमांतून आश्वासक वातावरण वर्षानुवर्ष सरकारकडे मागण्या करून काय साध्य झाले? याचा विचार करुन माध्यमातील लोकांनीच सक्षम झाले पाहिजे अशी भूमिका वसंत मुंडे यांनी केवळ मांडली नाही तर पत्रकार संघाच्या माध्यमातून नवीन पायंडे सुरू केले. कोरोना काळात २८ जिल्ह्यांतील पत्रकारांशी वेबसंवाद करुन लोकसहभागातून पत्रकारांना किराणा साहित्यासह मदत मिळवून दिली. पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या. एकाच दिवशी राज्यभर 'रक्तदान' शिबिर घेऊन चौदाशे बॅग रक्त संकलन करुन देण्याचा विक्रम नोंदवला. समाज माध्यमाच्या मोहजालातही संवाद कायम राहावा यासाठी औरंगाबाद विभागीय कार्यालयात वार्तालाप तर बीड येथे मासिक व्याख्यानमाला सुरू केली. परिणामी राज्यभरात संघाच्या माध्यमातून वार्तालाप घेतले जात आहेत. दिवाळीत स्नेहमीलन, तर रमजान ईदमीलन कार्यक्रम घेऊन संघाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. मृत पत्रकारांच्या कुटुंबीयांना लोकसहभागातून मदत उपलब्ध करून देण्याबरोबरच वैद्यकीय उपचारांसाठीही संघाच्या माध्यमातून मदतीचा हात दिला. अशा नवीन उपक्रमातून संघटना आणि वृत्तपत्रक्षेत्रात नव्या परंपरा पुढे आणत या क्षेत्राला सक्षम करण्यासाठी मुंडे यांनी आश्वासक वातावरण निर्माण केले आहे.

**पाच विभागीय अधिवेशने :** वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर छत्रपती संभाजीनगर येथे संपादकांची गोलमेज परिषद, लातूर, ठाणे, नागपूर, जळगाव येथे विभागीय अधिवेशने घेऊन वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर जागृतीची चळवळच उभी केली आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर स्वतंत्र अधिवेशने होणे हे पहिल्यांदाच झाले.



**मनोज पाटणी**
**संपादक लाभवार्ता**
**9881136166**

# समन्वय साधणारा नेता

आधुनिक केसरी

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून वसंतराव मुंडे सरांनी धुरा सांभाळली आणि पत्रकार, संपादक, मालक यांच्यात नवीन चैतन्य निर्माण झाले. महाराष्ट्रतील वृत्तपत्रसृष्टीतील पत्रकारसह, संपादक, मालक यांचा समन्वय साधून सर्वांनी सोबत घेऊन संघटनेची ताकद वाढविण्यासाठी मदत प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे सरांच्या नावाने होत आहे. कोरोना काळात सर्व जग ठप्प असताना कोणीही समोर येत नसताना अशा वेळी पत्रकारांच्या समस्या व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून समजून घेऊन त्यावर उपाय काढून समस्या सोडविण्याचे काम मुंडेसरांनी केले आहे. याच परिस्थितीमध्ये अडचणीत असलेले वृत्तपत्रतील, संपादक, मालक यांच्यावर कोरोना नावाच्या महामारीचा एवढा मोठा परिणाम झाला होता की, काहींना आपला जीव गमवावा लागला, तर काहींना नोकरी सोडावी लागली याच काळात सरांच्या मार्गदर्शनाखाली संपादक, मालक यांची पहिली गोलमेज परिषद औरंगाबाद येथे घेण्यात आली. वृत्तपत्रचा भाव वाढविण्याचा निर्णय घेतला आणि त्यात तब्बल १८५ वृत्तपत्रांनी ही बाब आजरोजी आमलात आणली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या स्वभाव हा शांत, सरळ, सर्वांना सोबत घेऊन जाणे असा असून पत्रकारिता क्षेत्रातील अस्सल सोनं आहे आणि सर स्वतः पत्रकार असल्याने पत्रकाराचा समस्या त्या तीव्रतेने समजू शकतात त्या बाबत सरांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभत असते. संघटनेचे काम करत असताना अनेक गोष्टी सरांच्या सानिध्यातुन समजून घ्यायला मिळाल्यात. पत्रकार संघटनेत आपल्या संघात नसलेल्या पत्रकारांनावर एकदा प्रसंग आला तरीही तो आपला सदस्य नसला तरी ही पत्रकार या नात्याने त्यासाठी लागणारी मदत करण्यासाठी सरांचा नेहमी प्रयत्न असतो, नव्हे त्याचे अनेक प्रत्यय आम्ही जालनेकरांनी अनुभवलेले सुद्धा आहेत.



**दिगंबर गुजर**
**9049413333**

# पत्रकारांचा पाठीराखा

सायकलवरून पेपर वाटप ते राज्यातील सर्वात मोठ्या पत्रकार संघाचा अध्यक्ष ही वसंतराव मुंडे यांची वाटचाल जेवढी संघर्षाची तेवढीच प्रेरणादायी आहे... शालेय जीवनात आईसोबत रोजगार हमीची कामे करत असताना ठेकेदार व अधिकार्याने मजूरांवर अन्याय केला... या अन्यायाची वर्तमानपत्रात एक बातमी आली अन् मजूरांना पुर्ण मोबदला मिळाला... या एका छोट्या प्रसंगातून वसंतराव मुंडे यांच्या मनात प्रत्रकारीतेचे आकर्षण निर्माण झाले... बालपणापासून अन्यायाची चीड अन् त्या विरोधात बंडखोरी करण्याचा पिंड असलेल्या वसंतराव मुंडे यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून लोकांवरील अन्याय दुर होत असेल तर मला पत्रकारच बनायचे आहे, असे म्हणत सुरूवातीच्या काळात सायकलवरून पेपर वाटण्याचे काम केले... ध्येय समोर ठेवून जिद्दीने ते त्याकाळी ग्रामीण पत्रकार बनले... एकेकाळी रोजगार हमीची कामे करणारा, पेपर वाटणारा हा युवक पुढे चालून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा अध्यक्ष बनेल, पुणे, मुंबईच नव्हे तर देशाच्या राजधानी दिल्लीतही सदस्य असलेल्या पत्रकारांच्या चळवळीचा नेता बनेल असे कोणाला स्वप्नातही वाटले नव्हते... मात्र टोकाचा संघर्ष, प्रचंड परिश्रम, सिध्दहस्त लेखणी, सकारात्मक दृष्टीकोण, सर्वपक्षीय नेत्यांशी ऋणानुबंध आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याच्या गुणामुळे वसंतराव मुंडे हे राज्यभरातील पत्रकारांचे नेतृत्व करत आहेत... पाठीराखा बनून पत्रकारांचे सार्वजनिक आणि व्यक्तीक असे हजारो प्रश्न त्यांनी सोडवले आहेत... खरेतर बीड जिल्ह्यातील अतिशय छोट्या गावातून, सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले वसंतराव मुंडे हे पुणे, मुंबईसह राज्यातील पत्रकारांचे नेतृत्व करतात, ही गोष्टच मुळात बीड जिल्ह्याचा सन्मान वाढवणारी आहे...

खरेतर मुंडे नावातच एक जादू आहे... कितीही संघर्ष वाट्याला आला तरी संकटाच्या छताडावर पाय देऊन उभे राहण्याची क्षमता या नावात आहे... विशेष म्हणजे लोकनेते गोपीनाथराव यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी असलेल्या परळीचे मुंडे आहेत... असा हा रक्तातच संघर्ष कण्याचा गुण अन् अन्यायाविरूध्द प्रचंड चिडीचा पिंड असलेला व्यक्ती काय करू शकतो, हे वसंतराव मुंडे यांनी दाखवून दिले आहे.. मुंडे नाव तर आहेच मात्र वसंतराव हे प्रचंड अभ्यासू, ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांची जाण अन् तळमळ असलेले संवेदनशिल नेतृत्व आहेत... वसंतराव मुंडे हे राज्यातील सर्वात मोठ्या पत्रकार संघाचा राज्याचा अध्यक्ष बनल्यानंतर खर्या अर्थाने ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न, त्यांच्या व्यथा, अडचणींना वाचा फुटली... छोट्या गावापासून मुंबई पर्यंतच्या पत्रकारांचे प्रश्न त्यांनी चव्हाट्यावर आणले... नुसते चव्हाट्यावरच आणले नाहीत तर मंत्रालयात, मंत्री, मुख्यमंत्र्यांच्या दालनात बसून अनेक प्रश्न त्यांनी सोडवले देखील आहेत... पत्रकार पेन्शन, पत्रकार हल्ला विरोधी कायदा, ग्रामीण पत्रकारांना अधिस्विकृती, पत्रकार कल्यान निधी असे कितीतरी प्रश्न त्यांनी राज्यकर्त्यांना धारेवर धरून मार्गी लावले आहेत... पत्रकारांच्या प्रश्नावर सोलापुर येथील एका आघाडीच्या वृत्त वाहीनीने वसंतराव मुंडे यांची घेतलेली मुलाखात राज्यभर गाजली. कारण पत्रकार सर्वांच्या प्रश्नावर बोलतात, वंचीत उपेक्षीतांचा आवाज बनण्याचे काम ते करतात. परंतू पत्रकारांच्या प्रश्नावर कोणीच बोलत नाही. पत्रकार संघाचा राज्याध्यक्ष बनल्यानंतर पहिल्यांदाच वसंतराव मुंडे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना ऐरणीवर आणले... सर्व समाज घटकांसाठी, समाजाच्या सर्व स्तरातील लोकांसाठी सरकारची कुठली ना कुठली योजना आहे. परंतू पत्रकार हा एकमेव घटक असा आहे, समाजाचा आरसा असूनही त्याच्यासाठी कोणतीच योजना नाही, हे वसंतराव मुंडे यांनी पहिल्यांदा राज्यकर्त्यांच्या लक्षात आणून दिले... सरकार सर्वांना घरे बांधून देते... प्रत्येकासाठी घरकुल योजना आहे... मग पत्रकारांसाठी ती नाही? फाटका खिसा, बीन पगारी नोकरी, रहायला घर नाही, सरकारची कोणतीच योजना नाही... या परिस्थितीत पत्रकारांनी कधीपर्यंत अपेक्षीताचे जीने जगायचे? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला... ईतिहासात पहिल्यांदाच राज्यभरातील पत्रकारांचा प्रश्न तळमळीने मांडल्यामुळे ही मुलाखत प्रचंड लोकप्रीय ठरली... ही मुलाखत आणि लोकपत्रकार भागवत तावरे यांनी घेतलेली मुलाखत राज्यातील दोनशेहून अधिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली... या नंतर विविध कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून राज्यभर दौरा करून वसंतराव मुंडे यांनी पत्रकारांचे प्रश्न जाणून घेतले... त्यांच्याशी चर्चा केली... तत्पुर्वी विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष बनल्यानंतर ग्रामीण पत्रकारांनाही अधिस्विकृती मिळाली पाहीजे यासाठी त्यांनी माहिती संचालकांना बीडमध्ये बोलावून खुली चर्चा घडवून आणली.... विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष म्हणून वसंतराव मुंडे यांनी दिलेल्या योगदानामुळे ग्रामीण भागातील शेकडो पत्रकार अधिस्विकृती धारक बनले... औरंगाबद आणि बीड येथे प्रत्येक आठवड्याला विविध क्षेत्रातील एका मान्यवराला बोलावून चर्चा सत्र त्यांनी घेतले... यातून पत्रकारांच्या मुलभूत प्रश्नांना खर्या अर्थाने वाचा फुटली.. वसंतराव मुंडे, संतोषजी मानुरकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम प्रचंड लोकप्रीय ठरला... पत्रकार संघाचा राज्याचा अध्यक्ष म्हणून वसंतराव मुंडे यांनी पत्रकारांचे प्रश्न तर मांडलेच परंतू छोट्या-मोठ्या वर्तमान पत्रांना न्याय मिळण्यासाठी त्यांनी लढा उभा केला आहे... उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमतीत विकले जाणारे वर्तमान पत्र हे जागातील एकमेव प्रोडक्शन असल्याचे संपादक बांधवांना पटवून देत, आपण आपली किंमत जो पर्यंत वाढवणार नाहीत तो पर्यंत वर्तमानपत्र आणि पत्रकारांना चांगले दिवस येणार नाहीत, हे त्यांनी राज्यभर दौरा करून तळमळीने सांगितले... त्यांनी केलेल्या या आवाहनाला अनेक संपादकांनी प्रतिसाद देत आपल्या वर्तमानपत्राची किंमत वाढवली.. सोशल मिडीयाच्या जमाण्यात घटनेच्या बातम्याला महत्व उरले नसून जे लोकांना माहीत आहे, तेच आपण सांगीतले तर लोक पेपर कशाला वाचतील? असा प्रश्न उपस्थित करून बदलत्या काळाबरोबर पत्रकारांनी देखील बदलले पाहीजे... लोकांना काय हवे? त्यांची रूची काय? हे ओळखून पत्रकारांनी अधुनिक तंत्रज्ञान शिकले पाहीजे... ज्या लोकांपर्यंत कोणतेच माध्यम जात नाही अशा लोकांपर्यंत पत्रकारांनी गेले पाहीजे... अशा मोटीवेशन स्पीचच्या माध्यमातून लोकांना आरसा दाखवणार्या पत्रकारांना देखील आरसा पाहण्याचे वसंतराव मुंडे यांनी सुचवले... मराठवाड्याला अनंत भालेराव यांच्या सारख्या कर्मयोगी पत्रकारांचा आणि मराठवाडा सारख्या निर्भीड, सामाजिक चळवळींना वाहुन घेतलेल्या वर्तमानपत्राचा वारसा आहे... बीडमध्ये स्व. मोतीरामदादा वरपे, अमर हबीब, नामदेवराव क्षीरसागर, नरेंद्रकाका कांकरीया, अशोकअप्पा देशमुख, सर्वोत्तमअण्णा गावरस्कर, सुनील क्षीसागर, गंमत भंडारी, दिलीपराव खिस्ती, शेख तय्यब, राजेंद्र होळकर, अभीमन्यू घरत या पत्रकार आणि संपादकांचा वारसा आहे... या विशाल वारशाला वसंतराव मुंडे यांनी अधिक उंचीवर नेले आहे... पत्रकारिता ही केवळ बातमी लिहिण्याएवढी मर्यादित नसते तर पत्रकार सामाजिक चळवळी उभ्या करू शकतात... विकासासाठी गावे दत्तक घेऊ शकतात... चांगली कामे करून ग्रामपंचायतींनी पुरस्कार मिळवून देऊ शकतात... निव्वळ सेवाभावी वृत्तीने काम करणार्या संस्थांना मार्गदर्शन आणि बळ देऊ शकतात... राज्यकर्त्यांना चांगल्या कामासाठी पुढाकार घ्यायला लावू शकतात... वेगळ्या विचाराच्या, वेगवेगळ्या पक्षांच्या बड्या नेत्यांना एका व्यासपीठावर आनु शकतात... सरकारला लोकोपयोगी निर्णय घ्यायला आणि चुकीचे धोरण बदलायला लावू शकतात... एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यासारख्या छोट्या आणि मागास जिल्ह्यातील पत्रकार राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पत्रकारांना पुरस्कार देऊन गौरवू शकतात.... हे वसंतराव मुंडे, संतोषजी मानुरकर यांनी दाखवून दिले आहे. यामुळेच राज्यातील पत्रकारांचे नेतृत्व करणारे वसंतराव मुंडे हे पत्रकारांचे खरे पाठीराखे आहेत, असे मला वाटते... वसंतराव मुंडे साहेब हे राज्यातील पत्रकारांचा नेता तर आहेतच मात्र मोठ्या मणाचा राजा माणूसही ते आहेत... अशा या बीडच्या पत्रकारीतेचा नावलौकीक मुंबई, दिल्लीपर्यंत घेऊन जाणार्या बसंतराव मुंडे साहेबांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा...!



**बालाजी तोंडे**
**9028108210**

# संघर्षाचा उत्कल बहर



कलम बहाद्दरांचा सरदार... खर तर लेख लिहून त्यांच्या कारकिर्दीला व कार्यआलेखाला शब्दात गु\णे म्हणजे चेष्टा ठरावी , मुळात हा लेख खुशामत वा वाहवा च्या कारणी नाही , शेतकयाच्या लेकराने मक्तेदारीचे कुंपणच नाही तर तटबंदी असलेल्या क्षेत्रात नांगर टाकावा हेच दिव्य आहे मात्र त्यावर कास्तकाराने पत्रकारितेची नांगरणी केली, खुरपणी करून यातले कचपण काढले , मातीची सेवा करत सुपीक वो व त्यातून माझ्या सारखे अनेक रोपे वापउन आणले . वापलेले टिकावे म्हणून सल्ला

मार्गदर्शन रुपी सिंचन घालणारे हे नेतृत्व म्हणजे वसंत मुंडे ,आज एका वर्षाने थोरले होते आहे . त्यांची नोंद पत्रकारांचे प्रदेश अध्यक्ष वा लोकसत्ताचे प्रतिनिधी अशी असेल मात्र मला त्या पलीकडे ते दिसले भावले आहेत .

वंसत मुंडे या नावाची मला ओळख झाली ती पत्रकारांचे प्रश्न सोडवतात , त्यांना स्थिरावताना आधार देतात आणि आदर देखील , आकाश समजलेले उमजलेले हे आमचे नेतृत्व जमिनीवर पाय कायम रोवून आहे , अत्यंत हलाखीच्या स्थितीतून त्यांनी साधलेली पदे आणि सांधलेली माणसे हे त्यांचे यश आणि संपन्नता आहे . अधिस्वीकृतीचे मराठवाडा अध्यक्ष झाल्यापासून मी त्यांनी अधिक जवळून ओळखू लागलो , भागवत तू लिहलेले एकदा परत वाचत जा हा लहान सल्ला त्यांनी मला दिला आणि मी परत वाचताना चुका उमगून मी सुधारत गेलो , तुझ काही चुकत हे न सांगता परत वाचत जा म्हणून त्यांनी साधलेली सुधारणा त्यांच्यातल्या वात्सल्य गुरूची साक्ष आहे . गेली 8 वर्षे मी आणि त्यांच्यातला स्नेह दिवसेदिवस वाढत गेला, माझ्यासाठी त्यांनी दिलेले सल्ले अडचणीच्या काळात दिलेला आधार आणि आजवर लिखाणासाठी त्यांनी दिलेला आदर त्यांच्या

थोरवीची साक्ष आहे . कधीकाळी पहाटे पेपर टाकणारे वसंत मुंडे आज महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांचे सुकानुधारी बनले आहेत, नेत्यांची सदर असो वा लेखणीचे सरदार , माणसे उभी करताना समन्वय व दुवा हे अंगभूत गुण घेऊन साहेबांनी आपला परीघ केवळ व्यापक नाही तर प्रगल्भ केला . संतोष मानूरकर सारख्या अत्यंत सटीक आणि प्रगल्भ लेखणीचे स्वामी सोबतीला घेऊन त्यांनी पत्रकारांची एक मोट बांधली आहे . मागच्या वर्षी मी त्यांची घेतलेली एक मुलाखत राजुभर गाजली , विषय क्लिष्ट होता मात्र तितकाच गरजेचा , पत्रकारितेचे अर्थार्जन हा एक जिकरीचा आणि काळीज व काळजीचा विषय , महागाई व उत्पादन मूल्य हे निकष लागू नसलेले एकमेव उत्पादन म्हणजे वर्तमानपत्र , ते घाट्यात विकून आणि जाहिरात दारांची हांजी हांजी करून आर्थिक स्थैर्य लाभणार नाही तर हक्काचे धन मिळावे यासाठी थेट अंक किमत उत्पादन मूल्यावर घेऊन जाण्याचे आवाहन पहिल्यांदा कुणी केले असेल तर वसंत मुंडे सरांनी . महाराष्ट्रात सर्वदूर पत्रकारांचे जाळे विणताना हा संघर्षाच्या सागरातील मुंडे नावाचा खलासी



भागवत तावरे
9613331111

आज लेखणीच्या टेकड्यात हिमालय आहे , तसे मुंडे या नावातच संघर्ष आहे , यान्वये त्यांच्या कारकिर्दीला संघर्षाची किनार आणि झालर नसेल तर आश्चर्य . उसतोड तोड कामगारांचा मुलगा ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यापासून ते देशाच्या अर्थमंत्र्यापोत आपली जरब

आपला वकूब सिद्ध करणारे वसंतराव मुंडे एक वर्षाने थोरले होते

आहेत , पत्रकारितेच्या रिंगणात त्यांनी निर्माण केलेल्या अनेक त्रिज्या आहेत ज्याने आठी प्रहराचा जागता पहारा सुरु आहे . कुटुंब प्रमुख म्हणून नवीन पत्रकार , या क्षेत्रातील कामगार , नव्या संपादकांना आवश्यक मार्गदर्शक आखणी रेखनी करून देताना वसंत मुंडे आम्हा पत्रकारांचे सुकानुधारी सिद्ध आहेत .

# व्रतस्थ पत्रकारितेचा महामेरू म्हणजे वसंतराव मुंडे



महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यातील पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि न्याय मिळवून देण्यासाठी एक अश्वासक चेहरा म्हणजे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघांचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. वसंतराव मुंडे, वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ जानेवारी रोजी वसंतराव मुंडे यांचा वाढदिवस.... आपलं संपूर्ण आयुष्य लेखणीच्या माध्यमातून समाजासाठी आणि पत्रकार बांधवांसाठी वेचणाऱ्या या ज्येष्ठ पत्रकाराचा खूप आदर वाटतो अशा व्रतस्थ पत्रकारांच्या आयुष्याकडं पाहिलं की, समाजासाठी पुढं सरसावणाऱ्या लेखणी आणखी धारदार व्हायला लागतात.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाला वसंतराव मुंडे सारखं नेतृत्व लाभल्याने एक नवी दिशा मिळाली.

संघर्ष माणसाला आळस, निराशा आणि नकारात्मकतेपासून दूर ठेवतो असं म्हटलं जातं,जेव्हा एखादी व्यक्ती संघर्षातून आपले ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करते तेव्हा ते अपयशी असूनही त्याला प्रेरणा देते. यामुळे माणसाची संघर्षाप्रती सहनशीलता आणि समर्पण वाढते.... अशाच संघर्षातून उभारलेलं संघर्षनायक वसंतराव मुंडे आहेत, घरोघरी जाऊन वृत्तपत्र वाटप करण्यापासून तर आज महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या पत्रकार संघटनेचे नेतृत्व करण्यापर्यंतचा हा संघर्षमय प्रवास पत्रकारांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

**पत्रकारांसाठी लढणारा माणूस :** शहरातील असो की गाव खेड्यातील, दैनिकांचा असो की साप्ताहिकाचा, आपल्या संघटनेचा असो की इतर संघटनेचा यात कुठलाही भेदभाव न करता वार्ताहर पत्रकार, संपादक, वृत्तपत्राचे मालक, छायाचित्रकार या तमाम घटकाच्या न्याय, हक्क आणि प्रश्न घेऊन शासनदरबारी लढणारा माणूस म्हणून आम्ही वसंतराव मुंडेना पाहतो. कोरोनाच्या महामारीत सारं जग ठप्प झालं असतांना पत्रकारांसाठी धडपडणारा आमचा नेता पत्रकारांच्या लहान मोठ्या अडचणी सोडवत होते. राज्यभरातील पत्रकारांना व्यक्तिगत संपर्क करून अडचणीत जाणून त्यावर मार्ग काढले, पत्रकार संघाच्या शिलेदारांना सूचना व मार्गदर्शन करून हजारो कुटुंबाना किराणा किट व जीवनावश्यक वस्तू पोहचविल्या तर महाड आणि चिपळून येथे पूरग्रस्त भागातील उध्वस्त झालेल्या परिवाराला थेट जीवनावश्यक वस्तू, किराणा, मेडिसिन पाठविण्यासाठी योजना आखली आणि पत्रकार संघाच्या माध्यमातून पोहचवली यातून वसंतराव मुंडे यांच्यातील मानवी संवेदनाचे दर्शन होते.

**वृत्तपत्रांची अर्थनीती बदलवीण्यासाठी धडपड :** वृत्तपत्र जगातील असं उत्पादन आहे की त्याच्या उत्पादन खर्चा पेक्षा कमी किमतीत विकल्या जातं आणि त्यामुळं वृत्तपत्रांची आर्थिक गणितं बिघडत चालली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेली वृत्तपत्रांची ही अर्थनीती बदलली पाहिजे ही भूमिका घेत वृत्तपत्रांच्या किंमती वाढविण्यासाठी संपादक व वृत्तपत्र मालक यांच्या 'गोलमेज परिषद' घेऊन वृत्तपत्रांची अर्थनीती बदलणे काळाची गरज असल्याचे पटवून देत वसंतराव मुंडे यांनी क्रांतीचे पाऊल उचलले आहे. वसंतराव मुंडे यांनी वृत्तपत्रांच्या आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी सांगितलेले सूत्र अनेकांना पटल्याने आज राज्यातील बऱ्याच वृत्तपत्र मालकांनी वृत्तपत्राच्या किंमती वाढविल्या आहेत.

पत्रकारांचा बुलंद आवाज, संघर्ष, आक्रमकता,लोकप्रिय नेता सौंदर्यदृष्टीने सखोल ज्ञान असणारा प्रचंड बुद्धिमता,पत्रकारितेचा अप्रतिक ठोकतळा,कधी हि न मनाने हरणारा, न खचणारा भारदस्त आवाज ,राज्यातील पत्रकारांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे असामान्य नेतृत्व म्हणून स्वाभिमानी व लढवय्या पत्रकारांची फळी उभी करणारे अशा संघर्षमय जीवन लाभलेल्या पत्रकारांच्या नेत्याला भावी वाटचालीस मोठं यश मिळाव ह्याच वाढदिवसाच्या शुभेच्छा...



प्रविण सपकाळे
संपादक - दै. नजरकैद
9021969100

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे 'सर्वमान्य नेतृत्व' : वसंतराव मुंडे

'सर्वमान्य नेतृत्व' ठरलेल्या व्यक्तींबद्दल विशेष सांगायचे वा लिहायचे म्हणजे निव्वळ औपचारिकता ठरेल मात्र महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर गोवा, कर्नाटक, गुजरात ते दिल्ली पर्यंत राज्य पत्रकार संघाचे सेनापती पदाचे काटेरी मुकूट परिधान करून सर्वमान्य नेतृत्व हे बिरूद लाभलेल्या मा. वसंत मुंडे साहेबांची पत्रकार सुष्टीच्या प्रत्येक घटकांबाबत असलेली आंतरीक तळमळ पुढयात यावी व संघटनेतील प्रत्येक घटकाने ही तळमळ अंगीकारावी हिच खऱ्या अर्थाने मा. मुंडे साहेबांना वाढदिवसाची मनस्वी शुभेच्छा ठरेल.

मा. संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनात पत्रकार संघ सांभाळण्याची सक्षमता व सहजता लाभलेल्या पहिल्या फळीतील दोन मुत्सद्धांना मी अनुभवले आहे. मा. वसंत मुंडे व मा. विश्वासराव आरोटे. कर्तृत्व व नेतृत्व याचा सहज ताळमेळ यातून अलंकारीत झालेले सर्वमान्य नेतृत्व वसंत मुंडे नामक व्यक्तिमत्व पत्रकारांना आदर्शवत ठरावेत असेच आहे.

पत्रकार संघाचे खऱ्या अर्थाने नेतृत्व करणाऱ्यांना सतत काटेरी मुकुट शिरावर घेऊन मागेपुढे करावे लागते. प्रचंड उर्जा खर्च करावी लागते कारण पत्रकारांचे, पत्रकारितेती घटकांचे प्रश्न सोडविताना पुढे पुन्हा अनेक प्रश्न उभे ठाकतात व प्रश्नांची उकल करून शासन दरबारी उत्तर सुद्धा आपणच सादर करावी लागतात. या विचित्र चक्रव्यूहातून स्वतःसोबत संपूर्ण संघाला सावरून सन्मानित करण्याचे श्रेय मा. मुंडे साहेबांना जाते व यामुळेच ते 'सर्वमान्य नेतृत्व' ठरले आहे.



राज्य पत्रकार संघात "Quantity व Quality" यांची सांगड घालण्यात प्रदेशाध्यक्ष मा. वसंत मुंडे यांचा मोठा वाटा आहे. पत्रकार सृष्टीच्या समस्या शासनस्तरावर सतत भांडून सोडवाव्या लागतात. एकीकडे शासन दरबारी भांडताना दुसरीकडे सामाजिक सहकार्य संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रमातून पदरी पाडून घेण्याचे महतकार्य मा. वसंत मुंडे साहेब यांनी केले आहे. राज्य पत्रकार संघ 365 दिवस वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमातून आपली सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. मा.वसंत मुंडे साहेबांची अभ्यासू वृत्ती, शिस्तप्रियता, कल्पकता, जिद्द मेहनत, क्षमता किंबहुना एकत्रित व्यक्तिमत्व व संघातील हजारो पदाधिकारी व सदस्यांना लाभणारे त्यांचे मार्गदर्शन हे आमचे सौभाग्य. त्यांच्या कथनी व करणीतून वृत्तपत्र सृष्टीतील प्रत्येक घटकाला ऊर्जा मिळत आहे.

'सर्वमान्य नेतृत्व' ठरलेल्या मा. वसंत मुंडे साहेबांना दीर्घकाळ वृत्तपत्र सृष्टीच्या सुरेल आयुष्या करीता दीर्घ काळ आरोग्य व आनंदायी आयुष्य लाभो हीच शुभेच्छा....!!!

प्रा. महेश पानसे

# वसंत मुंडे ते वसंतराव मुंडे!



वसंता आणि माझी ओळख तशी वसंता पत्रकारीतेत येण्यापूर्वीच! मी पत्रकारीतेत स्थिरस्थावर होवू लागलो होतो आणि वसंता पत्रकारीतेत आपले नशीब आजमवण्यासाठी धडपडत अंबाजोगाईत आला होता, तेंव्हा पासुनची! लहान मोठ्या वर्तमानपत्रात काम करुन लोकमत सारख्या तेंव्हा प्रचंड खप असलेल्या दैनिकात माझे ज्येष्ठ सहकारी कै. प्रा. भालचंद्र मोटेगावकर सरांच्या नंतर लोकमत मध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी लोकमत मध्ये काम करणे ही तशी अवघड कामगिरी होती, आपल्या सर्वांच्या सहकार्याने सलग 17 वर्षे ती मला पार पाडता आली! लोकमतचे सर्वेसर्वा आदरणीय राजेंद्र दर्डा यांनी माझ्यावर टाकलेली जबाबदारी प्रभावीपणे यशस्वी करीत असतांना त्यांनी अंबाजोगाईत मराठवाड्यात पहीले लोकमतचे उपविभागीय कार्यालय सुरु केले आणि त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. याच काळात वसंता माझ्या संपर्कात आला. दहावीची परीक्षा पास होवून महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी तो अंबाजोगाईत आला होता. वडिलांचे छत्र हरवलेले, कोरडवाहू अल्प भु धारक शेतकयांचा मुलगा. शिक्षण आणि उदरनिर्वाहा साठी लागणारे पैसे आपण स्वतः कमवावेत आणि आपले शिक्षण पुर्ण करावे ही उर्मी घेवून कामाच्या शोधात f\रणारा वसंता असाच एके दिवशी मला लोकमतच्या कार्यालयात येवून भेटला. काही काम आहे का हे विचारण्यासाठी! वसंताचा चुनचुनीतपणा आणि त्याची कोणतीही करण्याची धडपड माझ्या लक्षात आली आणि माझे मित्र ज्येष्ठ पत्रकार कै. मुश्ताक हुसेन सर यांची आणि वसंता ची मी भेट घालून दिली. मुश्ताक हुसेन सरांनी त्यावेळी मासिक शिक्षक पत्रिका सुरु केली होती. संपुर्ण मराठवाड्यात ही पत्रिका स्वतः वितरीत करणारा मुलगा त्यांना हवा होता. वसंता ने हे काम स्विकारले आणि लिलया ते सिद्ध करुन दाखवले. वसंता ने हे काम करीत असताना वृत्तपत्र वितरणातील बारकाव्यांचा अभ्यास करीत पत्रकारितेचे आपले लक्ष केंद्रित केले. पुढे दैनिक लोकपत्र मध्ये अंबाजोगाई येथील प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी बीड येथील एका वरीष्ठ पत्रकाराने माझ्याकडे विचारणा केली आणि लोकपत्र साठी मी वसंता चे सुचवले. वसंता पत्रकार झाला! कॉलेज झाले की वसंता मग माझ्याकडे यायचा. त्याकाळी बातमी मिळवण्यासाठी तिची माहिती काढण्यासाठी सतत f\ रावे लागायचे. घटनास्थळी भेटी देणे, अधिका-यांचे म्हणणे समजावून घेणे, त्यांच्या कडुन अधिकृत माहिती घेणे, वस्तुस्थिती तपासुन पहाणे, पोलीस स्टेशन, न्यायालय, रुग्णालयात घडलेल्या घटनांची माहिती कागदावर लिहून घेणे आणि नंतर कार्यालयात येवून बातमी तयार करुन बसने औरंगाबाद कार्यालया पाठवणे. या सर्व कामात वसंता माझ्या सोबत असायचा. माझ्या स्कुटरवर वसंता हा संपुर्ण तालुकाभर f\ रायचा. विविध घटनांचे टीपण, गुन्हा रजिस्टर नंबर, आरोपींचे नावे, रुग्णालयात जखमीचे, मयताची नाव, एखाद्या कार्यक्रमात पाहुण्यांची नावे, भाषणांचे तपशील दिसुन घेणे ही सर्व जबाबदारीची कामे वसंता लिलया करायचा! अंबाजोगाई जिल्हा निर्मितीच्या आंदोलनात वसंता पत्रकारांवर वाकडी नजर असलेल्या एका पोलीस निरीक्षकाच्या तावडीत सापडला, त्याने सोबतच्या एसआरपी कडुन वसंताला बेदम मारहाण केली. वसंताला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. जिल्हा निर्मिती आंदोलनात घायाळ झालेल्या वसंता चे नाव मग जिल्हाभर झाले.



सुदर्शन रापतवार
72182393333

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
सोमवार, १ जानेवारी २०२४










# वसंत मुंडे यांना उत्कृष्ट सामाजिक पत्रकारिता पुरस्कार

## दुबईत लोकमतच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**दुबई : लोकमत मीडिया ग्रुपच्या वतीने आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात दुबई येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना या वर्षीचा 'एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड' देऊन सांस्कृतिक कार्यमंत्री मा. सुधीर मुनगंटीवार, लोकमतचे प्रमुख मा. राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रासह देशभरातील विविध क्षेत्रांतील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. माध्यमक्षेत्रातून आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी निवडलेले वसंत मुंडे हे पहिले व एकमेव आहेत.**



महाराष्ट्रासह देशभरात मराठी वृत्तपत्रातील आघाडीच्या लोकमत मिडिया समूहाचा या वर्षीचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा रविवार २८ व २९ मे रोजी दुबईतील हॉटेल ग्रँड हयात येथे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, लोकमतचे प्रमुख राजेंद्र दर्डा, आघाडीचा अभिनेता स्वप्निल जोशी, अभिनेत्री नुसरत भरूचा, दुबई स्पोर्ट सिटी चे अब्दुल रहमान फलकनाथ, मसाला किंग अल हिदा ग्रुपचे धनंजय दातार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व पुरस्कारप्राप्त मान्यवर उपस्थित होते. या वेळी मराठी पत्रकारीतेत वीस वर्षांपासून कार्यरत आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे मजबूत संघटन उभे करून वृत्तपत्रांचे अर्थकारण व पत्रकारांच्या समस्या याविषयी सकारात्मक बदल करणारे, तसेच डिजिटल मिडियात, भारतातील पहिला नवीन प्रयोग करणारे व पत्रकारितेच्या माध्यमातून रचनात्मक काम उभे करणारे वसंत मुंडे यांच्या कामाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. लोकमतचा माध्यम क्षेत्रातील पुरस्कार मिळालेले वसंत मुंडे पहिले ठरले आहेत. प्रतिकूल परिस्थितीला हरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा, प्रशासकीय पातळीवर बदल घडवणाऱ्या विषयांवर त्यांनी विपुल लिखाण केले आहे. तर कोरोनात पत्रकार संघाच्या माध्यमातून सोळाशे पिशवी रक्त संकलन, ताळेबंद अडकलेल्या आणि अडचणीत सापडलेल्या पत्रकारांना विविध माध्यमातून मदत. तर आर्थिक अडचणीत सापडलेल्या वृतपत्रांनी पारंपरिक आर्थिक धोरण बदलून उत्पादन खर्चावर आधारित विक्री किंमत वाढवली पाहिजे यासाठी वृत्तपत्रांच्या अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या या विषयावर राज्यभरात सात अधिवेशने घेऊन जनजागृती केली. यातून चारशे वृत्तपत्रांनी किमती वाढवण्याचा निर्णय घेतला. सामान्य माणसाचा लोकशाहीतील आवाज असलेली वृत्तपत्रे व पत्रकारांच्या समस्या मांडण्यासाठी वसंत मुंडे यांनी कणखर भूमिका घेतली. याची दखल घेऊन या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# पत्रकार ते राज्याध्यक्ष : प्रेरणादायी प्रवास

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 मध्ये मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण प्रकाशित केले. तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये 6 जानेवारी हा दिवस मराठी पत्रकार दिन साजरा केला जातो. समाजप्रबोधनाचे सशक्त माध्यम म्हणून वृत्तपत्राची ओळख आहे. या वृत्तपत्रांमध्ये आवश्यक असणारी पत्रकारिता हे जसे शास्त्र आहे तसेच ती एक कलाही आहे. शब्दांच्या माध्यमातून मनाचा अचूक ठाव घेत वाचणायाच्या मनाला भिडणारे, प्रबोधन, ज्ञान संवर्धन व मनोरंजन करणारे लेखन हे पत्रकारितेचे खरेच गमक आहे. अशा या वृत्तपत्रामधील पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रत्यक्ष पेपर वाटपासून ते आज थेट महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या राज्याध्यक्षपदी आपले नाव कोरत, आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आपले वेगळेपण जपत, पत्रकार, प्रतिनिधी, वृत्तपत्र वितरक, कर्मचारी, संपादक यांच्या समस्यांना वाचा ोडणारे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणजेच वसंत मुंडे.



वसंत माधवराव मुंडे यांचा जन्म जानेवारी 1978मध्ये परळी तालुक्यातील लाडझरी या छोट्याशा खेड्यामध्ये झाला. घरची परिस्थिती हालाखीची. मोलमजुरी करून घर कसेबसे चालवले जात. आईसोबत अर्थार्जनासाठी वसंतजीही मोलमजुरी करत आईला मदत करत. शिवाय यासोबतच शिक्षणही चालू होते.प्राथमिक शिक्षण गावातच जिल्हा परिषदेच्या शाळेत तर माध्यमिक शिक्षण शंकर विद्यालय घाटनांदुर येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोगाई येथे श्री. योगेश्वरी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात  झाले. महाविद्यालयीन काळात ग्रंथालयात उपलब्ध असणाया विविध वृत्तपत्रांची ओळख वसंतजींना सर्वप्रथम झाली.यातूनच वृत्तपत्र विषयी वेगवेगळी जिज्ञासा,कुतूहल त्यांच्या मनामध्ये निर्माण झाले.

यादरम्यान गावाकडे आई काम करत असलेल्या रोहयो योजनेतील मानधन वाटपाची घटना घडली. या योजनेतील मानधन वाटपामध्ये अधिकायांनी घोळ करत मानधन वाटप केल्याचे वसंतजींना समजले. अनेक तक्रारी, अर्ज, विनंत्या केल्या मात्र यश आले नाही. शेवटी या सर्व वृत्ताचे रीतसर निवेदन तयार करून त्यांचे महाविद्यालयीन प्राध्यापक तथा तत्कालिन लोकमत वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणारे प्रा. भालचंद्र मोटेगावकर यांच्याकडे जाऊन सर्व हकीकत सांगितली. त्यांनी लगेच या घटनेची शहानिशा करून योग्य तो न्याय देत योग्य मानधन वाटप करण्यास भाग पाडले. स्वतः उभारलेल्या या पहिल्या न्याय लढ्यास वसंतजींना मिळालेले हे पहिले यश होते. पुढे अंबाजोगाई येथील उर्दू पत्रकार मुस्ताक हुसैन यांच्यासोबत अंबानगरीमध्ये कार्यरत असणाया पत्रकार मंडळींसोबत एकत्रित येऊन विविध विषयावर व विविध पत्रकारांची ओळख वाढत गेली. यातूनच प्रा. गाठाळ यांच्या विवेकसिंधु या वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणारे पत्रकार विजय हमिने यांचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी महाविद्यालयातील विविध घटनांची वृत्तपत्रांमधून बातमी स्वरूपात रूपरेषा देण्यास सुरुवात केली. याचकाळात अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुका सुरू झाल्या. सा. जन्मभूमीचे संपादक मोहन कराड त्यावेळी निवडणुकीसाठी उभे राहिले. त्यावेळी या साप्ताहिकांचे वाटप देखील वसंतजी यांनी केले. विविध वृत्तपत्रांमध्ये आपण लेखन करावे, ते प्रसिद्ध व्हावे यासाठी मिळेल ते काम, सर्व कष्ट, प्रचंड मेहनत करण्याची त्यांची तयारी होती. अशातच एकदा त्यांच्या गावातील शेतामध्ये अचानक लागलेल्या आगीमध्ये त्यांची व इतर गावकयांच्या शेतातील पिके जळाली. या घटनेचे सविस्तर वृत्त ज्येष्ठ पत्रकार अमर काका हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वसंतजी यांनी तयार करून ते दै. विवेकसिंधू मधून प्रसिद्ध झाले. ही वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली त्यांची पहिलीच बातमी होती. मात्र या बातमीची दखल घेत शेतातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे होऊन आर्थिक मदतही मिळाली.

अंबाजोगाई येथील तत्कालीन पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते अरुण खैरमोडे यांच्या सहवासामुळे वसंतजी यांना दै. मराठवाडा साथी प्रतिनिधी सर्वप्रथम वृत्तपत्र क्षेत्रात संधी मिळाली. वृत्तपत्र क्षेत्रात त्यांनी आपले काम सुरु केले. याच काळात त्यांचा संपर्क शिक्षक संघटनेमध्ये कार्यरत असणारे संपत्ते गुरुजी यांच्याशी आला.त्यांच्यासोबत त्यांनी मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रमंती करत शालेय शिक्षण, शैक्षणिक विचारधारा, शैक्षणिक समस्या अशा विविध गोष्टींची माहिती घेत आपली ज्ञानवृद्धी केली. पत्रकारिता क्षेत्रातील काम करत असताना नवीन नवीन गोष्टी आत्मसात करण्यासाठी ते सतत धडपडत असत. याच दरम्यान श्री योगेश्वरी महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाया भगवानराव सबनीस यांच्याकडे त्याकाळी लोकसत्ता, सकाळ हे पेपर पोस्टाने येत असत.मग वसंतजीनी हे वृत्तपत्र पाहून,वाचून त्यामध्ये प्रसिद्ध होणाया बातम्या, स्तंभलेखन, स्टोरी लेखन यांचे अत्यंत काळजीपूर्वक अध्ययन केले. त्यानुसार लिहिण्याचा प्रयत्न केला. यासोबतच ज्येष्ठ पत्रकार अमर काका हबीब, सुदर्शन रापतवार, विजय हमिने यांच्या सहवासात त्यांना अनेक गोष्टी शिकण्यास मिळाल्या.

याच दरम्यान त्यांच्या जीवनात एक अशी घटना घडली, जी त्यांच्या जीवनात, पत्रकारिता क्षेत्रात एक टर्निंग पॉइंट ठरली. अंबाजोगाई जिल्हा निर्मितीचे आंदोलन सुरू झाले होते. पत्रकार व विद्यार्थी आघाडी यांच्या माध्यमातून वसंतजी ह्या लढ्यात सहभागी झाले होते. मात्र बर्दापूर येथे पोलिस स्टेशनमधील पत्त्याच्या क्लबची बातमी वसंतजी यांनी वृत्तपत्रात प्रसिद्ध केली. यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासन हादरून गेले. तत्कालीन अधिकायावर कारवाई झाली.मात्र काहीच दिवसात जिल्हा निर्मितीचे आंदोलन चिघळले आणि अंबाजोगाई येथे कर्फ्यू लागला. या कर्फ्यूमध्ये वसंतजी अंबाजोगाई येथील बस स्टँड वर अडकले, ड्युटीवर असणारे अधिकारी यांच्या लक्षात ही गोष्ट आल्याने मागील बातमीचा राग मनात धरत त्यांनी आपल्या सहकायांसह वसंतजी यांना रस्त्यावरच अमानुषपणे मारहाण केली. ही मारहाण इतकी अमानुष होती की त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या विधानसभेत उमटले. महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री लोकनेते गोपीनाथजी मुंडे यांनी या घटनेची लक्षवेधी आयोजित करून विधानसभा तहकूब केली. पुढे मुंडे साहेबांनी या घटनेबद्दल वसंतजी यांची आस्तेवाईकपणे चौकशी करत पाठीवर कौतुकाची थापही दिली.    सन 1999 च्या अखेरीस त्यांना दै. लोकपत्रमध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती मिळाली.2000 ते 2001 या काळात त्यांनी आजपर्यंत प्राप्त केलेल्या अनुभवाचा उपयोग करून आपले वेगळेपण सिद्ध केले. ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख असणाया बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या व्यथा समजून घेण्यासाठी त्यांनी दहा दिवस ऊसतोड कामगारांसोबत राहून प्रत्यक्ष अनुभवावर आधारित ऊसतोड कामगारांच्या व्यथा चित्रित करणारी क्रमिक लेखमालिका लोकपत्रातून प्रसिद्ध केली. या पहिल्याच लेखमालिकेस समर्थन संस्था मुंबई द्वारे राज्यातील पत्रकारांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती प्राप्त झाली. सन 2002 मध्ये या शिष्यवृत्तीच्या वितरण समारंभ प्रसंगी मराठवाड्यातील पत्रकार म्हणून ऐनवेळेस व्यक्त केलेल्या मनोगताने सर्वांचे लक्ष वेधले. याप्रसंगी मंचावर उपस्थित असणारे लोकसत्ताचे तत्कालीन सहायक संपादक श्री. दिनकर रायकर यांनी वसंतजींची विशेष दखल घेत पाठीवर कौतुकाची थाप ही दिली.  दिवसेंदिवस वसंतजींचा पत्रकारिता क्षेत्रातील प्रगतीचा आलेख हा चढताच होता. पुढे दै. लोकसत्ताचे तत्कालीन सहाय्यक संपादक श्री दिनकर रायकर, आनंद आगाशे, मुकुंद संगोराम या पत्रकारितेतील दिग्गज व्यक्तींनी त्यांची दै. लोकसत्ताचे बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली. सन 2002 मध्ये त्यांची पहिली बातमी पीक पाणीया सदरामध्ये दै. लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झाली. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्राच्या माध्यमातून आजवर वसंतजी यांनी अनेक विविधांगी लेखन केलेले आहे. यामध्ये सक्सेस स्टोरी, चर्चेतले चेहरे, कृषीधन या विषयावर आधारित लेखमालिका विशेष गाजल्या.  सन 2004 मध्ये बीड जिल्हा पत्रकार संघाच्या सचिव पदी वसंतजी यांची तर अध्यक्ष म्हणून संतोष मानूरकर यांची निवड करण्यात आली. याच्या माध्यमातून त्यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. ज्येष्ठ पत्रकार स.मा. गर्गे पत्रकारिता पुरस्काराचे आयोजन दरवर्षी केले.



संतोष मानूरकर
9822797982

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख व लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब या हजरजबाबी, वक्तृत्वसंपन्न, भाषाचातुर्य व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीत आयोजित होणारा कार्यक्रम म्हणजे बीडकरांसाठी अवर्णनीय असा होता. आजतागायत दरवर्षी हा पुरस्कार अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जातो.  सन 2014 -15 पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिस्वीकृती कमिटीवर त्यांची नियुक्ती झालेली आहे. तसेच मराठवाडा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर खुली चर्चा, ज्येष्ठ पत्रकारांची अर्ज न घेता  निवड, कोटा पद्धतीमध्ये बदल अशा विविध विषयांमध्ये अमुलाग्र बदल करत आपल्या कार्याची वेगळी छाप त्यांनी पाडली. त्यांच्या कार्याची दखल घेत राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे तसेच गोविंद घोळवे यांनी त्यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी तर सन 2000 पासून राज्याध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. कोणत्याही वृत्तपत्राचे संपादक नसतानाही एक जिल्हा प्रतिनिधीपदी काम करणारा पत्रकार असूनही महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपद भूषविणारे वसंत मुंडे हे पहिले पत्रकार आहेत. हा वसंत मुंडे यांच्यासोबतच आपल्या बीड जिल्ह्याचा बहुमान आहे.  महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष या नात्याने त्यांनी वृत्तपत्र क्षेत्रात अमुलाग्र बदल केलेले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील वृत्तपत्र क्षेत्राशी निगडित व्यक्तींच्या ऑनलाईन बैठकांचे संवादांचे त्यांनी आयोजन केले. कोरोना सारख्या भयानक काळात पत्रकार,वृत्तपत्र वितरक, विक्रेते, कामगार यांचे अतोनात हाल झाले. समाजातील अधिकारी-कर्मचारी यांच्या पगार कपातीचे विस्ताराने चर्चा अनेक वृत्तपत्रांमध्ये करण्यात आले.मात्र याच वृत्तपत्रासाठी कार्यरत असणारे अनेक छोटे-मोठे पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते, वितरक, कर्मचारी यांच्या पगार कपातीची दखल मात्र कुठल्याच वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झाली नाही हे विलक्षण दुर्दैवच म्हणावे लागेल. अशा सर्व पत्रकार बांधवांसाठी, कर्मचायांसाठी एक राज्याध्यक्ष या नात्याने आपल्या संघटनेच्या माध्यमातून एक कुटुंबप्रमुख या नात्याने तीस हजारांहून अधिक बांधवांना सर्वतोपरी सहकार्य त्यांनी केले. आजच्या आधुनिक काळात जीवनातील प्रत्येक गोष्ट ही महाग होत चाललेली आहे. एक रुपयाला मिळणारा चहा दहा रुपयाला मिळतो, एक झेरॉक्स दोन रुपयाला येते. मात्र आठ ते दहा पानी वृत्तपत्र केवळ तीन ते चार रुपयाला तेही अनादिकाळापासून! या भूमिकेला एक राज्याध्यक्ष म्हणून न्याय देण्यासाठी वृत्तपत्रांची किंमत वाढवली पाहिजे ही भूमिका सर्वप्रथम त्यांनी मांडली. देशाच्या बजेटवर विस्ताराने वर्णन करणारी वृत्तपत्रे मात्र वृत्तपत्राच्या बजेटवर विस्ताराने चर्चा करत नाहीत. संपादकांनी पत्रकारांना जाहिरातदाराच्या दारातून बाहेर काढायचे असेल तर वर्तमानपत्राची विक्री किंमत वाढवावी लागेल. तर आणि  तरच जाहिरातदार संपादकाच्या दारात येईल. ही ठाम भूमिका महाराष्ट्रात सर्वप्रथम वसंत मुंडे यांनी मांडली.याचा परिणाम म्हणून आज महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांनी आपली किंमत वाढवण्यास सुरुवात केलेली आहे. वृत्तपत्राच्या किमती वाढल्यामुळे वृत्तपत्राला आर्थिक स्थैर्य लाभेल आणि त्यातूनच वृत्तपत्राचा दर्जा सुधारेल असे त्यांचे ठाम मत आहे. त्यांच्या  या भूमिकेचे विस्ताराने वर्णन करणारी मुलाखत महाराष्ट्रातील विविध 200 हून अधिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली हे विशेष.वृत्तपत्र क्षेत्रातील होणाया या परिवर्तनाची नांदी वसंतजी मुंडे यांच्यामुळेच महाराष्ट्रात सर्वप्रथम सुरुवात झाली. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या निर्णयामुळेच वसंत मुंडे व बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात सर्वश्रुत झालेले आहे. ज्यायोगे आगामी काळात वृत्तपत्र क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल आपणास निश्चितच पहावयास मिळतील. राज्यातील वृत्तपत्रांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी वृत्तपत्र संपादकांची पहिली गोलमेज परिषद वसंतजी यांनी आयोजित केली. या परिषदेसाठी नगर, जालना, औरंगाबाद जिल्ह्यातील 40 हून अधिक संपादक या परिषदेसाठी उपस्थित होते. पत्रकारितेच्या क्षेत्रातील 20 वर्षाच्या समृद्ध अनुभवातून वृत्तपत्र,पत्रकार, प्रतिनिधी, कर्मचारी, विक्रेते, वितरक या सर्वांच्या हितासाठी त्यांना अनेक नवनवीन योजनांची अंमलबजावणी करावयाची आहे. कुठलीही शैक्षणिक,आर्थिक, राजकीय पार्श्वभूमी पाठीशी नसताना, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण घेत दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर वसंतजी यांनी वृत्तपत्र वाटप ते राज्याध्यक्षपदी कार्य करत आपले कौशल्य, वेगळेपण सिद्ध केलेले आहे. त्यांचा हा प्रवास नक्कीच सर्वांना थक्क करणारा आणि प्रेरणादायी आहे. राज्याध्यक्ष वसंतजी मुंडे आपल्या कार्यातून वृत्तपत्र क्षेत्रास नवसंजीवनी देण्यास नक्कीच यशस्वी ठरतील.यासाठी सा. प्रभाकर परिवाराच्या वतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा.



# संघटन बांधणीसाठी वाहून घेतलेले नेतृत्व



महाराष्ट्र पत्रकार संघाचे विद्यमान अध्यक्ष श्री. वसंत मुंडे यांचा आज वाढदिवस. तमाम पत्रकारांच्या संघटन बांधणीसाठी त्यांनी आपले नेतृत्व सतत कार्यरत ठेवले आहे. त्यांच्याकडे संघटन कौशल्य, कार्याची कसोटी आणि प्रचंड जनसंपर्काची धार या त्रिसूत्रीतून या नेतृत्वाने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या आजच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध साहित्यिक, लेखक बाळासाहेब जोगदंड यांनी जागवलेली खास आठवण...

पानावरला दहिवर व्हावे...असे जगावे
दगडामधला पाझर व्हावे...असे जगावे,
ग्रीष्माशी संवाद कराया नाना तहेने
मनभावन गुलमोहर व्हावे...असे जगावे...

गझलकार अमोल वाघमारे या मित्राची निकोप आणि जगण्याच्या विविधांगी अंगाबद्दल संवाद साधणारी ही गझल वाचली की उभ्या आयुष्याचा वेध यातून मिळतो. माणसं ही न भेटलेली असतात  गेल्या 30 वर्षांपासून वसंत मुंडे या आट नेतृत्वविषयी ऐकून आहे. त्यांचे कार्य बघून त्यांच्या कार्यासाठी झोकून दिलेल्या नेतृत्वाला सलाम करण्यासाठी हात आपोआप जुळले जातात. माझे मूळ गाव अंबाजोगाई आणि वसंत मुंडे महोदयांचे  अंबाजोगाई तालुक्यातीलच लाडझरी हे गाव. आमचा एकच तालुका आणि एकच जिल्हा असलेल्या या व्यक्तीमत्वाची माझी समोरासमोर कधीच भेट नाही. परंतु या तावून सुलाखून निघालेल्या माणसाचे कार्य बघूनच भेटीची आस आल्याशिवाय राहत नाही.



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

प्रचंड मेहनत, अणि क्षेत्र कोणतेही असो त्यासाठी निष्ठेने काम करणारी ।र कमी माणसे सध्या बघायला मिळतात. अष्टपैलू व्यक्तीमत्वाच्या  जडणघडणीतून सतत नवनिर्माण होत असते. व्यासंग सर्वस्पर्शी असतो. सूक्ष्म अवलोकन अभ्यासपूर्ण असते. आयुष्यातील कोणतीही दिशा निवडली की ध्येय प्राप्तीसाठी अखंड कष्ट उपसावे लागते. आणि हीच कळवळ वसंतराव मुंडे यांच्या अंगी भिनलेली दिसून येते. महाराष्ट्राला जशी संत महंतांची परंपरा आहे. तशीच पत्रकारितेची यशस्वी पंरपरा आहे. आणि म्हणूनच वसंतराव मुंडे यांचे नाव पत्रकारिता क्षेत्रात आज दैदिप्यमान राहिलेले दिसते. त्याशिवाय पत्रकार म्हणून वैविध्यपूर्ण बातम्यांचा वेध घेण्याची एक समर्पक कलाच त्यांना लाभली आहे. सर्व स्तरातील माणसांची त्यांची जुळलेली नाळ त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते. तर पत्रकारितेतील गुणवैशिष्ट्यांचा आदर्शवत त्यांच्या जगण्यातून पाहावयास मिळतो. आणि म्हणूनच ते पत्रकारितेतील विविध पुरस्काराचे मानकरी ठरतात ही आमच्यासारख्या अनोळखी मित्रांसाठी गौरवास्पद बाब ठरते. आणि वरील गझलेतील शेवटच्या चरणातील पुढील ओळी...

**जमले नाही सागर, हरकत नाही तृष्णाशामक घागर व्हावे...असे जगावे...!**

असे वसंतरावांच्या कार्याची नोंद घेताना सांगावेच लागते. संघटन कौशल्य आणि सिद्धहस्त नेतृत्वाच्या बिजातून त्यांची होत असलेली भरभराट निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्याचे अभ्यासपूर्ण चिंतन म्हणूनच अंतर्मुख होऊन जाते.  पत्रकारिता क्षेत्रातील नवनवे बदल स्वीकारत या क्षेत्राचे गणित समजावून घेत आणि या क्षेत्राला नावलौकिक प्राप्त करून देण्यासाठी वसंतराव करीत असलेले प्रचंड  झपाटलेले कार्य या क्षेत्रास पुढील काळात निश्चितच आशादायक ठरणार आहे. चौथा स्तंभ भक्कम उभा राहिला पाहिजे, या स्तंभाला कुठेही धक्का लागू नये म्हणून ते करीत असलेले प्रयत्न या क्षेत्रासाठी पुढील काळात स\ल ठरणार आहेत.  विशेष गुणवैशिष्ट्ये अंगी बाळगून त्यांचे जगणे मनामनाला विचार करण्यास भाग पाडते. तर या क्षेत्राविषयी त्यांची धडपड आम्हाला प्रसन्न केल्याशिवाय




राहत नाही. त्यांची शोध पत्रकारितेतील धडपड बघितली की त्यांच्या लेखणीला सलाम करावाच लागतो. संघटन चळवळीतील त्यांचा उत्साह सतत ओसंडून वाहत असतो. म्हणूनच त्यांची ख्याती निश्चितच कौतुकास्पद आहे.

संघर्ष हेच जीवन आहे. जो प्रयत्नशील आणि संघर्षशील राहतो तो नेहमी हसतमुख राहतो. तोच जीवनात यशस्वी होतो. अथक प्रयत्न, अपार जिद्द, अतुट सत्य निष्ठा आणि सृजनशीलता या गुणांनी वसंतराव मुंडे हे व्यक्तिमत्त्व बहरत चालले आहे. त्यांचे हे कार्य एकप्रकारे दीपस्तंभासारखे वाटते . त्यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.. अभिनंदन..!




माध्यमांचे अर्थकारण : वेध भविष्याचा या संपादकांच्या पहिल्या गोलमेज परिषदेत मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, संपादक धनंजय लांबे, संपादक दयानंद माने, कल्याण पांडे, प्रा. डॉ. प्रभू गोरे आदी.



पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार वितरण केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते डॉ. दिनकर माने यांना सन्मानित करण्यात आले. सोबत मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, जगदीश बियाणी.



मुंबईच्या मराठवाडा विभागीय अधिवेशन प्रसंगी उपस्थित ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, राष्ट्रसंत एकनाथ महाराज, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, संतोष मानूरकर, संजय जेवरीकर, यशवंत भंडारे आदी.




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे सोळावे राज्यस्तरीय अधिवेशन ठाणे येथे पार पडले. या वेळी केंद्रीय मंत्री कपील पाटील यांचा सत्कार करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे आणि कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे.



नागपूर येथे आयोजित विदर्भस्तरीय दुसऱ्या अधिवेशन प्रसंगी माजी केंद्रीय मंत्री विलासराव मुत्तेमवार, प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, उमरेडचे आमदार राजू पारवे, श्रीकृष्ण चांडक आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अधिवेशन जळगाव येथे संपन्न झाले. या वेळी पाणीपुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा सत्कार करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे आदी.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या नागपूर येथे आयोजित विदर्भस्तरीय दुसऱ्या अधिवेशन प्रसंगी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, विदर्भ अध्यक्ष प्रा. महेश पानसे, श्रीकृष्ण चांडक, श्रीपाद अपराजित, भास्कर लोंढे, डॉ. श्रीपाद अपराजित, सुदर्शन चक्रधर, शब्बीर अहमद विद्रोही आदींची उपस्थिती होती.



# 'वसंत' फुलला दारी

वसंत मुंडे विषयी लिहिण्यासाठी लेखणी हाती घेतली आहे खरी पण वसंताच्या नी प्रभू गोरेच्या सहवासातील अनंत आठवणींच्या हिंदोळ्यावर माझं मन सुखावून गेलेले आहे.प्रभू गोरेच्या सहवासातून एक पत्रकार मित्र लाभला त्याचा आनंद शब्दातीत होता...अभिजात पत्रकारीतेचा वरदहस्त लाभलेला हा वसंत मुंडे...त्याचं कौतुक करायला माझे शब्दही अपुरे आहेत असंच मला वाटतं... घेशील तूं किती दोन करांनी असं म्हणत.. पांडुरंगानी या वसंताच्या ओंजळीत भरभरून बुध्दीमत्तेच दानं दिलेलं आहे. महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी...संपादकांसाठी दिलानं लढणारा योद्धा बीड एका छोट्या खेड्यामधून आला तो बुध्दीमत्तेचं तेजस्वी रुप धारण करुनच. विद्यार्थीदशेत असतानाच वसंताच्या अंगी असणारी तजोवलयाची तेजस्वी झलक दाखवली.सामाजिक वनीकरणाच्या कामावरील मजुरांची आर्थिक \सवणूक करणायांना अंबाजोगाई मधील पत्रकारांच्या मदतीने न्याय मिळवून दिला. आपल्या लेखनातून असंख्य पत्रकारांच्या प्रश्नांची उकल करुन सोडविले.बीड जिल्ह्यातील वंचित नी उपेक्षितांसाठी काम करणाया लोकांच्या सामाजिक संस्थांनाही मोठी आर्थिक मदत मिळवून देण्याचं अनमोल कार्य वसंत मुंडेंनी केले... वसंताच्या जीवनात संकल्पीलेली सगळी स्वप्ने साकार होत होती.कोणत्याही वृत्तपत्राचा संपादक नसतानाही महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यात सर्वानुमते घातली गेली... ही तर वसंत मुंडेंच्या केलेल्या कार्याची \लश्रुतीच होती... बीड जवळील छोट्या खेड्यातून आलेला तेजस्वी तड\ दार तरुण आपल्या ओघवत्या.. प्रभावी भाषा शैलीतील भाषणामुळे त्यांनी सायांनाच आपलंसं करून घेतलं होतं. वसंत मुंडेंनी आपल्या भाषाशैलीतुन ... शब्दसौंदर्यातूंन... ह्रदयापर्यंत पोहचणाया लिखाणातून मराठवाडाच काय मुंबईतील मान्यवरांच्या ह्रदयात आपलं वेगळं असं स्थान निर्माण केलेलं होतं.याची प्रचीती त्यांनी आयोजित केलेल्या संपादकांच्या गोलमेज परिषदेच्या प्रसंगी सायांनाच आली. वसंत मुंडे हा महाराष्ट्रातील पत्रकारितेच्या क्षेत्रातील एक लखलखीत स्वयंप्रकाशित असा तारा म्हणून उदयास आला. वसंत मुंडे एक चतुरस्त्र नेता म्हणून सायांनाच परिचीत झाला...तो त्याच्या जवळील अलौकिक गुणांमधुन... कर्तृत्व...दातृत्व... नेतृत्व.. वक्तृत्व... असे अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. वसंत मुंडे यांचा कोणत्याही विषयातील अभ्यास..त्यावरील लिखाण अप्रतिम असतं..त्यांची बोलण्याची भाषाशैली ... भाषणांतील शब्दसौंदर्य... माधुर्य विलक्षणच... वसंत मुंडे यांच्या सारख्या शब्दप्रभूचे शब्द जेव्हा काव्यरसांची उधळण करीत येतात... तेंव्हा त्यांच्या अंतरंगाचे भावतरंग... अत्यंत पारदर्शकतेनी... निखळ शब्द सौंदर्य... शब्द शब्दांतून व्यक्त करीत जातात. तेव्हा आपणं त्यांच्या शब्द..शब्दांचा अर्थ लावताना आपले शब्दही अपुरे पडतात. कारण वसंतानी लिहिलेले शब्द नी शब्द वाचणायाच्या ह्रदयास स्पर्शून गेलेले असतात. मग आपणांस सर्वांवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांचे शब्दही निशब्द होऊन जातात... त्यांच्या लिखाणाचा आशय वाचताना आपणांस समजून घेतं म्हणावं लागतं... शब्दां वाचून कळले सारे शब्दांच्या पलिकडले. ... वसंत मुंडे खरंतर ईश्वरानी निर्माण केलेलं अलौकिक व्यक्तिमत्व आहे असंच म्हणावं लागेल. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे वृत्तपत्र क्षेत्रात अनेक वादळे निर्माण झाली... छोटे वृत्तपत्रांच्या नौका तर त्यावादळात किनायांवर पोहंचूच शकल्या नाहीत. सर्वच वृत्तपत्र व्यवसायात आर्थिक संकट ओढवली.पगार कपात..अनेकांना तर नोकरीही गमवावी लागली.अशा संकटांना धैर्यानी सामोरं जातं.. आपणं सायांनीच आत्मनिर्भर होऊन समोरं जाण्याचा मार्ग वसंत मुंडे यांनी दाखवीला तो एखाद्या दिपस्तंभासारखा ...त्यामुळेच वसंत मुंडे यांच्या कर्तृत्वाला सोनेरी किनार लाभली हे बाकी खरं... वसंत मुंडे म्हणजे रसाअमृताच्या \ळांनी बहरलेला एक सदैव टवटवीत... तजेलदार असणारा... सदैव सर्वांना सुखाची छाया देणारा हा एक सुंदर वृक्ष आहे. प्रेमरसाची.. आपुलकीची असंख्य सुमधुर \ळे. त्यांनी अत्यंत भावपूर्णपणे त्यांच्या सहवासातील व्यक्तींच्या हाती दिली.ज्यांनां..ज्यांना ती \ ळं मिळाली त्यांचे जीवन आनंदमय ..सुखमय.. सुजलाम.. सु\लाम होऊन गेलं हे बाकी खरं... वसंत मुंडे सारखा एक अलौकिक व्यक्तिमत्व असणारा मित्र मला ईश्वरांनी दिला...



सुधीर कोर्टीकर
9765553312

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
adhunikkesari.com Adhunik Kesari
सोमवार, १ जानेवारी २०२४




# सरत्या सूर्याला अखेरचा निरोप



देशाला बरेच काही देऊन जाणारे 2023 हे वर्ष धार्मिक, सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक उंचीचे जागतिक उन्नयन करणारे ठरले. सूर्याच्या वलयात सुवर्णपंखांनी भरारी घेत सरत्या सूर्याला अखेरचा निरोप देणारे हे दृश्य. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# उष:काल होता होता काळरात्र झाली

## वाळूज एमआयडीसीत भीषण आग


आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : वाळूज औद्योगिक वसाहतीत रविवारी पहाटे आगीची भीषण दुर्घटना घडली. येथील हँडग्लोज बनवणाऱ्या सनशाईन एंटरप्राईज कंपनीत लागलेल्याभीषण आगीत कंपनीतील सहा कामगारांचा झोपेत असतानाच होरपळून मृत्यू झाला आहे. तर चार कामगारांनी बाहेर पडून कसाबसा जीव वाचवला.**


या घटनेतून बचावलेल्या एका कामगाराने या घटनेबाबत माहिती देताना सांगितले की, रात्री आम्ही जेवण करून झोपलो होतो. रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास कोणीतरी आले आणि सांगितले की, कंपनीत आग लागली आहे. मी माझ्या रूमच्या बाहेर आलो, तर सर्वत्र धूर पसरला होता. बाहेर काहीच दिसत नव्हते. मी तेथून बाहेर उडी मारली. रात्री बाहेरच्या गेटला कुलूप लावले होते. काही जण गेटच्यावरून उड्या मारून बाहेर पडले. बाकी काहींनी मिळेल तिकडून उड्या टाकल्या. ६ लोक आतमध्ये अडकले होते त्यांचा मृत्यू झाला. सनशाइन इंटरप्राईजेस या कंपनीत रबरी हातमोजे बनवण्याचे काम केले जाते. १५ कामगारांसह एक महिला व दोन लहान मुले असे एकूण १८ जण येथे काम करतात. या कंपनीत काम करणारे बहुतांश कामगार बिहार राज्यातील मधुबनी जिल्ह्यातील मिर्झापूर, पंचायत दलोकर या गावाचे रहिवासी आहेत. शिवाय एकजण पश्चिम बंगाल व शेजारच्या गावातील आहे. अग्नीतांडवात मृत झालेल्यांमध्ये एका ज्येष्ठ कामगाराचा समावेश आहे. त्याशिवाय एका अठरा वर्षीय युवकाचाही समावेश आहे. अग्निशमन दलाकडून मिळालेल्या माहितीनुसार मुश्ताक शेख (वय ६५), कौशर शेख (३२), इक्बाल शेख (१८), ककनजी (५५), रियाजभाई (३२), मरगुस शेख (३३) या कामगारांचा मृत्यू झाला आहे. आगीची माहिती मिळाल्यानंतर वाळूज अग्निशमन दलाचे दोन बंब, बजाज ऑटो कंपनीचा एक, महापालिकेचे दोन व चिकलठाणा अग्निशमन दलाचा एक अशा ६ बंबांसह वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीने प्रयत्न सुरु आहेत. सुरूवातीला आतमध्ये अडकून पडलेल्या सहा कामगारांचे मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले.

**मृत कामगारांच्या नातेवाईकांना मदत जाहीर :** छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज औद्योगिक वसाहतीत एका हँडग्लोज बनवणाऱ्या कंपनीस लागलेल्या भीषण आगीच्या दुर्घटनेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे . मध्यरात्री लागलेल्या या आगीत सहा कामगारांचा जळून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे . या कामगारांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपये देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत . याशिवाय जखमी कामगारांना तातडीने शासकीय खर्चाने सर्व वैद्यकीय उपचार द्यावेत अशाही सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत . आग शमविण्यासाठी तसेच अडकलेल्यांना सुखरूप काढण्यासाठी करण्यात आलेल्या बचाव कार्याची माहितीही त्यांनी घेतली व हे मदत कार्य व्यवस्थित पार पडण्यास सांगितले .






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

४ नोव्हेंबर २०१९ हा तो दिवस. याच दिवशी या सेवाव्रतींचे दर्शन आम्हाला घडले. त्या दिवशी आम्ही हेमलकशाला गेलो होतो. भेटीसाठी प्रकाश आमटेंची वेळ मिळाली होती. प्रकाश आमटे आणि मंदाताई भेटणार म्हणून कोण आनंद झाला होता. माझ्यासारखेच इतरही काही पर्यटक प्रकाश आमटेंचं सेवाकार्य आणि लोकबिरादरी प्रकल्प पाहण्यासाठी आले होते. एका मोठ्या हॉलमध्ये आम्ही बसलो होतो. एवढ्यात डॉ प्रकाश आणि मंदाताई आल्या. त्यांच्या राहण्यातला साधेपणा, वागण्याबोलण्यातली अकृत्रिमता लक्ष वेधून घेत होती. आमच्याशी त्यांनी काही वेळ संवाद साधला. त्यावेळी माझं ' कवडसे सोनेरी...अंतरीचे ' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झालं होतं. ते पुस्तक त्यांना भेट देण्याचं भाग्य मला लाभलं. डॉ प्रकाश यांनी लोकबिरादरी प्रकल्पाची माहिती आम्हाला दिली. आणि मग स्वतः आमच्यासोबत येऊन त्यांचे प्राणी अनाथालय त्यांनी आम्हाला दाखवले. प्राण्यांबरोरबर ते संवाद साधत होते. त्यांच्याशी बोलता बोलता त्यांना भरवत होते. ते मुके जीव सुद्धा आपल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या या देवमाणसाला अत्यंत प्रेमाने प्रतिसाद देत होते. डॉ प्रकाश यांचं प्राणीप्रेम, त्यांना घराच्या एखाद्या सदस्यासारखं सांभाळणं या सगळ्या गोष्टी आम्ही त्या थोड्या वेळात अनुभवल्या. त्यांचं हे प्राणी अनाथालय कसं सुरु झालं याची हकीकत रोमहर्षक आणि हृदयस्पर्शी आहे.
जंगलात राहणारे आदिवासी जो प्राणी दिसेल, त्याची शिकार करून खात. शक्यतो वानरांची शिकार कोणी करत नाही पण एकदा काही आदिवासी माणसे एका वानरीणीची शिकार करून तिला घेऊन जात होते. वानरी मृत झाली होती पण तिचे पिलू जिवंत होते. ते तशाही अवस्थेत तिचे दूध पिण्याचा प्रयत्न करीत होते.



## आनंदी पहाट

### तणावमुक्त जीवनासाठी ध्यानाभ्यास करावा

आधुनिक केसरी

तणावामुळे तुम्ही चिंताग्रस्त, तणावग्रस्त आणि काळजीत असाल, तर तुम्ही ध्यान करण्याचा प्रयत्न करू शकता. ध्यानात काही मिनिटे घालवल्याने तुमची शांतता आणि आंतरिक शांती पुनर्संचयित करण्यात मदत होऊ शकते. कोणीही ध्यानाचा सराव करू शकतो. तसे ध्यानाभ्यास समजायला फारसा कठीण नाही; तसेच त्यासाठी जास्त खर्च देखील नाही. ध्यान करण्यासाठी आपल्याला कोणत्याही विशेष उपकरणांची आवश्यकताही नाही. तुम्ही जिथे असाल तिथे ध्यानाचा सराव करू शकता. तुम्ही फिरायला बाहेर असताना, बसमधून जाताना, डॉक्टरांच्या क्लिनिकमध्ये असताना, एखाद्या ऑफिसमध्ये थांबलेले असताना, घरातच कोणाची तरी वाट पाहत असताना किंवा बिझनेस मीटिंगच्या मधल्याकाळातील मोकळ्या वेळेत तुम्ही ध्यान करू शकता. ध्यान हजारो वर्षांपासून केले, सांगितले, शिकवले जात आहे. सुरुवातीच्या काळात ध्यानाचा अर्थ जीवनातील पवित्र आणि गूढ शक्तींना समजून घेण्यास मदत करण्यासाठी होता. आजकाल, ध्यान बहुतेक वेळा आराम प्राप्त करण्यासाठी आणि तणाव कमी करण्यासाठी उपयोगात आणले जाते. ध्यान हा एक प्रकारचा मन-शरीर पूरक औषधोपचार आहे. ध्यान तुम्हाला खोलवर आराम करण्यास आणि तुमचे मन शांत करण्यात मदत करू शकते. ध्यान करताना तुम्ही एका गोष्टीवर लक्ष केंद्रित करता. तुमच्या मनात गर्दी करून तणाव निर्माण करणाऱ्या विचारांच्या प्रवाहातून तुम्ही मुक्त होत असल्याचा अनुभव घेता. ध्यान केल्याने तुम्हाला मानसिक शांतता आणि समतोल मिळू शकतो; ज्यामुळे तुमच्या भावनिक कल्याणासाठी आणि तुमच्या एकूण आरोग्याला त्याचा फायदा होऊ शकतो. तुम्हाला शांत करणाऱ्या एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करून तुम्ही आराम करण्यासाठी आणि तणावाचा सामना करण्यासाठी देखील याचा वापर करू शकता. ध्यान केंद्रीत राहण्यास आणि आंतरिक शांती राखण्यास शिकण्यास मदत करू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### चैतन्यात न्हाला | आत्माराम ||

चैतन्याचे रूप | चैतन्य दाविते ||
चैतन्य बोलते | किर्तनात ||१||
चालता बोलता | आठवे चैतन्य ||
तयाविन अन्य | काय पाहु ? ||२||
चैत्यन्याची बाधा | चैत्यन्ये जडली ||
चैतन्ये वाढली | प्रेम भक्ती ||३||
चैतन्याची खूण | चैतन्य सांगते ||
चैतन्य नांदते | अंतरात ||४||
सद्गुरू चैतन्य | लाभता ज्ञानाला |
चैत्यन्यात न्हाला | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

विदेसीं बहु दगदला । विश्रांती घ्यावया आला ।
स्वासहि नाहीं टाकिला । तों जाणें वोढवलें ॥२७॥
पुढें अपेक्षा जोसियांची । केली विवंचना मुहूर्ताची ।
वृत्ति गुंतली तयाची । जातां प्रशस्त न वटे ॥२८॥
माया मात्रा सिद्ध केली । कांहीं सामग्री बांधली ।
लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ॥२९॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

दस इन्द्रिय दस विषय जो,
सोइ अन्याय से रोक ।
सत उपयोगी सो करहिं, दम से जाय
प्रेयशोक ।।११५।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/११५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
डोळे, कान, नाक, जिभ आणि त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये आहेत. हात, पाय, वाणी, लिंग, गुदा ही पाच कर्मेंद्रिये आहेत. रूप, शब्द, गंध, स्वाद, स्पर्श करणे, चालणे, बोलणे तथा मलमूत्रादि विसर्जन हे यांचे दहा विषय आहेत. एक विवेकी साधक आसक्त न होता या इंद्रियांना त्यांच्या विषयांपासून रोखतो. यालाच दम असे म्हणतात. दम या सद्गुणामुळे सांसारिक भोगजन्य दुःखांचे निवारण होते.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## जनार्दन स्वामी


आधुनिक केसरी

बाबाजी हे दिव्य ईश्वर विभूती आहेत अशी अनेकांनाअनुभूती आली.त्यानंतर फार मोठा लोकसंग्रह श्री बाबाजींच्या कृपाशिर्वादाने त्याठिकाणी प्राप्त झाला. त्याठिकाणी दररोज नित्यनियमविधी पाठ त्यानंतर प्रवचन ,संस्काराचे पाठ,यज्ञ याग,जपअनुष्ठान, अशा परमार्थी मुल्यांची समाजातील समान्य घटकांकडून करून घेतले.तसेच कार्य श्री क्षेत्र वेरूळ ,पालखेड,पुणतांबा,नासिक ,त्र्यंबकेश्वर,कोपरगाव, निफाड कारखाना या ८ ठिकाणी उभारणी केली. धर्माची ,देशाची भावी पिढी आधार स्तंभ असलेल्या बालकांना दैवीभूल्यादिष्टीत शिक्षण त्याच बरोबर शालेय शिक्षणासाठी “संस्कार केंद्र ” व कार्य प्राचीन व गुरुकुल पध्दतिने सुरु केले.बाबाजींनी आश्रमाच्या ठिकाणी गरीब विद्यार्थी वसतीगृह निर्माण केले. १९९० चा गुरुकुलातील एस.एस.सी. चा निकाल ९७ % लागला आहे. हि परंपरा आज पर्यंत चालू आहे. मनुष्य जन्म हा स्वैराचारासाठी नसून आध्यात्मिक उन्नतीसाठी आहे. याचे शिक्षण देतांना परधन,परस्त्री,परनिंदा,परअन्न ह्या चार गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजे.ह्यावर त्यांचा भर होता.आयुष्याचा प्रत्येक क्षण परोपकार लोकशिक्षणासाठी कसा जास्तीतजास्त खर्च करता येईल याचा सतत ध्यास घेतला होता.श्री शिव पंचायतन यज्ञ याग,भव्य जपअनुष्ठान करून समाज जागृती श्री संत जनार्दन स्वामींनी केली. सर्व वयातील पुरुष व मुले या सर्वांकडून सात दिवसीय जपअनुष्ठान करून घेतले.या सात दिवसात धर्माचे,संस्कृतीचे सरळ साध्या सोप्या ग्रामीण भाषेत प्रवचन करून आहार,विहार,सदाचार,धर्मनिष्टा श्री संत जनार्दन स्वामींनी केली. अशा प्रकारे चंदना सारखा देह झिजून झिजून कार्य क्षीण झाला. शरीर शेवटी शरीर आहे जे कार्य सामान्यांना काही शत वर्ष लागले ते कार्य अतिशय अल्प काळात श्री बाबाजींनी करून दाखविले. हा मोठा असामान्य अविष्कार आहे.वयाच्या ७५ व्या वर्षी श्री राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी ( मौनगिरी )महाराज यांनी प्रभू राम चंद्राच्या पद स्परर्शाने पावन झाल्येल्या भूमीत आदर्श राजा मर्यादा पुरुषोत्तम श्री राम यांच्या तपोभूमीत श्री शर्वाश्वर महादेव मंदिर,नाशिक मंदिराच्या आपल्या पर्णकुटी मध्ये १०.१२.१९८९ रोजी ब्रह्ममुहूर्तावर ब्रह्मलीन झाले. श्री सद्गुरू माऊलीचे दिव्य देहाची महायात्रा दुपारी ४ वाजता नाशिक शहरातून कोपरगावकडे निघाली. लाखो भाविक साश्रुनयनांनी ह्या महायात्रेत सहभागी झाले होते.कोणी कुणाशी बोलत नव्हते. मुखातून एकच भजन पुन्हा पुन्हा स्वयंप्रेरणेने म्हणत होते.

## संत कसे असतात ?

आधुनिक केसरी

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही. मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दुःख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा



छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. ‘वाईट वाटत नाही’ याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दुःख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो. विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत ‘शोधण्याची’ मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वतःच्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.
९५. संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.




आधुनिक केसरी

ॐ सर्वे भवन्तु सुखिन:। पान ६

विश्वव्यापी मराठी दैनिक

सोमवार, १ जानेवारी २०२४




मावळतीच्या दिनकरा... पुणे- सोलापूर रस्त्यावरील पळसदेव गावाजवळील महादेवाच्या मंदिरा जवळील... सरत्या वर्षाच्यातील हे मावळतीच्या दिनकराचं या वर्षातील शेवटचं दर्शन...
छायाचित्र : स्वप्निल सुधीर कोर्टीकर

# वाशी तालुक्याच्या विकासाची दातखीळ उघडणार का?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**



**धाराशिव :** जिल्ह्यातील भूम-परंडा-वाशी मतदारसंघातील वाशी तालुका हा कायम विकासाची दातखीळ बसलेला तालुका म्हणुनच ओळखला जातो आहे.

2009च्या पूर्वी वाशी-कळंब हा राखीव मतदारसंघ होता. वाशीकरांनी विधानसभा असो वा लोकसभा कायम शिवसेनेला भरभरून मतदान दिले. अगदी एका सर्वसामान्य कुटुंबातील महिला कल्पना( ताई ) नरहिरे यांच्या शिरपेचात आमदारकीचा व खासदारकीचा तुरा बसवायला वाशीकरांचे ही खूप मोठे योगदान होते. मतपेटीतून मिळालेले भरभरून प्रेम कल्पना( ताई ) नरहिरे यांनी कमी होऊ दिले नाही. माजी आमदार बाईंनी कायम भीषण पाणीटंचाईच्या झळा सोसणाऱ्या वाशी शहरातील नागरिकांसाठी आरसोली-वंजारवाडी येथून वाशी शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी महत्वकांक्षी योजना राबवली, पाण्यासाठी रानोमाळ करत फिरणाऱ्या महिलांच्या डोक्यावरील पाण्याची घागर माजी आमदार बाईंनी उतरवली,त्यानंतर या लोकप्रिय माजी आमदार कल्पना( ताई ) नरहिरे यांची ओळख "पाणी वाली बाई"अशीच निर्माण झाली. याच नरहिरे( ताईंनी ) वाशी शहराला 26/6/1999 रोजी तालुक्याच रूप देऊन एक अभिमानास्पद वैभव प्राप्त करून दिले.

कळंब तालुका व भूम तालुक्यातील एकूण 62 गावे वाशी तालुक्यामध्ये समाविष्ट करण्यात आली. वाशी तालुक्यातील जाणकार म्हणतात, भूम परंडाचे माजी आमदार यांनी वाशी तालुक्याच्या विकासासाठी काहीच केले नाही. मात्र स्वतःच्या मतांची गोळा बेरीज शाबूत ठेवण्यासाठी वाशी तालुक्यामधील अगदी हाकेच्या अंतरावरील गावे पुन्हा भूम तालुक्यात समाविष्ट केली. आज चोवीस वर्ष उलटले तरीही तालुक्यातील समस्यांचा पाढा काही संपलेला नाही. अनेक आजी-माजी लोक प्रतिनिधींनीं नुसत मतदानापुरते जाहीरनामे वाचून वाशी तालुक्यातील जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. याच तालुक्यातील हरवलेल्या विकासाचा आढावा आधुनिक केसरी कडून घेण्यात आला. मागील २४ वर्षांपासून अनेक भागात रस्त्यांची कामे झाल्याचे दिसून येत नाही. कायम खंडित होणारा वीज पुरवठा व वीज नसलेली गावे, महिना-महिना पिण्याच्या पाण्यासाठी तहानलेली गावे तालुक्यांमध्ये प्रकर्षाने दिसून येतात.





नूतन वर्षाच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!

HOTEL SAHAYADRI

PURE VEG & LODGING BOARDING

KISHOR CHAVAN

MOB. 9130776565, 9561776565

ELLORA AJANTA ROAD, KINGAON PHATA, KINGAON, TQ. FULAMBRI, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

सर्व जनतेस नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

नृसिंह भारत गॅस एजन्सी




प्रोप्रायटर

सचिन घोलप

देरेगाव, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

सर्व जनतेस नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

सरकार मान्य

औरंगाबाद स्केल

मल्टी सर्व्हिसेस

संजय गाडेकर पाटील

9850014009

9404414009

चायना काट्यापासून सावधान

आमच्याकडे सर्व नामांकित कंपनीचे काटे योग्य दरात मिळतील.



जनरल शॉपिंग कॉम्पलेक्स, शॉप नं. 99, नवा मोंढा, जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर

2024 सर्व जनतेस नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्री. करणसिंग राजपूत (सरपंच)



श्री. विठ्ठल साळुंके (उपसरपंच)



श्री. सचिन बनसोडे (ग्रामसेवक)

ग्राम संवाद सरपंच संघटना, खुलताबाद तालुकाध्यक्ष

ग्रामपंचायत सदस्य :
श्रीमती कोकिळाबाई हुकुम चंदवाडे, सौ. लता गणेश झुरावत, सौ. उज्ज्वला गणेश राऊत, सौ. सुरमा संजय चंदवाडे, श्री. धरम रमेश शिरे

ग्रप ग्रामपंचायत झरी वडगाव, ता. रत्नपूर, जि. छत्रपती संभाजीनगर

## केंद्राचा मोठा निर्णय

आधुनिक केसरी

कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू-काश्मीरमधील परिस्थितीबाबत विरोधकांनी सातत्याने केंद्र सरकारवर प्रश्न उपस्थित केले आहेत. तेव्हापासून झालेल्या सर्व संसदीय अधिवेशनांमध्ये यासंदर्भात विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती अद्याप पूर्ववत झाली नसल्याचा आरोपही मोदी सरकारवर करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला असून जम्मू-काश्मीरमधील तेहरीक-ए-हुर्रियत या संघटनेवर बंदी घालण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या एक्स (ट्विटर) अकाऊंटवर यासंदर्भातली माहिती दिली आहे. तेहरीक-ए-हुर्रियत या संघटनेवर यूएपीए कायद्यांतर्गत पाच वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. फुटीरतावादी शक्तींना बळ देणे, देशविरोधी कारवायांमध्ये सहभाग घेणे, दहशतवादाला खतपाणी घालणे असे आरोप या संघटनेवर ठेवण्यात आले आहे. यासंदर्भात अमित शाह यांनी केलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये सविस्तर माहिती देण्यात आली आहे. अमित शाह यांनी केलेल्या पोस्टमध्ये तेहरीक-ए-हुर्रियतवर केलेल्या कारवाईविषयी भूमिका स्पष्ट केली आहे. तेहरीक-ए-हुर्रियत या संघटनेला यूएपीए कायद्यांतर्गत बेकायदा म्हणून घोषित करण्यात आले आहे. जम्मू-काश्मीरला भारतापासून वेगळं करून तिथे इस्लामिक कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या कारवायांमध्ये या संघटनेचा सहभाग आहे. जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावादाचा प्रसार करण्यासाठी दहशतवादी कारवाया घडवून आणण्यामध्ये आणि देशविरोधी कृत्यांमध्ये या संघटनेचा सहभाग आहे, असे अमित शाह यांनी नमूद केले आहे. दहशतवादविरोधी कठोर कारवाई करण्याचे धोरण पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठेवले आहे. त्यामुळे अशा प्रकारे देशविरोधी कृत्यांमध्ये सहभाग असणाऱ्या संघटनांवर अशीच कारवाई केली जाईल, असा इशाराही अमित शाह यांनी दिला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने मुस्लीम लीग जम्मू-काश्मीर मसरत आलम गट (एमएलजेके-एमए) या संघटनेवरही अशाच प्रकारे देशविरोधी व फुटीरतावादी कृत्यांमध्ये सहभागी असल्याचा आरोप करत बंदी घातली होती. या संघटनेचा म्होरक्या मसरत आलम भट याच्यावर पाकिस्तानधार्जिण्या कृत्यांना समर्थन दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

## भीमाकोरेगाव लढाई-परिस्थितीचा परिपाक



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**१ जानेवारी १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतावादी, मनुवादी, अन्यायी, अनैसर्गिक, असामाजिक समाजव्यवस्था व कृतघ्न ब्रिटिश सरकारच्या विरोधात बंडाला सुरुवात करण्यापूर्वी १ जानेवारी १८१८ रोजी ५०० महार सैनिकांनी ४५ किलोमीटरचा रात्रभर पायी प्रवास करून; पोटात अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंब नसताना बारा तासांची लढाई करून अत्याचारी पेशवाईच्या २८००० सैन्याला धूळ-मातीत लोळवताना धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या सन्मानार्थ सन १८२२ रोजी उभारलेल्या विजयस्तंभाला आपल्या हजारो कार्यकर्त्यांसह मानवंदना दिली.**

तिथे झालेल्या सभेमध्ये अस्पृश्य समाजातील अनेक नामवंत पुढारी हजर होते. त्या सभेमध्ये सहभागी कार्यकर्त्यांना संबोधित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, आपल्या पूर्वजांना, म्हणजे त्यावेळच्या महारांना असे स्विकियांविरुद्ध म्हणजे पेशव्यांविरुद्ध परकीय इंग्रजांच्या बाजूने लढावे लागले हा इतिहास फारसा भूषणावह नाही. परंतु त्यावेळच्या परिस्थितीचा तो परिपाक होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातील वरील वाक्याचे विश्लेषण केले, तर त्यामध्ये समतोलता दिसून येते. त्यात ते आपली राष्ट्रनिष्ठा तथा देशभक्ती कायम राखून अन्यायाविरुद्ध लढलेच पाहिजे हा संदेश देताना दिसतात. म्हणूनच ते नेहमी म्हणायचे की, 'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल.' मग ते बंड कोणाच्याही विरुद्ध असू शकते स्वकियांच्या अथवा परकीयांच्या. ब्रिटिश सरकार विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंडाचा झेंडा का उभारला असावा? कारण त्यांना एक जानेवारी १८१८ साली पेशवे व ब्रिटिशांमध्ये झालेल्या लढाईचा इतिहास माहीत होता. त्या लढाईत आपल्यापेक्षा कित्येक पटीने जास्त असणाऱ्या सैनिकांचा; मूठभर महार सैनिकांनी पराभव केल्यामुळे त्यातील शहिदांसाठी बांधलेल्या विजयस्तंभाला दरवर्षी नूतनवर्षाच्या पहिल्याच तारखेला ब्रिटिशांच्या सैनिकांची एक तुकडी येऊन मानवंदना देत असते. हे सर्व त्यांना ज्ञात होते.


एवढेच नव्हे तर भारतामध्ये इंग्रजांसह काही परकीय सत्ता पाय का रोवू शकल्या? याचे विश्लेषण करताना अनेक इतिहासतज्ञ तथा विद्वान म्हणतात की, भारतामध्ये मोठ्या प्रमाणात जातीवाद होता. तर काहींच्या मते आपसात मोठी दुही माजलेली होती. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्लेषण काही औरच आहे. ते म्हणतात की, त्या परकीय सत्तांनी एत्तदेशियांचे सैन्य उभारले, म्हणून त्यांना सत्ता संपादन करता आली. अन्यथा पाच-सहा हजार किलोमीटरवरून आलेल्या ब्रिटिशांना एवढे मोठे सैन्य मायदेशातून आणता आले नसते. ते त्यांना आर्थिकदृष्ट्याही परवडणारे नव्हते. ज्यावेळी ब्रिटिश भारतात आपला साम्राज्य विस्तार करू इच्छित होते, त्यावेळी नेपोलियन बोनापार्टने इंग्लंडला 'दे माय, धरणी ठाय' करून सोडले होते. अशावेळी ईस्ट इंडिया कंपनीला सैन्यासह द्रव्यबल मिळणे अशक्य होते. परदेशातून इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच इत्यादी लोक हातात ताकडी घेऊन भारतात आली. त्यापैकी फ्रेंचांना सर्वप्रथम राज्य स्थापनेचे स्वप्न पडले. अचानक त्याचवेळी त्यांच्या देशात राज्यक्रांती झाल्यामुळे ते त्यांचे दिवास्वप्न ठरले. परंतु रॉबर्ट क्लाइव्ह नावाच्या वखारीतील कारकूनाने तामिळी पायरियांच्या (अस्पृश्य) तुकड्या उभारून आपल्या स्वप्नांना मूर्त रूप द्यायला सुरुवात केली. आणि बघता बघता संपूर्ण देश काबीज केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या १९ मार्च १९२७ च्या महाड येथील भाषणामध्ये म्हणतात की, ब्रिटिश सरकारचा अंमल चालू होण्यापूर्वी अस्पृश्य लोकास डोके वर काढण्यासाठी अजिबात वाव नव्हता. त्याकाळी स्पृश्यास्पृश्यतेच्या, शिवाशिवीच्या भावना अत्यंतिक तीव्र होत्या. चालताना एखाद्या उच्च जातीच्या व्यक्तीवर सावली पडू नये म्हणून त्याला वळसा घालून जावे लागत असे. थुंकीने रस्ता विटाळून जाईल म्हणून गळ्यात गाडगे आणि ओळख पटण्यासाठी हातात काळा धागा बांधावा लागत असे. इंग्रजांमुळे अस्पृश्यांना डोके वर काढण्यास वाव मिळाला. आपल्या अंगी असणारे शौर्य, तेज, बुद्धिमत्ता सिद्ध करता आली. त्यांच्या शिक्षण क्रांतीमुळे जमादार, हवालदार नॉर्मल स्कूलमधून पास होऊन हेडमास्टर, एजुटंट क्लार्क, क्वार्टर मास्टर क्लार्क इत्यादी जबाबदाऱ्या त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडून दाखवल्या. महिलांसह ९० टक्के लोक साक्षर असून ५० टक्के च्या वर लोक वरच्या दर्जाचे सुशिक्षित होते. अनेक दुर्मिळ हस्तलिखितांच्या प्रती त्यांच्या संग्रही होत्या. हे सर्व शिक्षण आणि सैनिकी भरतीमुळे शक्य झाले होते.

परंतु म्हणतात ना, 'गरज सुरु नी वैद्य मरो' तर आज जुनी एत्तदेशीय आर्मीलिष्टांची बाळे चाळून पाहिली, तर त्यामध्ये फक्त आणि फक्त अस्पृश्य सैनिकांचा भरणा दिसेल. अतिशय नाममात्र पगारावर ते सैनिक त्यांना उपलब्ध होत असत. तांदुळावरची पेज खाऊन भात आपल्या गोऱ्या सोजीरांना देणाऱ्यांमुळेच ब्रिटिशांना भारत काबीज करता आला. तरीही १८५७ च्या बंडमोडीनंतर एका सैनिकी पाहणीत असे प्रलाप काढण्यात आले की, सैन्यामध्ये शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला तर अनर्थ ओढवेल. म्हणून सुरुवातीला शिक्षण बंद करून ज्यांनी आपल्या क्षात्रतेज्याने संपूर्ण देश हस्तगत करून दिला त्यांची सैन्यातून गच्छंती करण्यात आली. पुन्हा १९१४ साली पहिल्या महायुद्धात अस्पृश्यांची आठवण झाली. ते संपताच खर्चाच्या नावाखाली त्यांना डच्चू देण्यात आला. शेवटी १९२६ साली तर अस्पृश्यांना पोलिस आणि सैनिकांमध्ये प्रवेश नाकारून कहराची परिसिमाच गाठली.

### ब्रिटिशांना महारांच्या विविधांगी गुणांची पारख

करता आली, मग पेशव्यांना अथवा स्वदेशीय राजांना ती दृष्टी का नसावी? किंवा आपण स्वकियांच्या विरोधात लढून आपलाच पाय रक्तबंबाळ करून घेत आहोत. हे महारांना कळले नसेल काय? प्रत्येकाला ती जाण नव्हती असे नव्हे. परंतु स्वकीय सत्ता ह्या जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, उच्चनीचता तथा मनुस्मृतीला प्रमाण मानणाऱ्या असल्यामुळे त्या महारांचा द्वेष करत होत्या. तरीही इंग्रजांचा दृष्ट हेतू लक्षात घेऊन सिद्धनाक महार व त्यांचे काही निवडक सरदार श्रीमंत बाजीराव पेशव्यांना भेटायला गेले असता, सरदार सिद्धनाकने आपली विनम्र भूमिका त्यांच्यासमोर ठेवली. "स्वकियांच्या विरुद्ध परकियांच्या बाजूने लढणे आम्हालाही आवडत नाही. आम्ही इंग्रजांना भारतातून कायमचे हद्दपार करू इच्छितो. परंतु आपल्या राज्यात आमचे स्थान काय असेल?" तेव्हा बाजीरावांनी मनुस्मृतीसह काही धर्मग्रंथांचे दाखले देत मस्तवालणे उत्तर दिले की, "सुईच्या अग्रावर थरथरणाऱ्या धुळीच्या कणाएवढेही आपले स्थान असणार नाही. तुम्हा महारांची आम्हाला गरज नाही, तुमची असेल तर आमच्या बाजूने लढावे. त्या बदल्यात काहीही मिळणार नाही." अशा एक ना अनेक गोष्टी श्रीमंत बाजीरावाने सुनावल्या. शेवटी त्वेषाने सरदार सिद्धनाक म्हणाले की, "यानंतर होणारी लढाई ही ब्रिटिश विरुद्ध पेशवे नसेल, तर महार विरुद्ध पेशवे अशीच असेल. अशाप्रकारे स्वकियांनी हेडसांड केली आणि इंग्रजांना अनंत कोटी सहकार्य करूनही त्यांनी राजकीय नैतिक तथा आर्थिकदृष्ट्या शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये बंदी घातली. आज त्यांचीच पिलावळ जिवंत आहे की काय? अशा तर्कास वाव आहे. कारण काही मस्तवाल लोक आज संपूर्ण बहुजन समाजाला संविधानिक हक्क-अधिकारांपासून वंचित ठेवू पाहत आहेत. त्यासाठी अनेक साधू, बुवा, बापू, खिसे कापू, अम्मा-टम्मा हिंदूराष्ट्राच्या गोंडस नावाखाली संविधान बदलाचे दिवास्वप्न रंगवत, मनुस्मृति प्रस्थापनेहेतू लोकमतास भ्रमित करताना दिसत आहेत. आता त्या विरोधातील लढाईसाठी विचारअस्त्राने शस्त्रसज्ज होऊन संविधानिक तथा मानवी मूल्याधारीत समाजव्यवस्था निर्माणास्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महत्त्वपूर्ण संदेश कायम लक्षात ठेवावा, तो म्हणजे

YOU DO NOT FIGHT WITH WEAPONS YOU SHOULD FIGHT WITH BRAIN AND PAIN.



## चमकेगिरीपासून तरूणांनी सावध असले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**भौतिक मोठेपणा हा फसवा असल्याने त्या पासून अंतर ठेवून आचर करणं कधीही हितकारक असत.स्वतःच भविष्य सुरक्षित घडविण्यासाठी तरूण वय निर्णायक असतं याचं काळात दृश्य अदृश्य घटक आपला मार्ग भटकवण्यासाठी कार्यरत असतात.सध्या सोशल मिडिया वर चमकेगिरीच जणूकाही पेवच फुटलय असं एकंदरीत सचित्र आहे .यामधून स्वतःचा सुरक्षित बचाव करण्याच मोठं आव्हान तरूणाई समोर उभा आहे.सोशल मिडियाचा सर्वाधिक वापर तरूणाई करत असून जीवन घडण्याच्या काळात खुप संयमित असलं पाहिजे. पण हाच संयम विवेक आणि आत्मविश्वास कमी झाला तर त्याचे विपरीत परिणाम होऊन आपण भावनिक चक्रव्युहात अडकतो.सामाजिक संस्कृती निर्माण होण्यासाठी अनंत कालावधी लागतो पण उध्वस्त होण्यासाठी खुप अल्प काळ लागतो.**

चांगलं कार्य अथवा सद्गुण लावण्यासाठी नानाविध प्रयत्न करावे लागतात पण दुर्गुण सहज लागतात दुर्गुण हे जीवन प्रभावित करणारे असतात.मुळ दुर्गुणा व्यतिरिक्त सोशल मिडिया वरील चमकेगिरी हा नवीन दुर्गुण खुप मोठ्या प्रमाणात फोफावत आहे या पासून विशेष तरूणांनी सावध असलं पाहिजे.सोशल मिडियावरील चमकेगिरी च्या भुलभुलयाला बळी पडून अनेक तरूणांच जीवन उध्वस्त होत आहे हे वास्तव असून ते योग्य वेळी समजणं गरजेचं आहे.आपला विवेक जागृत आणि मजबूत असेल तर इतर कोणतीही अविवेकी वृत्ती शक्ति आपलं फार काही बिघडवू शकत नाही.आपण जर अस्थिर असू तर मग आपला लाभ इतर कोणीतरी घेणारच या मध्ये शंका नाही.संयम हे जीवनातील अमूल्य असं अभूषण असतं.कोणत्याही विषयातील दोन्ही बाजू पुर्ण पणे समजल्या शिवाय त्या न स्वीकारणं हितकारक असत.अर्धवट ज्ञान महिती घातक असल्यामुळे अर्धवट बाबींवर कोणतही कृत्य उचित नसतं पण प्रसिद्धी साठी अर्धवट बाबींवर स्टंट होतात तरूण याला भुलतात म्हणून स्टंट वाढतात. प्रसिद्धी हि फॅशन झाल्याने प्रसिद्धीच्या हव्यासापोटी अनेक वृत्ती प्रवृत्ती वेगवेगळ्या प्रकारचे स्टंट करत असतात या स्टंट ला किती भुलायच हे आपल्यावर अंवलबुन असत. तरूण हे देशाच भविष्य असतं ज्या पद्धतीने तरूणाई त्या पद्धतीने देश असतो.तरूण पिढी सक्षम असली पाहिजे पण सध्या पद्धतीने व्यसनाधीनता तरूणाई साठी घातक ठरत आहे त्याच पद्धतीने एक नवीन व्यसन उदयाला आलं आहे ते नविन व्यसन म्हणजे सोशल मिडिया वरील चमकेगिरी असून या व्यसनाच्या जो आहारी गेला त्याच आयुष्य आणि भविष्य हे दोन बरबाद झाल्या शिवाय रहत नाही.तरूण वय हे भावनिक असतं पण या वयात आपण खूप सज्जग आणि जागृत असलं पाहिजे या वयात एक क्षण जरी चुकला तरी देखील कधीचं भरून निघाणार नाही असं नुकसान होत.सोशल मिडियाच युग आहे हे अगदी वास्तव असलं तरी त्याचे फायदे तोटे पण लक्षांत घेतले पाहिजेत. सोशल मीडिया वापर करताना त्याचा आपल्या जीवनात कोणाताही दुष्परिणाम होणार नाही.याची प्रथम काळजी घेणं गरजेचं असतं. कारण या समूहात सगळ्यांचं वृत्ती आणि प्रवृत्ती सामाजिक हितासाठी कार्यरत आहेत असं नाही बहुतांश वृत्ती आणि प्रवृत्ती ह्या स्व स्वार्थापोटी तरूणाईच्या भविष्य सोबत खेळत आहेत तरूणाई किंवा तरूण वय म्हणजे हुलड पटकन आकर्षित होणारा आणि परिपूर्ण समज नसणारी अवस्था आपल्या या अवस्थेचा कोणीही गैरफायदा घेणार नाही एवढं जागृत तर तरूणांनी असलं पाहिजे. सोशल मीडिया वर सध्या ज्या पद्धतीने तरूण पिढी चमकेगिरी ची शिकर होऊन स्वतःच आयुष्य बरबाद करत आहे ते भयानक असून वेगवेगळ्या व्यसनाधीनता या पेक्षा हि हे वेसन आयुष्य उध्वस्त करणार आहे.या बाबतीत तरूणांनी जागृत होण्याची गरज आहे. आध्यत्मिक ज्ञान वृत्ती कमी होत चालली असल्याने अशा व्यर्थ निरर्थक बाबींच्या आहरी जाण्यास प्रदीर्घ वेळ उपलब्ध होतो. आपला बहुतांश वेळ सार्थक कार्यावर व्यथित करण गरजेच असून स्वतःला घडविणे हाच प्रथम जीवन उदेश ठेवला पाहिजे. आपल्यावर वाईट वेळ आल्यानंतर कोणीही आपलं नसत म्हणून आपली शक्ती बळ ताकद कशी वाढेल याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




आधुनिक केसरी

*इथली शिक्षण व्यवस्था माणसासमोर प्रश्न आहे शिक्षण घेऊन माणूस दर दर भटकत आहे.... इथल्या शिक्षण व्यवस्थेने शिक्षणाची दारे कुलूप बंद केलीत, तरीही.....ही दारे तोडतांना इथल्या बहुजन वर्ग आणि संपूर्ण स्त्री जातीने हाडाची काडे करून अतिरिक्त संघर्ष केला. काही कुलूप बंद द्वारे उघडलीही......पण अतिश्रमाने आणि अति संघर्षाने विचारांचा संघर्ष मनामध्येच घुटमळत राहिला. विचारांची लढाई संपण्याच्या मार्गावर असताना आणि मोठ्या प्रमाणात प्रकाशज्योत तडफडत असताना , शिक्षणामुळे कुठून तरी एक प्रकाशाचा किरण या स्त्रियांच्या आयुष्यात आला आणि स्त्रियांचे जीवन उज्वल झाले. प्रत्येक स्त्रियांनी आपापल्या जीवनात शिक्षणाचा मार्ग अवलंबिला. या शिक्षणामुळे जीवनच नाही तर....संपूर्ण कुटुंब आणि समाजव्यवस्था ही प्रकाशित झाली. 2024 मध्ये स्त्रियांच्या शिक्षणातील आव्हानांमध्ये स्त्रियांना समान अधिकारी शिक्षणाचं आणि संगणक, विज्ञान, गणित, आणि विज्ञानात्मक विषयांचं ज्ञान देणे आवश्यक आहे. शिक्षणातील इंफ्रास्ट्रक्चर सुधारण्यासाठी सुरक्षित आणि सुविकसित शिक्षणाचे माध्यम सुरक्षित करणे आवश्यक आहे.*

*स्त्रीशक्ती आणि नेतृत्व विकसित करण्यासाठी स्त्रियांना नेतृत्व, उत्कृष्टता, आणि सामाजिक सेवा क्षेत्रात सकारात्मक दृष्टीकोन वाढीस लागणे आवश्यक आहे. स्त्रियांना वैचारिक विकासात समर्थन करण्यासाठी सुविधांकल्पित आणि चुनौतीपूर्ण परिस्थितीत स्त्रीयांना समर्थन मिळणे आवश्यक आहे. 2024 मध्ये स्त्रियांना समृद्धि, स्वास्थ्य, आणि शिक्षण संबंधित पुढील आव्हाने समोर ठेवून भविष्यकालीन आव्हाने पेलण्यासाठी स्वतःला सक्षम आणि मजबूत करणे खूप आवश्यक आहे. सामाजिक सामर्थ्य, सामुदायिक सहभागिता, आणि स्त्रीशक्तींची सुरक्षा या तिन्ही गोष्टीचे समीकरण जोडणे खूप आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक स्त्रीने स्वतःचे सामर्थ्य, स्वतःची शक्ती आणि स्वतःची सुरक्षा या गोष्टींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. यामुळे तिची स्वतःचीच प्रगती नाही तर....कुटुंबाची पर्यायाने समाजाची आणि देशाची ही प्रगती होईल. सकारात्मक परिणाम मिळविण्यासाठी स्त्रियांचं एकात्मिक समर्थन मिळणेआवश्यक आहे.*



डॉ. शुभांगी पाटील (भोयर )
संपर्क क्र. 9067811349

*2024 मध्ये स्त्रियांपुढील सामाजिक आव्हानांमध्ये, समाजातील सर्व वर्गांतील स्त्रियांचा समावेश करून सर्व स्तरावर समानता साधण्याचं आव्हान आज स्त्रियांपुढे उभे ठाकलेले आहे. विशेषतः अधिकार, व्यावसायिक स्थिती, आणि सामाजिक सहभागितेच्या क्षेत्रात हे आव्हान जोर धरून आहे . सर्व स्त्रियांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या पुढच्या भविष्यकालीन मानसन्मान आणि उपलब्धीसाठी ही भविष्यकालीन आव्हाने प्रत्येक स्त्रियांनी समर्थपणे याचे नियोजन करणे आवश्यक आहे. शास्त्रीय आणि वैचारिक दृष्टीने स्त्रियांनी वैचारिक स्तर वाढविणे आवश्यक आहे. जर..स्त्रिया स्वतःहून घरा बाहेर पडून, स्वतःच्या विचारांचा वैज्ञानिक स्तर वाढविण्यासाठी समाजातील धार्मिक विचारांचं आणि संस्कृतीचं उच्चस्तरीय जतन करणे आवश्यक आहे. स्त्रियांना स्वास्थ्य आणि सुरक्षिततेसाठी सुरक्षित आवास आणि स्वास्थ्य सेवांकडून सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. डिजिटल सामाजिकीकरणात स्त्रियांचा सक्रिय सहभाग असणे खूप आवश्यक आहे. स्त्रियांसाठी सुरक्षित स्वास्थ आणि स्वास्थ्य कराची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. याबद्दल जी काही माहिती शासनाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे, याचे संपूर्ण ज्ञान देणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे सामाजिकपूर्ण वातावरण सुरू करणे आणि यात सहभागी करून घेणे खूप आवश्यक झाले आहे. 2024 मध्ये स्त्रियांपुढील आर्थिक आव्हानांमध्ये स्त्रियांना समान वेतन देणे आणि वेतन असमानता नष्ट करणे आवश्यक आहे. स्त्रियांना समान वेतनाची खात्री देण्याचं आव्हान आपल्यापुढे येऊन पडले आहे. या आव्हानाला असमान वेतनातून मुक्त करणे, हाच एक पर्याय आहे. स्त्रियांना उद्योजक बनवण्यासाठी, त्यांना भरीव अशी मदत करणे आवश्यक आहे. त्यांचा कल व्यवसायिकते कडे वळवण्यासाठी भारत सरकारनेही काही पावले उचलली आहेत, पण त्यांच्यापर्यंत ही सर्व मदत पोहोचत नाही. म्हणून स्त्रियांनी स्वतःची व्यवसायिक स्थिती सुधारण्यासाठी आणि स्त्री उद्योजिका बनण्यासाठी भारत सरकारकडून मदत घेणे आवश्यक आहे. यासाठी सर्व स्त्रियांनी एकमेकांना सहयोग करणे आवश्यक आहे . भारत सरकारने स्त्रियांना संपूर्णपणे आर्थिक संरक्षण देण्यासाठी त्यांचे वित्तीय सशक्तिकरण करणे आवश्यक आहे. सरकारच्या वित्तीय निर्णयात स्त्रियांच्या वित्तीय सक्षमीकरणाचे योगदान असणे आवश्यक आहे. तरच....स्त्रिया आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि मजबूत बनतील. स्त्रीयांना नेहमी त्यांच्या कौटुंबिक दायित्वांमध्ये समर्थन करणे आवश्यक आहे. स्त्रियांनी आधुनिक कौशल्ये शिकण्यासाठी, त्यांनी त्यांच्यामधील त्याचे ज्ञान आणि कौशल्य चे आकलन वाढवणे आवश्यक आहे. ज्ञान आणि कौशल्य विकास झाला तर...स्त्रिया स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात. त्यासाठी भारत सरकार त्यांना वेळोवेळी कर्जाच्या स्वरूपात किंवा कार्यशाळेच्या स्वरूपात मदत करीत असते. ज्ञान आणि कौशल्यांमध्ये वृद्धि करणे हे देशातील प्रत्येक स्त्रीचे आद्य कर्तव्य आहे. आज आपण विज्ञान-तंत्रज्ञान, इंटरनेट बिसलरी ,टॅबलेट तसेच ए आय च्या युगात वावरत असलो तरी....त्याचे दुष्परिणाम फक्त स्त्रियांनाच का भोगावे लागतात ? याचे कारण अजूनही कुणाला समजू शकले नाही. गेल्या काही वर्षापासून लग्नाच्या बाजारातली स्थिती थोडीफार बदलली असली तरी....पण स्त्रियांवरील अत्याचारात काहीही बदल झाला नाही. म्हणून आज स्त्रियांनी 2024 मध्ये स्वतःवर अत्याचार होऊ न देता अगदी निर्भयपणे जीवन जगले पाहिजे. यासाठी तिने प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घ्यायला हवी. ही उंच भरारी तिच्या बळकट अशा पंखांची असायला हवी. ज्या पंखांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक शक्तीचे भविष्यकालीन बळ असायला हवे. भविष्यकालीन आव्हाने पेलण्यासाठी ती उद्या म्हणजेच 2024 मध्ये ,खूप सक्षम आणि मजबूत होईल. असे म्हणायला हरकत नाही. अलविदा 2023...!*

# ग्लोरी इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी चमकले

आधुनिक केसरी न्यूज




**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पंचायत समिती खंडाळा शिक्षण विभाग व पंचक्रोशी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जवळे लोहोम फाटा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ ते २८ डिसेंबर दरम्यान तालुकास्तरिय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.यावेळी विविध उपकरणांचे सादरीकरण विद्यार्थी यांच्या कडून करण्यात आले. यातून उत्कृष्ट उपक्रमास क्रमांक ही देण्यात आले. तसेच सहभागा बद्दल प्रमाणपत्र ही देण्यात आले.शिरवळ येथील ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कलने सुद्धा या विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला होता.शिवाय या शाळेचे विद्यार्थी सुद्धा या प्रदर्शनातून चमकले.प्राथमिक गटातून आदित्य दादा आवारे व प्रणव दत्तात्रय टकले यांनी द्वितीय क्रमांक पटकावला."गारबेज शॉरटींग अँड रिसायक्लिंग" हे उपकरण बनविण्यात आले होते.या उपकरणा बद्दल दोघांना व्दितीय क्रमांक देण्यात आला.हे यश मिळविल्याबद्दल दोघांचे कौतुक करण्यात आले.तसेच अनिकेत सिंग व यश राजभर या दोघांनी सुद्धा या विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला होता. या सहभागाबद्दल या दोघांनाही प्रमाणपत्र देण्यात आले.शाळेचे अध्यक्ष जितेंद्र भणगे,उप मुख्याध्यापक वैशाली भणगे यांनी अभिनंदन केले.त्याचबरोबर संबंधित विद्यार्थ्यांचे पालक दादा आवारे यांनी सुद्धा आपल्या पाल्याच्या कामगिरी बद्दल विशेष समाधान व्यक्त केले.तसेच ग्लोरी स्कूलचे कौतुक सुद्धा केले.विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या माध्यमातून केले जात असल्याने या यशाने शाळेच्या नावलौकिकात भर पडत आहे.विविध उपक्रमात ही शाळा सहभाग घेत असल्याने शाळेचे कौतुक होऊ लागले आहे.या यशामुळे शिरवळ व पंचक्रोशी मध्ये ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूल ची एक चांगली ओळख निर्माण होत असून विविध उपक्रमातून शाळेचा सहभाग पाहायला मिळत आहे.एक आदर्श उपक्रमातील शाळा असा निर्माण करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे शाळेचे अध्यक्ष जितेंद्र भणगे यांनी म्हटले आहे.विद्यार्थ्यांना विज्ञान विषय शिक्षिका विद्या भारती,सविता कांबळे, किरण खोपडे, ओमिका चौधरी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. व्दितीय क्रमांक मिळविलेल्या आदित्य दादा आवारे व प्रणव दत्तात्रय टकले या दोघांची निवड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी करण्यात आली.



# मागोवा २०२३ : महावितरण छत्रपती संभाजीनगर परिमंडल



ज्ञानेश्वर आर्दड
जनसंपर्क अधिकारी, महावितरण
संपर्क क्र. : 9850107300

आधुनिक केसरी

**ग्राहकाभिमुख अभिनव उपक्रमांनी गाजले वर्ष वीज ग्राहकांना दर्जेदार सेवा मिळावी यासाठी महावितरण सातत्याने प्रयत्न करत आहे. सरत्या वर्षात छत्रपती संभाजीनगर परिमंडलातही मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या अभिनव उपक्रमांमुळे ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळाली. 'लिडिंग फ्रॉम द फ्रंट' या उक्तीप्रमाणे डॉ.केळे यांनी स्वतः फिल्डवर उतरून परिमंडलातील सर्व अभियंते, अधिकारी, कर्मचारी, जनमित्र, यंत्रचालक यांच्या साथीने अनेक चांगले उपक्रम राबविले. नवीन वीजजोडणी, तक्रारींचा निपटाऱ्यास वेग : शासनाच्या 'इझ ऑफ लिव्हिंग' संकल्पनेनुसार ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्यासह सर्व सेवा तत्परतेने देण्याचे आदेश महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिलेले आहेत.**

यात छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने नवीन वीजजोडणी तत्परतेने देण्यासह खंडित वीजपुरवठा, बिलिंग व ग्राहकांच्या इतर तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यात राज्यात आघाडी घेतली. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रलंबित वीजजोडणी देणे, ग्राहकांच्या वीजपुरवठ्याच्या तक्रारी, बिलिंगच्या तक्रारी, इतर तक्रारी निर्धारित कालावधीत निकाली काढणे तसेच वितरण रोहित्र वेळेत बदलणे या पाच मुद्द्यांवर काम करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार मिशन मोडवर काम करत वीजजोडण्या तत्परतेने देण्यासह तक्रारींचा निपटारा करण्यात आला. परिमंडलात सर्व तक्रारींचे प्रलंबन अवघ्या एका दिवसावर आले आहे. महावितरणमधील इतर परिमंडलांच्या तुलनेत हे प्रमाण सर्वात कमी आहे. वीजपुरवठा बंदच्या तक्रारींचे निवारण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच ग्राहकांना वीजपुरवठा करणारे वितरण रोहित्र नादुरुस्त झाल्यास ते तत्परतेने बदलण्यातही परिमंडलाने आघाडी घेतली आहे.

**रोहित्र नादुरुस्तीच्या प्रमाणात लक्षणीय घट**
मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या पुढाकारातून रोहित्रांचा प्रणालीत समावेश, वीजचोरीविरुद्ध धडक मोहीम व नियमित देखभाल-दुरुस्ती या त्रिसूत्रीद्वारे रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण कमी झाले आहे. डॉ. केळे यांनी मे महिन्यात पदभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या पहिल्याच आढावा बैठकीत रोहित्र नादुरुस्तीची गांभीर्याने दखल घेतली. अनेक ठिकाणी बसवलेल्या सुमारे ८ हजार रोहित्रांची नोंद महावितरणच्या प्रणालीत करताच रोहित्र नादुरुस्तीचे पूर्वीच्या संख्येनुसार असलेले प्रमाणही आपोआप घटले.

**वीजचोरांवर धडक कारवाई :** वीजचोरीमुळे रोहित्रावर भार येऊन ते नादुरुस्त होते. त्याबरोबरच महावितरणचे आर्थिक नुकसानही होते. त्यासाठी मुख्य अभियंता डॉ.केळे यांच्या निर्देशाने प्रत्येक महिन्यातील किमान तीन दिवस केवळ वीजचोरी पकडण्याची मोहीम राबवण्यास सुरुवात झाली. ज्या विद्युत वाहिनीवर वीजगळतीचे प्रमाण अधिक आहे, त्या भागात इतर भागातील कर्मचाऱ्यांनीही भाग घेऊन एकाचवेळी कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. त्यानुसार परिमंडलातील प्रत्येक शाखेत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सलग काही दिवस केवळ वीजचोरीविरोधातील धडक मोहीम राबवण्यात येते. गेल्या सहा महिन्यात ८ हजार जणांवर कारवाई करत ९ कोटी रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात यश मिळाले. तसेच तब्बल १२२६ जणांवर थेट पोलिसांत गुन्हे नोंदवण्यात आले. त्यामुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे. नियमित कारवाईमुळे महावितरण्याच्या महसूलवाढीमुळे रोहित्रे सुस्थितीत राहण्यासही मदत होत आहे.

बिडकीन उपकेंद्राला आयएसओ नामांकन
बिडकीन येथील ३३ केव्ही विद्युत उपकेंद्राला राज्यात दुसरे तथा मराठवाड्यातील पहिले आयएसओ मानांकन मिळाले. यासाठी परिश्रम घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता डॉ.केळे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. परिमंडलातील उर्वरित उपकेंद्रे व महत्त्वाच्या आस्थापनांनीही बिडकीन उपकेंद्राचा आदर्श घेत आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवे आणि वीजग्राहकांना दर्जेदार व तत्पर सेवा द्यावी, असे आवाहन डॉ.केळे यांनी यावेळी केले.

**कृषी ग्राहकांना वीजजोडणी प्रमाणपत्रे :** शासनाच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात आलेले 'शासन आपल्या दारी' अभियान कन्नड येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत राबवण्यात आले. या अभियानात कन्नड तालुक्यातील २८ कृषी ग्राहकांना प्रादेशिक कार्यालयाचे तत्कालीन सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात वीजजोडणी प्रमाणपत्रे वाटण्यात आली.

**वितरण पेट्यांचे ३ हजार दरवाजे केले बंद :** विद्युत यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासाठी डीपीवरील वितरण पेट्यांचे उघडे दरवाजे बंद करण्याची मोहीम परिमंडलात ८ सप्टेंबर रोजी राबविण्यात आली. एकूण ३२८३ उघड्या वितरण पेट्यांचे दरवाजे बंद करण्यात आले. मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी स्वतः पाहणी करीत शहरातील अनेक उघड्या वितरण पेट्यांचे दरवाजे बंद केले. विद्युत सुरक्षेसाठी वितरण पेट्यांचे दरवाजे मोहीम त्यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आली. विविध कारणांनी अनेकदा डीपीवरील वितरण पेट्यांचे दरवाजे उघडे व तुटलेले दिसतात. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा उपाययोजना म्हणून सर्व उघड्या वितरण पेट्यांचे दरवाजे स्वयंस्फूर्तीने एकाचवेळी बंद आले. परिमंडलातील सर्व अभियंते व जनमित्रांनी ही मोहीम यशस्वी केली. वितरण पेट्यांचे उघडे दरवाजे व नंतर ते बंद केल्याची छायाचित्रे घेऊन परिमंडल कार्यालयास अहवाल पाठविण्यात आला.

**५ हजारांहून अधिक रोहित्रे, विद्युत खांब वेलीमुक्त :** ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा व विद्युत यंत्रणेच्या सुरक्षिततेसाठी रोहित्रे तसेच खांबांवरील वेली व झुडपे काढण्यासह उपकेंद्रांतही स्वच्छता करण्याची मोहीम परिमंडलात १० ऑक्टोबर रोजी राबविण्यात आली. एकूण ५१०० ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी विविध ठिकाणी स्वतः पाहणी करीत मोहिमेत सहभाग घेतला. पावसाळ्यात रोहित्रे, विद्युत खांबावर वेली व झाडेझुडपे वाढलेली होती. पावसाळा संपताच दसरा व दिवाळी सणांच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा मिळावा आणि सुरक्षा उपाययोजना म्हणून परिमंडलात एकाचवेळी विद्युत खांब व रोहित्रांवरील वेली व झुडपे काढण्याची मोहीम स्वयंस्फूर्तीने वेळेत राबविण्यात आली.

'प्रकाशयात्री : डॉ. मुरहरी केळे' विशेषांकाचे प्रकाशन
ऊर्जा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे अभियंता, साहित्यिक डॉ. मुरहरी केळे यांच्या व्यक्तिमत्त्वावरील डॉ. शिवाजी तिकांडे व दत्ता किवने यांनी संपादित केलेल्या 'प्रकाशयात्री : डॉ. मुरहरी केळे' या विशेषांकाचे प्रकाशन एमजीएम विद्यापीठात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. मुरहरी केळे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असून महावितरणमध्ये कर्तव्य पार पाडत असतानाच साहित्य, चित्रपट, अध्यात्म अशा विविध क्षेत्रांत ते उल्लेखनीय कार्य करत आहेत. आज सामाजिक, नैतिक चारित्र्य संपत चाललेले असताना एका अधिकाऱ्याला मानणारा व त्यांच्यावर प्रेम करणारा खूप मोठा कर्मचारीवर्ग आहे. म्हणूनच डॉ.केळे हे कर्मचाऱ्यांसाठी एका दिव्याप्रमाणे पथदर्शी, ऊर्जावान व्यक्तिमत्त्व ठरले आहेत, असे गौरवोद्गार मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी या समारंभात काढले. यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कवी इंद्रजित भालेराव, ज्येष्ठ पत्रकार दयानंद माने, निवृत्त सनदी अधिकारी डॉ. नरेश गिते, मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे उपस्थित होते.

**संघटना व प्रशासन सुसंवाद बैठक :** ग्राहकांना अखंडित, दर्जेदार वीजपुरवठा व विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महावितरण सातत्याने प्रयत्नरत आहे. कंपनीसमोर वीजबिल वसुलीसह अनेक आव्हाने आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी कर्मचारी संघटना व प्रशासनाने एकत्रितपणे प्रयत्न केल्यास महावितरण आणखी प्रगतिपथावर जाईल, असे प्रतिपादन मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी केले. परिमंडलातील विविध कामगार व कर्मचारी संघटनाच्या पदाधिकाऱ्यांशी डॉ.केळे यांनी थेट संवाद साधत त्यांची मते जाणून घेतली. ग्राहकसेवा, महसूलवाढ, अखंडित वीजपुरवठा, विद्युत सुरक्षा, वीज बचत, वीजचोरी व वीजगळती रोखणे, ऑनलाईन सेवांबाबत विविध संघटनांच्या केंद्रीय व परिमंडल स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांबाबत त्यांनी समाधान व्यक्त करून प्रशासन त्यांचा सकारात्मक विचार करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. यावेळी नाशिक परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांचे 'तणावमुक्ती व दैनंदिन कामकाज' यावर विशेष व्याख्यान झाले.

**वर्धापनदिन सोहळ्याने मिळाली नवी ऊर्जा :** कथाकथन, एकपात्री नाट्यप्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी खेळ अशा भरगच्च कार्यक्रमांनी महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ग्राहकांना अविश्रांत सेवा देणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना या सोहळ्यामुळे नवी ऊर्जा मिळाली. यावेळी मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी मार्गदर्शन केले. विद्युत क्षेत्रातील बदलत्या धोरणामुळे खासगी कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी कर्मचाऱ्यांना सक्षम व्हावे लागेल. कंपनीला १८ वर्ष पूर्ण झाली असून आता आपण प्रौढ झालो आहोत, त्यानुसार आपले वागणे आणखी जास्त जबाबदारीचे असणे अपेक्षित आहे. डॉ.केळे यांनी संत तुकारामांच्या अभंगातील दाखले देत विजेचा निःपक्षपातीपणा आणि विजेच्या बचतीचे बचतीचे महत्त्व पटवून दिले. यावेळी प्रा.रवींद्र कोकरे यांच्या खुमासदार शैलीतील कथाकथनाने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. संदीप पाचंगे यांच्या 'चुकीला माफी नाही' या एकपात्री प्रयोगाने विद्युत सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. दिलीप खंडेराय व संचाने सादर केलेल्या 'महाराष्ट्राची लोकधारा' या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

**पथनाट्य, रॅलीद्वारे योजनांचा जागर :** वर्धापनदिनानिमित्त मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या नेतृत्वाखाली परिमंडल कार्यालय ते सूतगिरणी उपकेंद्र अशी मोटारसायकल रॅली व महावितरणच्या सेवा, वीजबिल नियमित व ऑनलाईन भरण्याचे आवाहन, ऊर्जा बचत, वीजचोरीचे दुष्परिणाम, बनावट मेसेजपासून सावधान आदी विषयांची माहिती देणारा चित्ररथ काढून जनजागृती करण्यात आली. मध्यवर्ती बस स्थानक, पैठणगेट, शहानूरमिया दर्गा परिसर व पुंडलिकनगर रोड व सूतगिरणी उपकेंद्र परिसरात कर्मचाऱ्यांनी पथनाट्य सादर केले. महावितरणच्या सेवा, वीजबिल नियमित व ऑनलाईन भरण्याचे आवाहन, ऊर्जा बचत, विद्युत सुरक्षा, वीजचोरीचे दुष्परिणाम, बनावट मेसेजपासून सावधान आदी विषयांवर पथनाट्यातून प्रबोधन सादर करण्यात आले.

**खासगी गटातील उद्योजकांना सुरळीत वीज**




वाळूज एमआयडीसीलगतच्या खासगी गट नंबरमधील उद्योगांना दर्जेदार, सुरळीत वीजपुरवठा करण्याची उद्योजकांची अनेक दिवसांची आग्रही मागणी होती. यावर महावितरणने उपाययोजना करत नवीन ३३ किव्हो वाहिनी टाकल्यामुळे या भागातील उद्योजकांना अखंडित, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा मिळत आहे. ३ जुलै रोजी सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे, 'मसिआ'च्या पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन ३३ किव्हो वाहिनी कार्यान्वित करण्यात आली. वीजपुरवठ्याचा प्रश्न निकाली काढल्याबद्दल उद्योजकांनी समाधान व्यक्त केले आणि तत्पर कार्यवाहीबद्दल महावितरणचे आभार मानले.

**कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप :** कामगार कल्याण मंडळाच्या भजन स्पर्धेत उत्तेजनार्थसह वैयक्तिक गायनात प्रथम पारितोषिक मिळवणाऱ्या तसेच विविध उपक्रमांत भाग घेणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा गौरव मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यावरण रक्षण चळवळीत सक्रीय भाग आणि 'गो-ग्रीन' योजनेत मोठ्या संख्येने वीज ग्राहकांची नोंदणी करणारे कर्मचाऱ्यांचाही डॉ.केळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. परिमंडलात स्थापन करण्यात येणाऱ्या 'क्वालिटी सर्कल'च्या माध्यमातून उपक्रमशील कर्मचाऱ्यांच्या नवनवीन संकल्पनांचा उपयोग ग्राहक सुविधा, दैनंदिन कामकाज अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी केला जाईल, असे डॉ.केळे यावेळी म्हणाले.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांची आढावा बैठक :** महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी छत्रपती संभाजीनगर येथे प्रादेशिक कार्यालयांतर्गत असलेल्या तिन्ही परिमंडलाच्या संयुक्त आढावा बैठकीला मार्गदर्शन केले. वीज ही मूलभूत गरज असल्याने ग्राहकांना सर्वोत्तम सेवा द्या. त्यांच्या तक्रारींचा वेळीच निपटारा करा. याबरोबरच थकित वीजबिल वसुलीसही प्राधान्य द्या, असे निर्देश त्यांनी दिले. पायाभूत सुविधांची गरज नसलेल्या भागात २४ ते ४८ तासात नवीन वीज जोडणी देण्यावर भर देतानाच विश्वसनीय आणि दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी आपण सर्वांनी तत्पर असणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. यावेळी संचालक (संचालन) संजय ताकसांडे, संचालक (मानव संसाधन) अरविंद भादीकर, मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे, भुजंग खंदारे आदी उपस्थित होते.

**डॉ.केळे यांना साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष व उद्घाटकाचा बहुमान :** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने नागपूर येथे झालेल्या ३० व्या नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांना मिळाला. नवोदितांनी चाकोरीबाहेरचे आणि फक्त नवीन तंत्रज्ञानाचे विषय हाताळावेत, असे आवाहन संमेलनाध्यक्ष डॉ.केळे यांनी केले. विद्युत क्षेत्रात काम करत असल्याने त्यांनी 'मराठी साहित्यातील विजेचे चित्रण' यावर भाष्य करताना कवी कालिदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, सुरेश भट, कवी ग्रेस, विठ्ठल वाघ, लोकनाथ यशवंत व बाबाराव मुसळे यांचे अनेक दाखले यांनी दिले. आपल्या भोवतालचे जग अतिशय वेगाने बदलत असल्यामुळे त्याची नोंद घेऊन साहित्यिकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लोन, रोबोट विषयही हाताळण्याचे आवाहन नवोदितांना केले.

भारतमाता ज्ञानपीठातर्फे सांगली जिल्ह्यातील विटा येथे झालेल्या ४२ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. मुरहरी केळे यांच्या हस्ते झाले. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक प्रा.रंगनाथ पठारे संमेलनाचे अध्यक्ष होते.

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची बैठक
ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी महापारेषण व महावितरणच्या विविध योजनांच्या ६ ऑक्टोबर रोजी परिमंडल कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत दिली. तसेच विभागीय आयुक्त कार्यालयात २० ऑक्टोबर रोजी झालेल्या समन्वय बैठकीत महावितरणच्या विविध कामांसाठी संबंधित सर्व शासकीय विभागांनी आवश्यक त्या परवानग्या तातडीने देण्याचे निर्देश दिले. उपकेंद्रांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. बैठकांना महावितरणचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे उपस्थित होते.

**स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांची संवाद मोहीम :** लोकप्रतिनिधींच्या वीजविषयक समस्यांच्या निराकरणासाठी, त्यांना वीज क्षेत्रात सुरु असलेल्या कामांची माहिती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कपंनीचे संचालक विश्वास पाठक यांनी वर्षाच्या अखेरीस महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि महाऊर्जा या चारही वीज कंपन्यांतील अधिकाऱ्यांच्या छत्रपती संभाजीनगर व जालना येथे जिल्हानिहाय स्वतंत्र बैठका घेत विविध विषयांवर संवाद साधला. तसेच एप्रिल महिन्यात 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' ची माहिती देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषद घेतली.

गांधेली उपकेंद्राचा विद्युत निरीक्षकांकडून गौरव
विद्युत सुरक्षेसाठी उल्लेखनीय कामगिरीबद्दल ३३ केव्ही गांधेली उपकेंद्राचा विद्युत निरीक्षण विभागाने प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. विद्युत निरीक्षक कार्यालयाने उपकेंद्राचे निरीक्षण केले असता विद्युत अधिनियम-२००३ व केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युतपुरवठ्यासंबंधीचे उपाय) विनियम-२०२३ मधील तरतुदीचे पालन झाल्याचे तसेच उपकेंद्रातील विद्युत संच मांडणी सुस्थितीत व सुरक्षित असल्याचे तसेच विविध नोंदवह्या अद्ययावत असल्याचे आढळले. महावितरणकडून उपकेंद्रात उल्लेखनीय काम झाले असून, शासनाचे शून्य अपघात धोरण आपण अंगीकृत केले असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

**ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त प्रबोधन :** २० डिसेंबर रोजी परिमंडल कार्यालयात ऊर्जा संवर्धन सप्ताहा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. ऊर्जानिर्मितीसाठी लागणाऱ्या कोळशासह इंधनाचे साठे नजीकच्या भविष्यात संपतील. त्यामुळे ऊर्जासंवर्धन हे दैनंदिन जीवनाचे तत्त्व व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. ऊर्जा संवर्धनासाठी कायदे असले तरी सर्वांनीच स्वयंस्फूर्तीने प्रयत्न करायला हवे. विद्यार्थ्यांचे प्रबोधन केल्यास हे उद्याचे नागरिक ऊर्जा संवर्धनाबाबत सजग राहतील. तसेच विजेचा वापर आवश्यक तेवढाच करायला हवा. विजेबरोबरच इंधन बचतीवरही सर्वांनी भर द्यायला हवा, असेही डॉ.केळे म्हणाले.

**राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन :** महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद छत्रपती संभाजीनगर परिमंडलास मिळाले आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडांगणावर होणाऱ्या या स्पर्धेत महावितरणच्या १६ परिमंडलांचे ८ संयुक्त संघ सहभागी होणार आहेत. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेची जोरात तयारी सुरू असून, स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

# ॐ सर्वे भवन्तु सुखिनः।



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**ॐ सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःख भाग्भवेत्।। 'सगळे सुखी होवोत, सगळे रोगमुक्त राहोत, सगळे चांगल्या आणि मंगल घटनांचे साक्षिदार बनोत आणि कोणाच्याच वाट्याला दुःख न येवो' असा हा या चार ओळींचा भावार्थ आपल्या प्रत्येकाला व्यापक होण्याची आणि सर्वांचे हित चिंतण्याची महान शिकवण देतो. ख्रिस्ती नववर्षाचे स्वागत करताना भूतकाळातील सर्व हेवेदावे विसरून सर्वांनी हा संकल्प करायला हवा ! सामूहिक प्रार्थनेत आणि सामूहिक उपासनेत प्रचंड बळ असते. 'संघ शक्ती कलौयुगे' हा कलियुगाचा मंत्र आहे याचा अर्थ कलियुगात संघटनेतच सामर्थ्य आहे.**

जेव्हा एखादी प्रार्थना एकत्रितपणे समूहाने केली जाते तेव्हा त्यामध्ये संकल्पशक्ती निर्माण होते. अशी प्रार्थना फलद्रुप होण्याची शक्यता अधिक असते. सामूहिक प्रार्थनेने वातावरणात सकारात्मक स्पंदने निर्माण होतात आणि मनाला त्यातून सकारात्मक ऊर्जा मिळते. सामूहिक प्रार्थनेचे महत्व आपल्याला शालेय जीवनापासून शिकवले जाते. शाळा भरण्याच्या आरंभी विद्यार्थ्यांकडून सामूहिक प्रार्थना करवून घेतली जाते जेणेकरून निर्माण होणाऱ्या सकारात्मक ऊर्जेने विद्यार्थ्यांच्या बुद्धीवरील आवरण नष्ट होऊन शालेय अभ्यासात त्यांचे मन लागावे. अनेक संप्रदाय, संघटना आणि संस्थांमध्येही सामूहिक उपासनेचे महत्व बिंबवले जाते, इतरांकडून ती करवून घेतली जाते. एकट्याने प्रार्थना करणे आणि तीच प्रार्थना सामूहिकपणे करणे यातील परिणामकारकता भिन्न असू शकते. आपण जेव्हा एकट्याने प्रार्थना करतो तेव्हा मनातील विविध विचारांमुळे आपले मन भरकटून अन्यत्र जाऊ शकते. सामूहिक प्रार्थना करताना आजूबाजूला सर्वजण तीच प्रार्थना करत असल्याने आपले मन एकाग्र होण्यास साहाय्य होते त्यामुळे ती मनापासून होते परिणामी तिची परिणामकारकताही वाढते. कुतूहल म्हणून हा प्रयोग आपणही करून पाहू शकतो. एकट्याने आणि संघटितपणे प्रार्थना केल्यावर मनावर त्याचे काय पडसाद उमटतात हे आपण स्वतःही अनुभवू शकतो. देवाचीही आरतीही आपण एकत्रितपणे करतो त्यामुळे ती अधिक सात्विक होते. राष्ट्रगीत, देशाप्रतीची प्रतिज्ञाही आपण सामूहिकपणे घेतो. त्यामुळे यंदा नववर्षाच्या आरंभी सर्वांच्या कल्याणाकरिता सामूहिक प्रार्थना करूया ! संघटनेत बळ असते, त्यामुळे पशु पक्षी समूहाने राहतात. समूहाने वावरणाऱ्या पशु पक्ष्यांवर हिंस्त्र प्राणी हल्ला करताना विचार करतात. संघटनशक्तीचे महत्व बिंबवणारी काठीची आणि काठ्यांच्या मोलीची गोष्ट आपल्या लहानपणी आपण सर्वांनीच ऐकली असेल. संघटनेत सुरक्षा असते. देशातील जाती-पातीत विखुरलेल्या समाजाचा लाभ घेऊन मूठभर इंग्रजांनी आपल्य्यावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. आज मराठा समाज संघटीतपणे आरक्षणाची मागणी करत आहे, सभांच्या आणि आंदोलनांच्या माध्यमातून आपले संघटन दाखवून देत आहे, त्यामुळे सरकारलाही त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा संकल्प केल्यावर सर्वप्रथम विखुरला गेलेला मराठा आणि हिंदू समाज एका विचाराखाली एकत्र आणण्यास सुरुवात केली. आदिलशहा, मुघल बादशहा आदींच्या दरबारात चाकरी करणाऱ्या शूरवीर मराठा योध्यांचे प्रबोधन करून त्यांना स्वराज्यात सामील करून घेतले. आज पुन्हा हिंदू समाज जाती-पातींच्या आणि पक्षांच्या विभागणीत विखुरला गेला आहे. राजकीय मंडळी आपल्या राजकीय स्वार्थासाठी समाजात जाती-पातीचे विष पेरत आहेत. धर्मनिरपेक्षतेचे नको तेव्हढे अवडंबर माजवले जात आहे. त्यामुळे आज कोणीही उठतो आणि हिंदूच्या देवतांविषयी, सण-उत्सवांविषयी, प्रथा परंपरांविषयी नको ते बोलतो, अवतारांना आणि धर्मग्रंथांना काल्पनिक म्हणून हिणवतो, हिंदूंच्या प्रथा परंपरांना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून हिंदूंना डिवचण्याचा प्रयत्न केला जातो. हिंदूंची मंदिरे फोडणाऱ्या, तलवारीच्या धाकावर हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या आणि हिंदूंच्या बायाबापड्यांना नासवणाऱ्या आक्रमकांचा



जाहीरपणे उदोउदो केला जातो. हिंदूंना देवतास्वरूप असणाऱ्या गोमातेच्या प्रतिदिन सर्रासपणे कत्तली केल्या जातात, हिंदूंच्या उत्सवांवर, मिरवणुकांवर बंधने आणली जातात. देशात ८० टक्के हिंदू असूनही आज हिंदूंची ही अवस्था आहे. ही स्थिती बदलण्यासाठी हिंदूंनी आज जाती-पातीची आणि पक्षांची बंधने झुगारून संघटित होणे नितांत गरजेचे आहे. हिंदू सहिष्णू आहे. विश्वबंधुत्वाची भावना त्याच्या रक्तातच आहे, त्यामळे संख्येने बहुसंख्य असूनही देशातील पंथनिरपेक्षता टिकून आहे. आज देशात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. आदर्श राज्य म्हणून आजही जगात ;रामराज्या'ची उपमा दिली जाते. संत ज्ञानेश्वर महाराज पसायदानातून विश्वाच्या कल्याणाचे देणे भगवंताकडे मागतात. या भारतभूमीत होऊन गेलेला सर्वच संत महात्म्यांनी आपल्या अभंगांतून आणि लिखाणातून भगवंताकडे विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. विश्वकल्याणासाठी विविध यज्ञयाग आणि होमहवन करण्याची संकल्पना हिंदू धर्माच्या शिकवणुकीचाच भाग आहे. याच व्यापक शिकवणीतून आज विश्वाच्या कल्याणासाठी, विश्वातील दारिद्र्य, दुःख, निराशा नष्ट होऊन प्रत्येक जण सुखी समाधानी आणि सज्जन होण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना करूया !

# नवीन वर्षाचे स्वागत करावे पण...?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**सरत्या वर्षाला वंदन करते तसेच नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा देते.आज तिकडे,तिकडे नवीन वर्ष मोठ्या उत्साहाने साजरा करताना बघायला मिळत आहे एवढेच नाही तर एकमेकांना भरभरून शुभेच्छा दिले जात आहे अतिशय चांगली गोष्ट आहे. दरवर्षी नवीन वर्ष येतो आणि निघून जातो पण,नवीन वर्षाला निरोप देताना का बरं एवढा आनंद होत असेल. ..? हा एक भारी मोठा प्रश्न आहे म्हणजेच कुठेतरी सरत्या वर्षाला कंटाळले तर नसतील ..? की,अजून पुन्हा काही असू शकते असो, पण,नवीन वर्षाचे जेवढ्या उत्साहाने स्वागत करताना सरत्या वर्षाला कधीही विसरू नये. कारण त्या सरत्या वर्षाने सर्वांना बरेच काही दिले आहे.**

प्रत्येक घरी सरत्या वर्षात फक्त कॅलेंडरच असतो असे नाही तर त्या वर्षात सुध्दा आपल्या सुखा, दुःखात मदत करणारे मित्र, मैत्रीणी,संगे,सोयरे आपुलकीचे लोक असतात तर कोणी ओळखीचे नसताना सुद्धा न कळत मदत करत असतात मग त्यांना कसे बरे विसरून चालेल...? एवढेच नाही तर त्या सरत्या वर्षात मुके,पशू,पक्षी, झाडे, झुडपे, फुले, वेल्या यांनी सुद्धा मदत केली असावी त्यांना विसरून कसं चालेल. ..? त्यांचे तर खूप उपकार असतात त्या उपकारांना कसे बरं विसरायचे आणि का म्हणून . ..? गेल्या सरत्या वर्षाने प्रत्येकाला काही ना काहीतरी शिकायला भाग पाडले असेलच म्हणून नवीन वर्ष येत असताना पाहून त्याला विसरणे योग्य नाही. जसे, उदा. एखाद्या व्यक्तीने सरत्या वर्षात आपुलकीने मदत केली असेल पण, अचानक नवीन वर्षात एखादी व्यक्ती जीवन प्रवासात मिळाली आणि त्याच्याशी अचानक घट्ट मैत्री झाली असेल म्हणून त्या जुन्या व्यक्तीला विसरायचे का. ..? जीवन प्रवासात अनेक लोक भेटत असतात आणि क्षणात निघून जातात पण,सर्वच लोक आपुलकीचे,प्रेमळ नसतात हे,सदैव लक्षात असू द्यावे. गेल्या सरत्या वर्षात फक्त एक दोघांचीच साथ मिळाली असे नाही तर अनेक जणांसोबत नाते जुळून आले आहेत जसे, पुस्तकांशी, बळीराजाशी,गोर,गरींबाशी, सीमेवर लढत असणाऱ्या जवानांशी आणि आपल्या घराशी, कुटुंबांशी त्यांना एका क्षणात विसरून कसे चालेल..? प्रत्येकांनी काहीतरी मोलाचे योगदान दिले आहेत तर कोणी धोका देऊन निघून गेले आहेत त्यांनाही विसरू नये.

ज्यांनी प्रेम दिले ,स्नेह दिला, आदर दिले, काळजी घेतली तर कोणी मदतीला धावून आले ते एखाद्या देवाच्या कमी नसतात ज्यांना विसरून कसे चालेल...? हा आजचा नवीन वर्ष सर्वांना खूप काही देणार आहे पण,सरत्या वर्षाने सुद्धा जगायला शिकवले आहे हे, विसरता कामा नये.वेळ, प्रसंग चांगली, वाईट परिस्थिती भलेही आली असेल तरीही त्यांनी नवी दिशा मात्र दाखवली आहे. कोणी म्हणतात की, जुन्याला लागल्या रून्या पण,जुने हे कधीही सोनेच असते म्हणून जरा जुन्या विषयी विचार करून बघावे. बघता,बघता, वर्ष कसं निघून गेला ते कळलेच नाही वेळ कशी व कधी निघून जाते तेही कळत नाही म्हणून वेळेला महत्व द्यायला शिकले पाहिजे, चांगले काय वाईट काय ओळखता आले पाहिजे, जीवन क्षणभंगुर आहे कधी काय होईल सांगता येत नाही म्हणून व्यर्थ गोष्टींच्या मागे धावण्यापेक्षा जे योग्य व सत्य आहे त्याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. या जीवन प्रवासात भलेही कोणी शेवटपर्यंत साथ देत नसतील तरी जो पर्यंत जीवन आहे तोपर्यंत माणुसकीच्या नात्याने मदत करण्याचा प्रयत्न केले पाहिजे सोबत धरून कोणी काहीच नेत नाही पण,वेळ, प्रसंग जाणून मदत केल्याने एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलू शकते हेच तर सरत्या वर्षाने सांगितले आहे व येणाऱ नवीन वर्ष सुध्दा तेच सांगत आहे. आज येणाऱ्या नवीन वर्षात एकतरी प्रत्येकांनी संकल्प करावे चांगले करण्यासाठी किंवा लागलेली वाईट सवय सोडल्याने जीवन सुखात जाईल. येणारा हा नवीन वर्ष सर्वांचा सुखात जावो, सर्वांना यश देवो, सुख, समृद्धी देवो,निरोगी आयुष्य देवो, अंधश्रद्धेला हाकलून लावो, महिलांचा आदर करायला भाग पाडो आणि प्रत्येकांलाच सत्याच्या वाटेवर चालण्याची शक्तीप्रधान करो हीच मनोभावे प्रार्थना करते. निसर्ग खूप मोठा व अनंत आहे त्याच्या नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न केले पाहिजे माणूस म्हणून माणसासारखे जगले पाहिजे हेच तर खूप काही आहे बाकी सारं व्यर्थ आहे. म्हणून सरत्या वर्षाला आनंदाने निरोप द्यावे पण त्याला विसरू नये व नवीन वर्षाचे स्वागत करावे व जेवढे काही चांगले करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न करावे.

# नवीन वर्षात हे घडावे...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**काल मध्यरात्री बरोबर बारा वाजल्यानंतर पहिल्या सेकंदालाच नवीन वर्ष २०२४ चे आपण सगळ्यांनी जंगी स्वागत केले.आपल्या नातलगांना व मित्रांना नवीन वर्षाच्या अगदी मन भरून शुभेच्छा दिल्या.आता जुने वर्ष २०२३आता भूतकाळात जमा झाले.नवीन वर्षाचे नवे संकल्प आपण केले आहेत.त्यापैकी काही जण केलेले संकल्प पूर्णत्वास नेतात.काही लोक केलेले संकल्प अर्ध्यावर सोडून देतात.आणि बहुतांश लोक नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी केलेले संकल्प दुसऱ्या दिवशी चक्क विसरतात. तसे न करता नवीन वर्षानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करणे अत्यावश्यक आहे.**

तो संकल्प म्हणजे आपण सर्व माणसांनी माणसांशी माणसासम वागणे.होय हा संकल्प नवीन वर्षात पूर्णत्वाला नेणे काळाची गरज बनली आहे. येणाऱ्या नवीन वर्षात या जगातील सगळे युद्ध बंद व्हावेत. युक्रेन-रशिया युध्दाची जखम ओली असतानाच इस्त्रायल व हमास या दोन देशांत सध्या युद्ध सुरु आहे. या युध्दात अनेक निष्पाप लोकांचा व लहान बालकांचा जीव गेला आहे. आज खरेतर कोणतेही युद्ध हे संपूर्ण जगासाठी व समस्त मानवजातीसाठी विनाशकारी असते,मानवतेची हत्या करणारे असते.जगाला युध्दाची नव्हे तर बुध्दांच्या विचारांची खरी गरज आहे.गौतम बुध्दांनी सांगितलेले अहिंसावादी पंचशील व अष्टांग मार्ग अनुसरणे यातच मानव जातीचे कल्याण दडले आहे.म्हणून नवीन वर्षात बुद्धांचे मानवतावादी विचार आपण अंगिकारले पाहिजेत.ज्यामुळे युद्ध करण्याची खुमखुमी लोप पावेल.आजकाल काही दुष्टजण जात व धर्म प्रभावी करत आहेत. आपलाच धर्म चांगला,आपलीच जात चांगली अशी भावना पेरून मानवता कलंकित केली जात आहे.नवीन वर्षात व्यक्तींची ओळख व पारख त्याच्या कर्मावरुन व वर्तनावरुन करण्याची परंपरा विकसित व्हावी.गेल्या वर्षी आपल्या महाराष्ट्रात पाऊस फार कमी झाला.आपल्याकडचे ऋतुमान बदलत आहे.हे सगळे आपण निर्माण करत असलेल्या विविध प्रदुषणांचे परिणाम आहेत. वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे व वाहनांचा गरजेपेक्षा जास्त वापर सुरू आहे.मग हवा स्वच्छ कशी राहील? प्लास्टिकचा वापर सर्रास सुरू आहे,रासायनिक खते व तणनाशके यामुळे मातीप्रदूषण वाढत आहे.याचाही नवीन वर्षात विचार केला जावा. सध्या गोरगरीब जनता महागाईच्या खाईत होरपळत आहे.केवळ श्रीमंतांचे व नोकरदारांचे चोचले न जपता गोरगरिबांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. या नवीन वर्षात गोरगरिबांचे कंबरडे मोडणारी महागाई कमी व्हावी. तसेच भ्रष्टाचार व लाच घेणे व लाच देणे हे ही कायमचे बंद व्हावे.वाढत जाणारी बेरोजगारी कमी व्हावी. सरकारने शक्य असेल तेवढी नोकरभरती नियमितपणे करावी, त्यात खंड पडू नये.स्त्रियांवर वाढत जाणारे अत्याचार कमी व्हावेत. पुरषांनी वासनांध नजरा व हव्यासपणा याला आळा घालावा. नवीन वर्षात विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची सुबुद्धी मिळावी.घराघरांतील रक्ताची सगळी नाती टिकावीत.वृध्द आईवडिलांना वृध्दाश्रमात पाठवण्याची वाईट प्रवृत्ती कायमची बंद झाली पाहिजे. घराघरांतील जेष्ठ नागरिक यांचा आदर व सन्मान केला जावा.त्यांना अडगळीची वस्तू न मानता त्यांचे मार्गदर्शन उपयोगाचे असते हे जाणून घ्या.आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातील राजकारणी लोकांना विकासकामे करण्याची सवय जडावी.सध्या महाराष्ट्रातले राजकारण नाजूक वळणावर आहे. राजकारणी लोकांनी प्रत्येकवेळी आपलेच म्हणणे बरोबर,आम्ही करतो तेच बरोबर हा हेकेखोरपणा सोडून द्यायला हवा. जनतेला मुर्खात काढण्याची राजकीय लोकांची मानसिकता बंद व्हावी. आणि सूज्ञ मतदारांना कोणत्याही अमिषाला व प्रलोभनाला बळी न पडता मतदान करण्याची सवय लागावी. भारतातील मतदारांनी निरपेक्ष पणे उच्चशिक्षित,सुसंस्कृत व विकास कामे करणाऱ्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी मानसिक दृष्ट्या सक्षम होणे काळाची गरज बनली आहे.असे झाले तरच भारत प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून शोभणार आहे.नवीन वर्षांत तरुणांनी व्यसनांचा कायमचा त्याग करुन निर्व्यसनी जीवन जगण्याचा मार्ग अंगिकारावा ही विनंती.नवीन वर्षात एवढे घडावे ही अपेक्षा. सर्वांना नवीन वर्षाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा!

# शौर्याचे नाव भिमा कोरेगाव



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**कोरेगाव भिमाचे नाव जरी उच्चारले तरी मनुवादी, विषमतावादी, आणि विकृती ला संस्कृती मानणाऱ्या, माणसा माणसात भेद करून माणसाला माणसापासून दुर करून त्यांच्या मानसिक गुलामीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन स्वतः ची झोळी भरणाऱ्या लोकांच्या छातीत कळ निघते. त्याला कारणही तसेच आहे. जगाच्या पाठीवर अनेक लढाया होऊन अनेक सत्ता पालट झाले असतील असतील. परंतु कोरेगाव भिमा ची लढाई ही सत्ता पालट होण्यासाठी नव्हे तर समता प्रस्थापित करण्यासाठी होती, कोरेगाव भिमा ची लढाई ही अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधातील होती.**

माणसाने माणसावर अमानुष अत्याचार करून, भेदभाव करून माणसाला नैसर्गिक हक्क अधिकारापासून दुर ठेऊन माणसाला हिन समजणारी निच माणसिकता निर्माण केली होती. हे सर्व कोरेगाव भिमाच्या लढाईने मोडीत काढून जागतिक विक्रम केला. आणि म्हणुनच जगाच्या पाठीवर अनेक लढाया झाल्या असतील परंतु लढाईचा विजय मोठ्या आनंदाने आणि जनसामान्य माणसात साजरा होतो ती लढाई म्हणजे कोरेगाव भिमा. कोणत्याही गोष्टी चा अतिरेक झाला तर तर त्या गोष्टी नष्ट केल्या जातात. याचेच ज्वलंत व शौर्याचे प्रतिक म्हणजे कोरेगाव भिमा येथे उभा असलेला दिमाखदार विजयस्तंभ. विषमतावादी व निच आणि मानवी गुलामीची शिकवन देणाऱ्या मनुस्मृती ला कायदा समजून येथे विषमता खुप वाढली होती. माणसासोबत माणसाने हिन वागुन विषमता पसरवणाऱ्या निच माणसिकतेचे लोक स्वतः ला श्रेष्ठ समजत होते. ज्यांच्या कडे नैतिकता नव्हती, समता नव्हती, लोकांना अज्ञानी ठेऊन, चुकीच्या गोष्टी रचुन, हक्क अधिकार नाकारून लोकांना सर्वांगीण विकासा पासुन दूर ठेऊन स्वतः ला श्रेष्ठ समजणारे किती निच विचाराचे असतील याची कल्पना येते. पेशव्यांचे माणसाला हिन समजून अन्याय अत्याचार वाढले होते. सार्वजनिक ठिकाणी, नैसर्गिक साधनसंपतीचा वापर ही मानसांना करण्यास बंदी होती, सोबत जेवने बसने सोडा पण एकमेकांना स्पर्श करणे येथे पाप अपवित्र समजले जायचे. आणि माणसाच्या स्पर्शाने अपवित्र झालेल्या माणसाला पवित्र करण्यासाठी गाईच्या मुताचा वापर केला जात होता. ज्यांना ह्या गोष्टी पटत असतील ते किती मानसिक गुलाम आणि जे ह्या गोष्टी करत असतील ते किती निच व बुद्धीहीन असतील हे दिसून येते. विषमता, भेदभाव, अस्पृश्यता, किंवा पेशव्यांचे अन्याय अत्याचार हे कोणत्याही एका जातीवर होते हे म्हणने निव्वळ मुर्ख पणाचे आहे. वर्णाचे रूपांतर जातीत करून जेवढ्या जाती निर्माण केल्या त्या सर्व जातीचे शोषण, त्या सर्व जातीवर अन्याय अत्याचार, त्या सर्व जातीबद्दल द्वेष आणि हिन भावना पेवशव्यांना होतीच. इतिहासाचे पान उकलून डोळसपणे आपण आपण इतिहास बघितला तर पेशव्यांनी व त्यांच्या पुर्वजांनी राजा महाराज यांनाही हीन व तुच्छ माणून स्वतः ला श्रेष्ठ समजून इतरांवर अन्याय अत्याचार करून स्वतः ची झोळी भरून घेतली. प्रत्येक जातीवर अन्याय अत्याचार करून विषमतेची जोपासना करणाऱ्या लोकांनी शिक्षणाचा व प्रगतीचा हक्क स्वतः कडे ठेवून इतरांना शिक्षण, ज्ञान व नैसर्गिक हक्का सोबत सामाजिक हक्क अधिकार नाकारले होते. लिहण्याचा अधिकार त्यांच्या कडेच असताना त्यांनी इतिहासाची तोडफोड करून वैचारिक दिवाळखोरी च्या माध्यमातून स्वतः च्या बाबतीत कर्तृत्व नसताना इतिहास लिहून ठेवला. ब्राम्हणेतर लोकांनी पराक्रम केले, इतिहासात सामाजिक शैक्षणिक कार्यात खुप मोठे योगदान देऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आयुष्य खर्ची घालून लोकांना महान बनवले. परंतु लिहण्याचा हक्क नैतिकता नसलेल्या लोकांकडे असल्याने सत्य लिहणज म्हणजे धर्मद्रोह करणे होय. म्हणून इतिहासाची धुळधान करून, इतिहासात लोकांवर अन्याय अत्याचार करून, सर्व सामान्य लोकांचे जगणे असह्य करणाऱ्या पेशवाईने जरा अतिच केले होते. शिवशाई मध्ये एकोप्याने आनंदाने राहणारे लोक, संभाजी महाराजांची हत्या करून शिवशाई संपवून पेशवाई लागु केली आणि लोकांवरचे अन्याय अत्याचार खुपच वाढले. अजून ही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे पेशव्यांचे अन्याय अत्याचार एका जातीवर नव्हते तर सर्व जातीवर होते. पेशव्यांचा अन्याय अत्याचार वाढतच होता. इतिहासामध्ये पेशव्यांनी राजांवरही अन्याय अत्याचार करून त्यांचाही अवमान केला. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळत नव्हती आणि पेशवे राजांना व राजांच्या वंशजांना ही मानसन्मान देत नव्हते म्हणून लोकांच्या मनात पेशव्यां बद्दल चिड निर्माण होऊन अन्याय अत्याचाराचा बदला घेण्याची इच्छा तर मनात ठासून भरली होती. फक्त वाट बघत होते ते योग्य वेळेची. ब्रिटीश सैन्यात असलेल्या बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडीला संधी व वेळ चालुन आली. 31 डिसेंबर 1817 रोजी ब्रिटिश आणि पेशवे यांचे युद्धाची घोषणा झाली. ब्रिटीशांकडून बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी लढणार होती. परंतु



ब्रिटीशांच्या विरुद्ध लढणारे पेशवे हे तिस हजार सैन्यासह चाल करून येत आहेत. आणि बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी मध्ये केवळ 834 च सैनिक असल्याने ब्रिटीशांना आपली हार दिसून आली आणि ऐन वेळेवर ब्रिटिश अधिकाऱ्यांने युद्धातून माघार घ्यायचे ठरवले. बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी मध्ये वेगवेगळ्या जातीचे लोक होते परंतु बहुसंख्य महार जातीचे लोक होते. ब्रिटीशांच्या बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी नेतृत्व कॅप्टन फ्रान्सिस स्टॉंटन हे करीत होते. परंतु जेव्हा त्यांनी माघार घेतली तेव्हा त्यांच्या सोबत 334 सैनिक माघारी आले. परंतु पेशवाईशी लढाई करण्याची संधी आल्याने आपण माघार न घेता अन्याय अत्याचार मुळासकट नष्ट करण्याची हिच सुर्वण संधी समजून बहुतांश महार असलेल्या तुकडीचे नेतृत्व सिदनाक महाराने करून पाचशे सैन्याच्या जोरावर पेशव्यांशी लढाई करण्याचा निर्णय घेऊन. माघे हटण्यास नकार दिला. पाचशे सैन्याचे सिदनाक महार हा नेतृत्व करतो हे ऐकून पेशव्यांच्या तिस हजार सैन्यातील दोन हजार सैन्याने मनोमन हार मानून पळ काढला. मग खरी लढाई झाली ती 2800 पेशवे विरुद्ध पाचशे बहुसंख्य महार लोकांमध्ये. पाचशे शुरविर योद्ध्यांना पेशव्यांचे सैन्य किती आहे हे दिसत नव्हते. पेशव्यांनी अन्याय अत्याचार करून जिवन जगने किती असह्य केले, त्याच्या वेदना किती आहेत, आणि येणाऱ्या पिढीला पेशवाईचे चटके बसु नाही म्हणून पेशव्यांचा खात्मा केल्याशिवाय आनंदाचे दिवस येणार नाही. हेच विचार मनात ठासून भरल्याने 28हजार पेशव्यांच्या विरोधात पाचशे शूरवीर लढले. फक्त लढलेच नाहीत तर विजय मिळवला. फक्त विजयच मिळवला नाही तर पेशवाई संपवुन टाकुन खऱ्या अर्थाने मनुस्मृती चे दहण केले. कारण मनुस्मृती नुसार ब्रम्हहत्या पाप मानले जायचे, ब्रामणाच्या समोर उभे राहणे पाप मानले जायचे परंतु 1 जानेवारी 1818 रोजी पेशवाई संपवून अन्याय अत्याचारी पेशव्यांचे तुकडे तर पाडलेच आणि पुन्हा पेशवा निर्माण होणार नाही अशी भितीच निर्माण करून खऱ्या अर्थाने पेशव्यांचे अर्थात मनुस्मृती चे वर्चस्व नाकारून जागतिक शौर्य सिद्ध केले. ब्रिटीशांनी माघार घेऊन नही केवळ अन्याय अत्याचाराचा बदला घेण्याण्या भावनेतून झालेल्या लढाईत पाचशे लोकांचा विजय झाली नाही तर पाचशे शुरविर लोकांनी क्रांती केली. मराठा साम्राज्याचे रक्षण करण्याचे नाटक करणाऱ्या पेशव्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या हत्येनंतर साधा अंत्यसंस्कार ही करू नये म्हणजे पेशवे छत्रपती घराण्याशी किती बेईमानी करून छत्रपतींचाही अवमान करत होते हे अनेक संदर्भावरून दिसून येते. छत्रपती संभाजी महाराज यांचे अंत्यसंस्कार एका महार माणसाने करून महाराजांची समाधी बांधावी, व त्याच महार लोकांनी पेशवाई संपवून खऱ्या अर्थाने छत्रपती संभाजी महाराज यांना वंदन करावे. यापेक्षा मोठा सन्मान छत्रपतींचा कोणता असू शकतो? महारांचा पराक्रम हा खरचं जागतिक ऐतिहासिक आहे. म्हणून या शौर्याचे महत्व लोकांच्या समोर उभे रहावे. लोकांना शौर्याची प्रेरणा मिळावी म्हणून ब्रिटीशांनी भिमा नदीच्या काठी, कोरेगाव या ठिकाणी जयस्तंभ उभा करून त्या शुरविरांना मान वंदना दिली. लढाई मध्ये जखमी झालेल्या सैन्याच्या उदरनिर्वाहासाठी वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे 265 एकर जमीन देऊन त्यांचा सन्मान करून स्तंभाची देखभाल करण्याची जबाबदारी त्यांच्या वर दिली. भिमा कोरेगाव चा स्तंभ आजही आम्हाला आठवण करून देतो की तुम्ही लढाऊ आहात, तुम्ही स्वाभिमानी आहात, तुम्ही शुरविर आहात, तुम्ही इतिहासच नाही तर भुगोलही बदलु शकता. हि लढाई सत्तेसाठी नसली तरीही समतेसाठी, स्वाभिमानासाठी, अन्याय अत्याचार दुर करण्यासाठी होती म्हणून इतर लढायांपेक्षा सर्वात मोठी व सर्वात शौर्याची लढाई म्हणून इतिहासात नोंद आहे. आणि या शौर्य स्तंभाला दरवर्षी शौर्य लोक वंदन करून आजही शुरविरांचे वंशज शुरच आहेत म्हणून १ जानेवारी दरवर्षी मोठ्या उत्साहाने शौर्यदिन म्हणुन साजरा केला जातो. म्हणून आज जर शौर्याचे नाव विचारले तर सर्वांच्या समोर फक्त भिमाकोरेगाव चे नाव येते. आणि हिच ओळख शुरविरांची आहे.

# इंग्रजी वर्ष साजरे करताना...



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतीय नववर्ष चैत्र शुक्ल ज्याला हिंदू नववर्ष, विक्रम संवत आणि देसी साल असेही म्हणतात. पण गंमत म्हणजे तरुण पिढीला स्वतःच्या संस्कृतीचे ज्ञान नाही. इंग्रजी वर्ष साजरे करणे ही चांगली गोष्ट आहे, परंतु सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे देखील आवश्यक आहे.तरुण पिढीला विक्रम संवताबद्दल कमी ज्ञान असले तरी ते पूर्णपणे अनभिज्ञ नाहीत. इंग्रजी वर्ष साजरे करणे आणि ज्ञान असणे ही चांगली गोष्ट आहे, परंतु सांस्कृतिक वारशाचे रक्षण करणे देखील आवश्यक आहे.**

भारत हा सण-उत्सवांचा देश आहे आणि आपले सर्व सण विक्रम संवत किंवा हिंदू वर्षाच्या तारखांनुसार साजरे केले जातात, तरीही आपल्याला आपल्या वर्षाची माहिती नाही आणि ज्यांना थोडेफार ज्ञान आहे, त्यांच्याकडे फक्त अर्धे-अपूर्ण ज्ञान आहे. आपल्या संस्कृतीचा भाग आहे. अनादर आहे. शाळेत पहिलीच्या वर्गातच मुलांना जानेवारी, फेब्रुवारी वगैरे शिकवले जाते, पण चैत्र, वैशाख, ज्येष्ठ आदी महिन्यांची माहिती एमएपर्यंत कोणत्याही वर्गात दिली जात नाही.
आपल्या संस्कृत वारशाचे रक्षण करण्यासाठी विक्रम संवत्सर माहिती असणे गरजेचे आहे. कारण ते आपल्या श्रद्धेचे केंद्रच नाही तर परंपरेचे मार्गदर्शकही आहे.
हिंदू नववर्ष किंवा विक्रम संवत हे मर्यादा पुरुषोत्तम श्री राम यांच्या काळापासून साजरे केले जात आहे, परंतु हिंदू राजा विक्रमादित्य याने ते एका नवीन स्वरूपात सुरू केले आणि त्यांच्या नावाने त्याला विक्रम संवत असे नाव दिले जाऊ लागले. त्यानंतर मुघल आणि नंतर इंग्रजांनी भारतावर राज्य केले आणि त्यांनी आपली संस्कृती आपल्यावर लादण्याचा प्रयत्न केला, परिणामी आपली संस्कृती मिसळू लागली. तरीही प्राचीन लोकांनी आपला सांस्कृतिक वारसा जपला आहे, परंतु सध्या आपण आपल्या संस्कृतीला कुंडाच्या दिशेने ढकलण्यास सुरुवात केली आहे, ही चिंतेची बाब आहे.
आजही अनेक संस्था आणि नागरिक विक्रम संवतचे स्वागत जग इंग्रजी नववर्षाचे स्वागत करतात त्याच पद्धतीने करतात. परंतु आपल्याच देशातील अनेक लोक आणि राजकीय पक्ष त्याच्या कार्याची प्रशंसा करण्याऐवजी टीका करतात, हा आपल्याच संस्कृतीवर हल्ला आहे. तुम्ही जरी इंग्रजी नववर्ष साजरे केले तरी तुमच्या मूळ संस्कृतीचा आदर करा आणि इंग्रजी नववर्ष जसे साजरे केले जाते त्याच पद्धतीने हिंदू नववर्ष किंवा विक्रम संवत साजरे करायाला काय हरकत आहे.
आजकाल मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात, त्यांना हिंदी नीट कसं वाचायचं आणि बोलायचं कळत नाही, मग त्यांना स्थानिक वर्षं आणि महिने कळतील अशी अपेक्षा करणं हे स्वप्नवतच आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीचा ऱ्हास होत आहे कारण आपण इंग्रजीला आपल्या प्रगतीचा मार्ग मानला आहे. अशा मुलांनाही फेसबुक, व्हॉट्सॲप आदी सोशल मीडियावरून त्यांच्या सण-उत्सवांची माहिती मिळवावी लागते.
आपण स्वतंत्र झालो आहोत, पण अधीनतेची गडद छाया पडद्यासारखी आपल्या डोक्यावर आहे. त्यामुळे आपल्या मूल्यांशी सुसंगत नसलेल्या मार्गाचा अवलंब करण्याचा आपला कल आहे. आता फक्त नवीन वर्ष घ्या. १ जानेवारीला इंग्रजी शैलीत साजरे होणारे नवीन वर्ष अजिबात नवीन वाटत नाही. याच्या नावाने केलेली करमणूक म्हणजे अश्लीलता आहे. आधुनिकतेच्या नावाखाली समाजातील उच्चभ्रू वर्ग सर्व काही करत आहे जे सुसंस्कृत आणि भारतीय समाजाला मान्य नाही. विसंगती अशी आहे की आपल्या समाजातील हेच लोक संस्कृती वाचवण्याच्या नावाखाली लांबलचक व्याख्याने देतात.
भारतीय दिनदर्शिकेनुसार साजरे होणाऱ्या सणांच्या मागे काही प्रेरणा असते. आपल्याला माहीत आहे की, हिंदीच्या शेवटच्या महिन्यातील फाल्गुन हा वर्षाचा शेवटही सूचित करतो आणि नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसापासूनच वातावरण प्रसन्न होऊन जाते. आपल्या ऋषी किती महान असतील ज्यांनी अशी कालगणना विकसित केली ज्यामध्ये काय आणि कसे घडेल याची संपूर्ण माहिती असेल.
आपल्या साम्राज्यवादी आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि देशाला राजकीयदृष्ट्या परावलंबी बनवण्यासाठी गेल्या दोन हजार वर्षात अनेक भारतीय आणि विदेशी राजांनी अनेक संवतांवर




राज्य केले, परंतु भारतीय राष्ट्राची सांस्कृतिक ओळख केवळ विक्रमी संवताशी निगडित राहिली. इंग्रजी शिक्षण आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आज सर्वत्र ख्रिश्चन युग प्रचलित असेल आणि भारतीय तारखा आणि महिन्यांच्या कालगणनाबाबत लोक अनभिज्ञ होत असतील, परंतु वास्तव हे आहे की देशातील सांस्कृतिक सण आणि राम आजही जन्माला येतात. कृष्ण, बुद्ध, महावीर, गुरु नानक इत्यादी महापुरुषांची जयंती भारतीय दिनदर्शिकेनुसार साजरी केली जाते, ख्रिश्चन दिनदर्शिकेनुसार नाही. लग्न-मुंडणाचा शुभ मुहूर्त असो किंवा श्राद्ध-तर्पण इत्यादी सामाजिक कार्यांचे विधी असोत, हे सर्व ख्रिश्चन दिनदर्शिकेच्या तारखांनुसार नव्हे तर भारतीय दिनदर्शिकेनुसार केले जातात. यानंतरही आपल्या समाजातील एक घटक हे सत्य स्वीकारण्यास सक्षम नाही. यामुळे आपणच सामाजिक नियमांचे उल्लंघन करत आहोत. त्यामुळे त्याचे दुष्परिणाम आपल्या समोर येत आहेत आणि समाजात अनेक प्रकारच्या विसंगतीही जन्माला येत आहेत, ज्या भारतीय जीवन तत्त्वज्ञानाला मान्य नाहीत.

# महाभियोगाची टांगती तलवार ?



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**प्रतिनिधी सभागृहाने प्रे. जो-बायडन यांच्या विरोधात महाभियोगाचा ठराव मान्य केला परंतु सेनेट मध्ये बहुमत नसल्यामुळे अंतिमत: तो यशस्वी होईल असे वाटत नाही. महाभियोगाची टांगती तलवार हे एक राजकारण आहे, स्टंट बाजी आहे असे सत्ताधारी पक्षाला वाटते परंतु निवडणीकीपूर्वी बायडन यांच्या पोटी संशयाचे धुके निर्माण करण्याचा रिपब्लिकन पक्षाचा यशस्वी प्रयत्न दिसतो. अमेरिकेचे अध्यक्ष हे जगातिल सर्व श्रेष्ठ अधिकारी असतात कारण तेथे अध्यक्षीय शासन प्रणाली आहे. अध्यक्षाकडे राज्य चालविण्याचा आणि शासन चालविण्याचा असे दोन्ही अधिकार केंद्रीत झालेले असतात.**

अध्यक्षपद सर्व श्रेष्ठ असले तरी ते निरंकुश नाही. जर अध्यक्षाने एखादी मोठी चूक केली असेल तर त्याला पदावरून काढून टाकण्याचा अधिकार अमेरिकेतील दोन सभागृहांना आहे. अमेरिकेच्या राज्य घटनेतील तरतुदीनुसार प्रतिनिधी सभागृहात साध्या बहुमताने महाभियोग चौकशीचा ठराव मांडता येतो, चौकशी करता येते परंतु सेनेट या वरच्या सभागृहात 2/3 बहुमतांनी हा ठराव मान्य व्हावा लागतो. डोनाल्डट्रंम्प यांच्या विरोधात दोन वेळा महाभियोग ठराव झाला. परंतु सेनेट मध्ये तो पराभूत झाला त्यामुळे ट्रंम्प सत्तेवर कायम राहिले. त्याची पुर्नरावृत्ती बायडन यांच्या बाबतीतही होण्याची शक्यता आहे.

**प्रतिनिधी गृहातील ठराव :** अमेरिकेमध्ये आतापर्यंत आठ अध्यक्षावर महाभियोग कारवाई चालविण्यात आली जो-बायडन हे त्यातील आठवे अध्यक्ष आहेत. या पार्श्वभूमीवर महाभियोग चौकशी काय आहे आणि अध्यक्ष बायडन यांचे भवितव्य काय? असा प्रश्न उभा राहतो. अमेरिकेतील संसदेचे स्वरूप वेगळे आहे. येथे दोन्ही सभागृहाला मिळून 'कॉग्रेस' असे म्हटले जाते. त्यापैकी खालच्या सभागृहला प्रतिनिध गृह (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटीझ) व वरच्या सभागृहाला सेनेट असे म्हटले जाते. प्रतिनिधी सभेच्या सभापतीनेअमेरिकन अध्यक्षा विरूद्ध महाभियोग चौकशीचा ठराव संमत केला. कारण अध्यक्ष डेमोक्रेटिक पक्षाचे आहेत तर प्रतिनिधी गृहामध्ये रिपब्लिकन पक्षाचे बहुमत आहे. राष्ट्राध्यक्षावर महाभियोग चौकशी करण्याचा अधिकृत ठराव मान्य झाला आहे. त्यामुळे चौकशीची चक्रे वेगाने फिरू लागलीत. मागिल बुधवारी प्रतिनिधी गृहातील खासदारांनी 221 विरूद्ध 212 असा चौकशीचा ठराव मान्य केला आणि त्यामुळे बायडन संकटात सापडले आहेत, असे सकृत दर्शनी वाटते. त्यांच्या डेमोक्रेटिक पक्षाच्या प्रत्येक खासदाराने ठरावाच्या विरोधात मतदान केले. प्रतिनिधी गृहाचे सभापती माईक जॉन्सन आणि त्यांच्या टीमला बायडन यांच्या कुटूंबातील सदस्यांच्या व्यावसायिक व्यवहाराची सुमारे वर्षभर चौकशी करण्यात आली. या चौकशीला त्यांना सामना करावा लागल्याने त्यास कायदेशिर रूप देण्यासाठी मतदान घेण्याचा निर्णय घेण्यात आला. ही सुनावनी बुधवारी घेण्यात आली कारण रविवार पासून शट् डाऊन सुरू होणार आहे. सत्ताधारी पक्षाला कोंडित पकडण्याचा हा रिपब्लिकन पक्षाचा डाव आहे. बायडन यांच्या विरूद्ध कोणताही सबळ पुरावा नाही, असे डेमोक्रेटिक पक्षाचे म्हणणे आहे. रिपब्लिकन पक्षाने बायडन यांच्यावरील महाभियोग चौकशीला मान्यता दिली कारण पुढील वर्षी होणाऱ्या अमेरिकेत अध्यक्षीय निवडणूकीचे पडघम वाजत आहे. रिपब्लिकन पक्षातील कट्टर पंथी गटाने अध्यक्षावर महाभियोग चालविण्यासाठी दबाव आणला असे म्हटले जात आहेबायडन यांचे सुपुत्र हंटर यांनी प्रतिनिधी सभागृहासमोर व्यक्तिशः साक्षीसाठी उपस्थित राहण्यास करण्यास नकार दिला. त्यामुळे या घटना क्रमानंतर काही तासांनी प्रतिनिधी गृहात मतदान घेण्यात आले. कारण हंटर यांनी बंद दाराआड साक्ष देण्यास नकार दिला.''आपण फक्त् सार्वजनिक पणे साक्ष देऊ'' असे त्यांनी सांगितले, कारण त्यांना अशी भिती वाटते की त्याचे शब्द व विचार चूकीचे चित्रीत केले जातील.

**महाभियोगाचे स्वरूप :** महाभियोग चौकशी ही एक पद्धतशीर प्रक्रिया असते. अध्यक्ष, न्यायाधीश, कॅबिनेट अधिकारी यांच्या सारख्या अधिकाऱ्यांनी केलेल्या चूकांचा तपास महाभियोगाद्वारे केला जातो. असा महाभियोग कसा चालवावा त्याची प्रक्रिया अमेरिकेच्या राज्य घटनेत नमूद केली आहे. कार्यकारी सत्तेवर अशा प्रकारे अमेरिकन संसदेचा म्हणजे कॉग्रेसचा सर्वात शक्तीशाली लगाम आहे. प्रतिनिधी गृहामध्ये झालेला ठराव हा संभाव्य महाभियोगाच्या दिशेने पहिले पाऊल आहे. एखाद्या अधिकाऱ्यांवर आरोप लावले जातात तेव्हा चौकशी होऊन दोन्ही सभागृच्या मान्यतेनंतर त्यांना पदच्यूत्त करता येते. पण सद्या अमेरिकन सेनेट म्हणजे वरच्या सभागृहात सत्ताधारी डेमोक्रेटिक पक्षाचे वर्चस्व आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि उच्च दर्जाचे नागरी अधिकारी यांना काढून टाकण्याचा पर्याय म्हणून राज्यघटनेनूसार त्यांना देशद्रोह, लाचखोरी किंवा इतर उच्च गुन्हे आणि दुषकृत्यासाठी चौकशी करून पदावरून काढले जाऊ शकते. या प्रक्रियेला (इंपीचमेंट) किंवा महाभियोग म्हणतात. प्रतिनिधी सभागृहाला अधिकाऱ्यावर महाभियोग चालविण्याचा अधिकार असला तरी एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवून पदावरून काढून टाकण्याची क्षमता फक्त सिनेट या वरच्या सभागृहाकडे असते. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंम्प यांच्यावर दोन वेळा महाभियोग चालविला होता परंतु तो सिनेटमध्ये ना मंजूर झाला, त्यामुळे ट्रंम्प यांच्यावर कारवाई होऊ शकली नाही. आतापर्यंत कोणत्याही राष्ट्रध्यक्षाला व्हाईट हाऊस मधून बाहेर काढण्यात आलेले नाही, परंतु महाभियोग चौकशीला सामोरे जाणारे जो-बायडन हे आठवे अध्यक्ष आहेत. त्यांच्यापूर्वी अँण्ड्रीयू जॉनसन, बिलक्लिंटन, आणि डोनाल्ड ट्रंम्प यांना निर्दोष ठरविण्यात आले. इतर राष्ट्राध्यक्षावरही महाभियोग



चालविण्यात आला होता, परंतु कोणावरही प्रत्यक्ष कारवाई झाली नाही.

**खिंडीत सापडले बायडन :** प्रतिनिधी सभागृहाने सप्टेंबर मध्ये महाभियोगाची चौकशी सुरू केली परंतु आता ही प्रक्रिया औपचारीक झाली आहे कारण सभागृहाने आता तसा ठराव मंजूर केला आहे. नोव्हेबर महिन्यात व्हाईट हाऊसच्या उच्च वकिलाने असे म्हटले होते की तपास बेकादेशिर आहे कारण सभागृहात ठराव झालेला नाही. परंतु आता बहुमताने ठराव मंजूर करून ही प्रक्रिया कादेशिर घटनात्मक बनविण्यात आली आहे. चौकशी सुरू करण्यासाठी ठरावाची आवश्यकता नाहीअसे रिपब्लिकन पक्षाला वाटत होते. आणि सभागृहाचे संचलन करणारे नियमही नाही, परंतु आधिच्या राष्ट्रपतींच्या महाभियोगादरम्यान अधिकृत ठराव मंजूर केले गेले. या वेळी ही परंपरा सभागृहाने पुढे चालू ठेवली आहे. अध्यक्षा विरूद्ध ठराव किती भक्कम पुराव्यावर आधारलेला आहे याला महत्व असते. त्यासाठी सभागृहात 40 हजार पानांचे पुरावे देण्यात आले, तसेच डँक रेकॉर्ड आणि साक्षीदाराकडून डझनभर काही तासांची साक्ष प्राप्त करण्यात आली. अध्यक्षांचे सुपुत्र हंटर यांच्या प्रमाणे न्याय विभागाच्या अनेक अधिकाऱ्यांचाही या चौकशी मध्ये समावेश आहे. सुमारे 1 हजार फाईलींच्या आधार घेण्यात आला, असेही म्हटले जाते. त्यानंतर पुराव्या बाबत साशंक असलेले काही रिपब्लिकन खासदार हे सुद्धा बायडन यांच्या विरोधात मतदान करण्यासाठी उत्सुक झाले. सभागृहाने केलेले मतदान हेबायडन यांची चौकशी सुरू ठेवण्यासाठी केलेले स्पष्ट मतदान आहे, त्यामुळे आता या चौकशीला गती लाभणार आहे.

**वादाच्या भोवऱ्यात बायडन :** सत्ताधारी डेमोक्रेटिक पक्षाचे असे मत आहे की, बायडन विरूद्ध पुरेसे पुरावे नाहीत. हे सारे आरोप म्हणजे गौड बंगाल आहे. ते आरोप बेजबाबदार व निराधार आहेत. एका डेमोक्रेटिक नेत्याने असे सांगितले की रिपब्लिकन पक्षाकडे शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण या सारखे कोणतेही विकासाचे कार्यक्रम नाहीत त्यामुळे पुढील निवडणूकीवर डोळा ठेवून अध्यक्षांच्या बदनामी करण्यासाठी ते आरोप करण्यात आले आहे. प्रे. बायडन व त्यांच्या कुटूंबार 2009 ते 17 या काळात बराक ओबामा अध्यक्ष असतांना ते उपाध्यक्ष होतेत्यावेळीपदाचा गैर वापर करून नफा कमविल्याचा आरोप केला आहे. आणि त्यांच्या मुलाच्या व्यावसायिक क्रियाकल्पांना अनुसरून हे आरोप करण्यात आले आहे. रिपब्लिकन पक्षातील कट्टर पंतीयांचा असा दावा आहे की, प्रे. बायडन व त्यांचे पुत्र हंटर यांनी युक्रेन आणि चीन मधील त्यांच्या व्यावसायिक व्यवहारामध्ये "ते-टु-प्ले" योजनामध्ये कुटूंबाच्या नावार व्यापार करत प्रभावीपणे पेडलिंगचाप्रभाव असल्याचा आरोप केला. अध्यक्ष महोदयांनी त्यासाठी आपल्या पदाचा दूरउपयोग केला असे त्यांचे मत आहे. यासाठी त्यांनी 2020 मधील एस.बी.आय. पुराव्याकडे लक्ष वेधले आहे. एका माहित गाराने असा दावा केला की, त्यामध्ये बुरीस्मा या युक्रेनच्या ऊर्जा कंपनीच्या प्रमुखाचा समावेश आहे. हंटर बायडन हे या कंपनीच्या संचालक मंडळावर आहेत. एका बायडनला पैसे देण्यासाठी 5 दशलक्ष खर्च आला आणि 5 दशलक्ष दुसऱ्या बायडनला द्यावे लागले. हे कथा कथित मत सूचक आहे. रिपब्लिकन नेत्यांच्या आरोपामध्ये असे म्हटले आहे की, युक्रेनच्या बुरीस्मा कंपनीची चौकशी थाबविण्यासाठी आपल्या एका वकिलाला काढून टाकण्यासाठी अध्यक्षाने दबाव आणला होता. हे किती खरे ते किती खोटे देवालाच माहित ! डेमोक्रेट नेत्यांनी असा पुर्नरचार केला आहे की, प्रे. ट्रंम्प अध्यक्ष असतांना या प्रकरणातील चौकशी केली पण हाताशी काही लागले नाही म्हणून आठ महिन्यात नंतर हे प्रकरण फाईल बंद करण्यात आले.

बुरीस्मा या कंपनीचे मायकोला इस्लो जेस्टी यांच्या मते, कंपनीतील कोणत्याही बड्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला नाही. तसेच थोरल्या बिडेन साहेबांनी पुत्राच्या फर्मला कोणतीही मदत केलेली नाही. अशी बायडन यांची बाजू डेमोक्रेट मोठ्या आवाजात मांडत आहे. अध्यक्षांचे पुत्र हंटर यांनी 13 डिसेंबर रोजी कॅपिटल इमारतीच्या बाहेर घेतलेल्या पत्रकार परिषदेत आपली बाजू दमदार पणे मांडली. हंटर बायडन यांचे एक सहकारी डेव्हॉन आर्चर यांनी जुलै महिन्यात प्रतिनिधी गृहाच्या चौकशी समितीला सांगितले की, थोरल्या बायडन साहेबांनी दहा वर्षात कदाचित वीस वेळा फोनवर बोलणे झाले असेल, परंतु त्यांना मुद्दाम गोवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांच्या बोलण्यात कोणताही व्यावसायिक हेतू नव्हता. अशा प्रकारे या सर्व प्रकरणामध्ये हंटर बायडन यांना अनेक कादेशिर कारवायांचा सामना करावा लागत आहे. हंटर बायडन यांना एका जूरीने कर गुन्हांसाठी दोषी ठरविले आहे तसेच 3 फेडरल गनचार्जसाठी दोषी नसल्याचे नमूद केले. त्याच्या वकिलाचे असे म्हणणे आहे की त्याने सर्व कर पूर्णपणे भरले आहेत. आपल्या पत्रकार परिषदेत हंटर यांनी असे नमूद केले की, वडिलांनी व्यसायात मदत केल्याच्या आरोपात काहीही तथ्य नाही. चौकशी समितीच्या सदस्यांनाही त्यांनी योग्य खुलासे केले आहेत.

**संभाव्य परिणाम :** मेरिकेचे अध्यक्ष जो- बायडन यांच्यावर प्रतिनिधी गृहाने चौकशीची कारवाई सुरू केली आहे. आता बायडन यांचे भवितव्य काय,असा प्रश्न विचारला जात आहे. खरे तर जोपर्यंत सेनेट मध्ये 2/3 बहुमताने ठराव मान्य होत नाही तोपर्यंत या आरोपाला अंतिम टप्पा गाठता येत नाही. विश्लेषक असे म्हणतात, बायडन यांना पदावरून दूर करण्याचा रिपब्लिकन पक्षाचा प्रयत्न अयशस्वी होईल कारण सेनेटवर त्यांना दोषी ठरविण्यासाठी मतदान करावे लागेल. सद्या सेनेट मध्ये डेमोक्रॅट चे वर्चस्व आहे. 51-49 असे पक्षीय बलाबल आहे. त्यामुळे 2/3 बहुमताने ठराव संमत होणे अश्यक आहे. पुढे होणाऱ्या आगामी 2024 च्या निवडणूकीत बायडन यांच्या विरूद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करून त्यांना बदनाम करण्याचा हा एक प्रयत्न आहे. अध्यक्ष बायडन पुन्हा निवडणूकीस उभे राहणार आहेत हे लक्षात घेऊन ही योजना करण्यात आली आहे. मागील सप्टेंबर पासून सभागृह महाभियोग चौकशीमध्ये गुंतलेले आहे. टॉम कोल यांच्या मते आजचा ठराव फक्त त्या चौकशीला औपचारिक मान्यता देतो. आणि चौकशी करण्याचा पूर्ण अधिकार सभागृहाला देतो. याचा अर्थ असा की, आता महाभियोग चौकशी अधीकृत झाली आहे. प्रे बायडन यांची प्रतिक्रिया बोलकी आहे, त्यांच्या मते अमेरिकन लोकांचे जीवन चांगले बनविण्यासाठी काहीही करण्याऐवजी विरोधी पक्ष माझ्यावर खोटे आरोप करण्यावर लक्ष केंद्रीत करत आहे. आवश्यक असलेल्या तातडीच्या कामावर आपले लक्ष करण्याऐवजी ते या निराधार राजकीय कथनावर वेळ वाया घालवित आहेत. यावरून बायडन यांचा आत्मविश्वास प्रकट होतो. आणि आपण निर्दोष असून सेनेट मध्ये 2/3 बहुमताने हा ठराव मान्य होणार नाही. **समारोप :**रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी अमेरिकेतील संसद म्हणजे कॉग्रेसच्या प्रतिनिधी सभागृहात महाभियोगाचा ठराव मंजूर केला आहे. परंतु सेनेट मध्ये 2/3 मताने हा ठराव मान्य झाल्याशिवाय महाभियोग पूर्ण होत नाही. पुरेसे बहुमत नसल्याने प्रे. जो. बायडन हे सुखरूप पणे बाहेर पडतील असे डेमोक्रॅटिक नेत्यांना वाटते. परंतु ऐन निवडणूकीच्या तोंडावर प्रे. बायडन यांच्या चौकशीचे नाट्य दीर्घकाळ चालू ठेवून पिता पुत्रांना बदनाम करण्याचा यशस्वी प्रयत्न विरोधी पक्षाने आरंभिला आहे. महाभियोगाचा दुसरा टप्पा जिंकने अवघड आहे, याची खात्री असूनही रिपब्लिकन पक्ष भविष्य काळात विविध डावपेच तयार करून रिपब्लिकन पक्ष जनमत आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करत आहेत. भविष्यात यश मिळणे कठिण आहे परंतु तर्तास महाभियोगाची टांगती तलवार कायम ठेवून बायडन यांच्या भोवती संशयाची धुके तयार करण्यात मात्र मुरब्बी रिपब्लिकन नेते यशस्वी ठरले आहेत, असे म्हणावे लागेल.

# चला नवीन वर्ष सेलिब्रेट करुया



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**डिसेंबर महिना सुरू झाला की सगळ्यांना वेध लागतात ते नवीन वर्षाचे. आणि मग जसजशी 31 डिसेंबर ही तारीख जवळ येऊ लागते तसतसं थर्टी फर्स्ट मनवणे आणि न्यू ईयर पार्टी सेलिब्रेट करणे याच्यासाठी सगळ्या गोष्टींची जुळवाजुळ सुरू होते . आणि मग सगळ्यांचे वेगवेगळे प्लॅन सुरू होतात. यात कोणी बाहेर जाण्यासाठी प्लॅन करतात, कोणी आपल्या घरीच सेलिब्रेट करायचं म्हणून तयारीला लागतात, फ्लॅट स्कीम मधले सगळे जण मिळून कुठेतरी बाहेर जायचं किंवा मग आपल्याच गच्चीवर सेलिब्रेट करायचं म्हणून तयारीला लागतात.**

तरुणाईच्या विचारांना तर झिंग च चढते. ती पण मी तयारीला लागतात न्यू ईयर सेलिब्रेशन ला त्यांची जुळवाजुळव असते . कुठे बसायचं ? कोणती घ्यायची ? कोणाला कापायचं ? काय काय खायचं ? असं सगळं आनंदी आनंद वातावरण असत. न्यू ईयर सेलिब्रेशन म्हटलं की सगळ्यात जास्त जोश असतो तो तरुणाईमध्ये .आणि ते सेलिब्रेट करण्याकडे त्यांचा सगळ्यात जास्त ओढा असतो कल असतो. त्यासाठी ते वाटेल ते करायला तयार असतात. आणि त्याच प्लॅनिंग तर दोन दोन महिने आधीपासून करायला लागतात. आणि हल्ली पार्ट्यांमध्ये ड्रिंक घेणे हे कॉमन झालेल आहे. त्यामुळे त्याची तजवीज करण्यासाठी मात्र बरीच खलबत होतात. कोणाला कोणती आवडते? कोणाला कोणती चढते? कशाने डोकं धरतं ? कोणती सॉफ्ट आहे? कोणती हार्ड आहे ? अशा सगळ्या गोष्टींवर बरंच चर्वितचर्वण होतं, आणि मग कुठे कॉमनली निर्णय घेतले जातात. त्यात आता लवकरच लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका असल्याने कोणत्या नेत्यांकडून कसं नि काय स्पॉन्सर करून घ्यायचं ? याचे सुद्धा नीट नियोजन केल्या जाते. शेवटी काय की कोणता झेंडा घेऊ हाती ? असं म्हणायचं तर हे सेलिब्रेशन मस्ट असतं .आणि म्हणून मग या न्यू ईयर सेलिब्रेशनची तयारी, त्याच स्पॉन्सरशिप सुद्धा लोकसभा विधानसभेचे इच्छुक उमेदवार आनंदाने करायला तयार असतात . शेवटी काय तर निवडणुकीमध्ये काम करण्यासाठी ,प्रचारासाठी, बुधवर बसण्यासाठी अशा विविध कामांसाठी ही मंडळी कामात येतच असतात. त्याची तजवीज सगळ्याच राजकीय पक्षांना आधीच करून ठेवावि लागते.

आणि म्हणून मग हे असेच सेलिब्रेशन सोहळे आपसूकच घडायला लागतात किंवा घडवून आणले जातात. तर दुसरीकडे काही लोक या न्यू ईयरची वाट पाहत असतात ते नवा संकल्प करण्यासाठी, नव्या गोष्टी सुरुवात करण्यासाठी किंवा एखादी नवीन वस्तू घरात आणण्यासाठी. मग त्यांचंही आपापल्या परीने प्लॅनिंग चालत असतं .एकंदरीत नवीन वर्षाची आस जवळजवळ सगळ्यांनाच लागलेली असते.

हे सगळं एका बाजूला चालत असतानाच आता मला असं वाटतं की यात एक वर्ग असाही आहे जो या न्यू ईयर सेलिब्रेशन ला अगदी सहज साधेपणाने घेतो त्याचा आपलं घर बर ,आपलं कुटुंब बरं आणि तो बरा.... असे कित्येक न्यू ईयर आले गेलेत . पण हा सेलिब्रेशन वगैरे प्रकार काही लोकांना अजिबात





आवडत नाही. आणि ते त्या दृष्टीने काही करतही नाहीत. पण अशांना मात्र आजकाल मूर्खात काढलं जातं. त्यांची टिंगल टवाळी केली जाते. त्यांना जुनाट विचारांचे म्हणून संबोधलं जातं .आणि आजच्या काळात हे सेलिब्रेशन कसे महत्त्वाचे आहेत यावर उपदेशाचे डोसही पाजले जातात. असा सगळा न्यू ईयरचा सोहळा असतो.

मला असं वाटतं की आता न्यू ईयर सेलिब्रेशन थोडंसं जरा बदलायला पण हवं .काही नवे संकल्प, काही नव्हे प्रयत्न, काही नवे प्रकार आपण आता नव्याने सुरू करायला हवं. हो कारण आता आम्ही मॉडर्न होत चाललोय ना म्हणून आता त्या दिशेनेही विचार करणं गरजेचं आहे.

पहा पटतंय का .चला आपण नवीन वर्ष जरा वेगळ्या पद्धतीने साजरा करू शकतो का याचा विचार करूया .

हा एक दिवस आपण आपल्या घरच्यांसाठी देऊ शकतो का? हा एक दिवस आपण आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यासाठी देऊ शकतो का? हा एक दिवस आपण आपल्या वार्डात असलेल्या काही धार्मिक स्थळांच्या स्वच्छतेसाठी वापरू शकतो का? हा एक दिवस आपण वृद्धाश्रमात देऊ शकतो का? हा एक दिवस आपण अनाथाश्रमात देऊ शकतो का? हा एक दिवस आपण जेलमध्ये असणाऱ्या कैद्यांसाठी देऊ शकतो का? ह्या एक दिवसाचे सगळे खाद्यपदार्थ आपण रस्त्यावर असलेल्या गरिबांना देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण आपल्याच परिसरात असलेल्या प्लास्टिकचा कचरा गोळा करण्यासाठी देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण आपल्या भागामध्ये स्वच्छतेसाठी येणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण फक्त आणि फक्त स्वतःसाठी देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण आपल्या राष्ट्रासाठी देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण फक्त आपल्या मुलाबाळांना देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण फक्त आपल्या आई वडिलांना देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण सर्व समाजमाध्यमांपासून दूर राहण्यासाठी देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण आपल्या जुन्या आठवणींमध्ये रमण्यासाठी देऊ शकतो का ? हा एक दिवस आपण आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींच्या सहवासात घालवू शकतो का ? हा एक दिवस आपण आपल्याला ज्यांनी घडवलं त्या आवडत्या शिक्षकांसोबत घालवू शकतो का ? शक्य असेल तर ह्या एक दिवसासाठी आपण आपल्या सगळ्या व्यसनांपासून दूर राहू शकतो का ?

या सगळ्या " का ? " वर विचार करा ,मंथन करा आणि मग ठरवा की आपण नवीन वर्षाचे स्वागत कसं करायचं ? निर्णय तुमचा आहे , विचार तुमचा आहे, आणि हे सेलिब्रेशननही तुमचंच आहे. तेव्हा ठरवणारेही तुम्हीच आहात. चला न्यू ईयर सेलिब्रेट करूया.. आपापल्या पद्धतीने....

# आभाळागत माया आम्हावरी....



सरते शेवटी वर्षात गोड,कटू अनुभव पचवत वर्ष घालवल..येणा-या नवीन वर्षाचे स्वागत करीत अशीच "आभाळागत माया" आम्हावरी सदैव रहावी ही मनोकामना राखणे गरजेचे आहे. यासाठी आधुनिक केसरी परिवारातील बाबुराव पाटील (भोकर) यांनी नववर्षाच्या सूर्योदयाचा टिपलेला खास फोटो वाचकांसाठी उपलब्ध करून दिला.

# माय-बाप स्मृती साहित्य पुरस्कार कवी नारायण खरात यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**अंबड :** सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्याच्या टेंभुर्णी येथील 'मायबाप स्मृती साहित्य पुरस्कार २०२२' अंबड येथील कवी नारायण खरात यांना त्यांच्या 'हेही दिवस जातील' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे. कवी नारायण खरात यांचे तीन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या 'सारे त्यांच्या कलाने' या कवितासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार मिळालेला आहे. मायबाप स्मृती साहित्य पुरस्कारासाठी एकूण १७८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यात बऱ्याच साहित्यकृती उत्कृष्ट दर्जाच्या आहेत. त्यातून ४ साहित्यकृती निवडण्यात आल्या, असे संयोजकांनी कळवले आहे.



# जनावरे चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जनावरे चोरून, ती खाटकांना विक्री करणाऱ्या टोळीचा हर्सल पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. चोरी करणाऱ्या पाचजणांना गजाआड केले असून, दोन खाटीक मात्र पसार झाले आहेत. अटकेतील आरोपींकडून एक बैल, कार, लोडिंग वाहन आणि दुचाकी जप्त केली आहे अशी माहिती पोलिस निरीक्षक प्रशांत पोतदार यांनी दिली. महादू लालमन राठोड (१८, शिवशंकर कॉलनी, फुलेनगर, हसूल), शेख सलमान शेख कैसर (१९, रा. यासिननगर, हर्मूल), अतुल तुकाराम दाभाडे (२२, रा. एकनाथनगर, पिसादेवी परिसर), प्रकाश पंडित राठोड (२१, रा. हरसिद्धी माता मंदिरामागे, हसूल), अशरफ उर्फ गुड्डू लतिफ शेख (२३, रा. फकिरवाडी, हसूल), अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. अरबाज कुरेशी आणि अकिल कुरेशी अशी खाटकांची नावे आहेत. ते पसार झाले आहेत. अधिक माहितीनुसार कोलठाणवाडी, शिवनेरी कॉलनी, हसूल येथील संदीप नंदकिशोर औताडे यांची बैलजोडी २२ डिसेंबर रोजी चोरीला गेली होती. या प्रकरणी हसूल ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यावरून विशेष शाखेचे उपनिरीक्षक कृष्णा घायाळ यांनी तपास सुरू केला. हसूलमधील महादू राठोड आणि शेख सलमान यांनी ही चोरी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली, त्यावरून त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यांनी गुन्ह्याची कबुली देत सांगितले, की फकीरवाडी येथून अतुल दाभाडेची कार (एमएच २०, एजी ८८९२) आणली. त्यात महादू राठोड, प्रकाश राठोड, सलमान, अशरफ, अतुल हे बसून गेले. त्यांनी जामा मशिद, नेहरूनगर येथून लोडिंग वाहन (क्र. एमएच ०१, बीआर १४२०) चोरून आणले. त्यात औताडे यांची बैलजोडी चोरून नारेगाव येथील खाटीक अरबाज आणि अकिल कुरेशी यांना विक्री केली. कुरेशींनी एका बैलाची कत्तल केली. दुसरा बैल त्याच्या दारातच बांधलेला होता. पोलिसांनी हा बैल ताब्यात घेतला. त्यानंतर गुन्ह्यात वापरलेली कार आणि लोडिंग वाहनही जप्त केले आहे.

या आरोपींनी पाच दिवसांपूर्वी जागीर कॉलनीतून एक दुचाकी चोरल्याचे समोर आली ती दुचाकी हरसुल पोलिसांनी जप्त केली ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रशांत पोद्दार उपनिरीक्षक कृष्ण घायाळ मारुती खिल्लारे सुनील चव्हाण डी टी गांगोडे राजू मोरे यांच्या सह सहाय्यक फौजदार फरकाडे दहिफळे यांच्या पथकाने केली





# महानुभाव आश्रमात श्री दत्तात्रय प्रभू जन्मोत्सव उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील श्री दत्त प्रसाद महानुभाव आश्रमात शनिवार (ता.३०)रोजी श्री दत्तात्रय प्रभू जन्मोत्सव उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी यांची व भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन आहेर यांची उपस्थिती होती. आरंभी ध्वजारोहण महंत भानुव्यास दादा अकृळणेकर यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक व कार्यक्रम संचलन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले ,या श्री दत्त प्रसाद महानुभाव आश्रमाच्या प्रमुख महंत श्रद्धाताई कपाटे यांनी तसेच भक्त नाना गायकवाड,कैलास ठोंबरे,नरेंद्र गायकवाड, चांगदेव गायकवाड, यांनी उपस्थितांचे स्वागत व पूजन केले, अतुल मुनी यांनी श्री दत्तात्रय प्रभू यांच्या बद्धल सविस्तर माहिती विशद केली,शिल्पा परदेशी,मोहन आहेर यांनी मनोगत व्यक्त केले, या प्रसंगी जि,प,चे माजी उपाध्यक्ष दिनकर बापू पवार, राष्ट्रवादी चे अध्यक्ष जालिंदर मोटे पाटील ,वैजापूर ग्रामीण चे सरपंच दौलत गायकवाड, भाऊसाहेब गलांडे,पोपट सोनवणे, भास्कर मतसागर,दिलीप जाधव सिन्नरकर व सिन्नर,राहता, येवला येथील व वैजापूर येथील भक्त भाविक पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी भक्त श्रद्धा कपाटे यांनी आभार मानले, मोहन आहेर यांनी या प्रसंगी आश्रम साठी वस्त्र दान केले,सर्वांना महाप्रसाद प्रदान करण्यात आला.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने सेवापूर्ती निमित्त निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील जिल्हा मध्यवर्ती सहकार बॅंकेच्या वतीने येथील मध्यवर्ती सहकार बॅंकचे कॅशीअर नामदेव चव्हाण यांचा सेवापूर्ती निमित्त निरोप समारंभ कार्यक्रम दि.३०/१२/२३ शनिवार रोजी छत्रपती संभाजीनगर येथे बॅंकेत मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.शनिवार सत्कार समारंभाचे आयोजन जिल्हा मध्यवर्ती सहकार बॅंकेच्या वतीने पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा मध्यवर्ती सहकार बॅंकेचे अध्यक्ष अर्जुन गाढे, उपाध्यक्ष किरण पाटील उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सत्कारमूर्ती नामदेव चव्हाण व पत्नी सावित्राबाई नामदेव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.आणि पुढील कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्षांच्या हस्ते सेवानिवृत्त कॅशीअर नामदेव मानसिंग चव्हाण व पत्नी सावित्रीबाईं यांचा यथोचित सत्कार करून पुष्पगुच्छ देऊन गौरव करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती नामदेव चव्हाण यांचा संचालक नितीन पाटील यांनी जीवन परिचय करून दिला तर संचालक प्रभाकर आबा काळे सोयगाव यांनी मनोगत व्यक्त करताना सेवानिवृत्ती सत्कार मूर्ती नामदेव चव्हाण यांच्या शिस्तबद्ध बॅंकेच्या कामकाज शैली, मितभाषी कामासाठी सदैव तत्पर असल्याबाबतचे अनुभव काळे यांनी सांगितले.तद्नतंर उपस्थित सर्व पाहुण्यांचे सत्कार करण्यात आला.



# तालुका उपाध्यक्षपदी सय्यद जहीरुद्दीन अफजलुद्दीन चिस्ती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय दलित पॅंथरची अत्यंत महत्त्वाची बैठक कार्याध्यक्ष बाबासाहेब बहादुरे यांच्या अध्यक्षतेखाली. या बैठकीमध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यकर्त्यांना तालुका अध्यक्ष रंजीत भाऊ वाहुळ यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करून आजही पॅंथरची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यासाठी कार्यकर्त्यांनी निस्वार्थपणे व जिद्दीने काम करून संघटनेची ताकद वाढवावी व गोरगरीब शोषित वंचितांना न्याय मिळवून द्यावा. असे आव्हान केले. यावेळी पॅंथरचे तालुका सचिव राहुल दांडगे, तालुका कार्याध्यक्ष बाबासाहेब बहादुरे मंगेश गुंजाळ शहराध्यक्ष फुलंब्री यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीमध्ये फुलंब्री तालुका उपाध्यक्ष सय्यद जहीरुद्दीन अफजलउद्दीन चिस्ती यांची एकमताने निवड करण्यात आली.

# गोरक्षकांच्या मदतीने सहा गोवंशांना जीवनदान

## धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** आद्य गोरक्षक श्री शिवछत्रपती गोरक्षका जन आंदोलन, धुळे विभागच्या गोरक्षकांनी गुरुवारी 28 डिसेंबर रोजी पहाटे दहिवेल गावापासून आनंदखेडे गावापर्यंत वाहनाचा सिनेस्टाईल पाठलाग करीत सहा गोवंशांचे प्राण वाचविले.

आद्य गोरक्षक श्री शिवछत्रपती गोरक्षक जन आंदोलन, धुळे विभाग चे गोरक्षकांना कत्तलीच्या इराद्याने एका पीकअप वाहनातून मालेगाव येथे चोरीचे गोवंश नेले जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. पहाटे तीन ते चार वाजेच्या सुमारास संशयित वाहन दहिवेल शिवाराकडे येताना दिसले. चालकास थांबण्याचा इशारा केला असता त्याने भरधाव वेगाने वाहन पळविण्यास सुरूवात केली. परिणामी, गोरक्षकांनी देखील त्याचा पाठलाग सुरू ठेवला. दरम्यान दहिवेल ते आनंदखेडे गावा दरम्यान पीकअप वाहनाचे मागील दोन्ही टायर पक्चर झाल्यावर देखील चालकाने वाहन पळविणे सुरूच ठेवले. अखेर त्यास आनंदखेडे शिवारातील पुलावर अडविण्यात गोरक्षकांना यश



आले. या ठिकाणी वाहनाची तपासणी केली असता वाहनात सहा गोवंश अत्यंत निर्दयतेने बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. चालकाकडे कुठलाही अधिकृत परवाना नव्हता. परिणामी, नेर पोलिसांना सदरची माहिती गोरक्षकांनी दिली. पोकॉ श्री. गहिवड व त्यांच्या सहकाऱ्यांनी पीकअप वाहनासह चालकास ताब्यात घेत गोवंशांची देऊर गोशाळेकडे रवानगी केली. याप्रकरणी दुपारी उशिरापर्यंत धुळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# उमरीच्या ग्रामस्थांना प्यावे लागते गटारीचे पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**


**उमरी :** गेले कित्येक दिवसापांसून उमरी येथील व्यंकटेशनगरमधील ग्रामस्थांना प्यावे लागत आहे. या दुषीत पाण्याविषयी गल्लीतील काही इस्मानांनी नगर पालिकेला अर्ज देऊन सुद्धा दुर्लक्ष होत आहे, हे समस्त गल्लीतील लोकांचे म्हणणे आहे. यावेळी विनोद मारोती लाडके, लालू राजना कस्तुरे, लक्ष्मण राजरपलू, साईनाथ गायकवाड, नंदकुमार दुधे, मानू राठोड, जोती लाडके, मीरा कस्तुरे, झुंझारे शोभाबाई, ढगे बनरसबाई, शोभाबाई यानगुडलवार यांनी मागणी केली की स्वच्छ पाणी यावे यासाठी अर्ज सादर केला.




# जळगाव येथील धनश्री जाधव यांची स्विमिंग क्रीडाप्रकारात तामिळनाडूसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथील राजीव जाधव हवालदार यांची मुलगी धनश्री राजीव जाधव व भरत दिलिप चौधरी यांची निवड झाली



असून २ ते ४ जानेवारी दरम्यान ते तामिळनाडू येथील एस.आर.एम.विद्यापीठ स्विमिंग स्पर्धेतसाठी निवड करण्यात आली आहे.मागील पंधरा दिवसांमध्ये खानदेशातील विविध शहरांमध्ये पार पडलेल्या विद्यापीठ स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड बिजनेस मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या विध्यार्थी खेळाडूंनी चमकदार कामगिरी करून नेत्रदीपक असे यश मिळवले. धुळे येथील निकम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निक महाविद्यालय या ठिकाणी १४ डिसेंबर रोजी पार पडलेल्या मुलांच्या मल्लखांब स्पर्धेमध्ये जी. एच. रायसोनी महाविद्यालयाचा विद्यार्थी सागर किशोर चौधरी याने विभागीय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून जयपूर, राजस्थान येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. तसेच आयएमआर महाविद्यालयात पार पडलेल्या (पुरुष गट) तलवारबाजी या क्रीडाप्रकारात जी. एच. रायसोनी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचा विध्यार्थी कुणाल विलास भावसार या विध्यार्थ्याची निवड झाली असून तो संभाजीनगर येथील एम.जी.एम.विद्यापीठ येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय तलवारबाजी या क्रीडाप्रकारात कबचौउमविचे प्रतिनिधित्व करणार आहे. तसेच एमबीए विभागातील कुणाल लक्ष्मीकांत जैन हिची महिला गटात तर चिरायू ज्ञानेश्वर बागुल याची पुरुष गटात व्हॉलीबॉल या क्रीडाप्रकारात निवड झाली असून येणाऱ्या काळात मध्यप्रदेश येथील महाराजा छत्रसल बुंदेलखंड विद्यापीठ व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धेत हे कबचौउमविचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेमध्ये मॅकेनिकल अभियांत्रिकी विभागातील राजरत्न मिलिंदकुमार गाढे व सिव्हील अभियांत्रिकी विभागातील सत्यजित मिलिंदकुमार गाढे या खेळाडूंची निवड झाली असून हे खेळाडू कुरुक्षेत्र येथील कुरुक्षेत्र विद्यापीठ येथे २ ते ७ जानेवारी २०२४ दरम्यान होणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. तसेच फुटबॉल या क्रीडाप्रकारात बीसीए विभागातील पंकज नारायण पाटील व एमबीए विभागातील अर्पित किशोर वानखेडे या विद्यार्थ्यांची निवड झाली असून ३१ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान एच.एस.एन.सी.विद्यापीठ मुंबई येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठ क्रीडास्पर्धेत हे विध्यार्थी कबचौउमविचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# मुजीब खान यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ औरंगाबाद ग्रामीण जिल्हा कार्यध्यक्षपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड शहरातील निवासी मुजीब (भाई) खान यांची नुकताच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ औरंगाबाद ग्रामीण जिल्हा कार्यध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे, मागील



10 वर्षा पासून मुजीब खान हे पत्रकार क्षेत्रात काम करीत आहे तसेच त्यांनी अनेक पत्रकार संघटने साठी करून विविध पद ही स्वीकारले आहे त्याच सोबत लेखनीच्या जोरावर अनेकांना न्याय मिळवण्या करिता निर्भिड पत्रकारीता ही केली आहे,पत्रकारिता क्षेत्रात ते नेहमी अग्रेसर असतात,त्याच श्री खान यांनी माहिती दिली की मि आगोदर ही विविध क्षेत्रात व पत्रकारीता क्षेत्रात संघटने साठी तळामळाने काम केलेले आहे, मी आपला महानगर, नवराष्ट्र,माझा मराठवाड़ा, या सारखे वर्तमान पत्रात काम केलेले आहे, अन्याय विरूद्ध लढुन सर्वसामान्य नागरिकां न्याय मिळून देण्यासाठी प्रयन्त केले आहेज़ तसेच आता सुद्धा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई या संघटने साठी माननीय संघटनेचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे सर,राज्य संघटनक संजय भोकरे यांचे विचार घेऊन पत्रकार बांधव यांचे विविध मुद्दे त्यांच्या अडचणी व त्यावर निवारण या वर काम करेल. व दिलेली जवाबदारी पूर्ण पने पार पाडेल निवड झाल्या बद्दल आधुनिक केसरी पत्रकार सय्यद आरेफ़,यांच्या सोबत परिसरातील पत्रकार बांधवांणी त्यांचे अभिनंदन केले.

पत्रकार मुजीब खान कन्नड अनेक वर्षांपासून सरकार आली, गेली आणि आता पण सरकार आहे.सर्वच सरकार फक्त आणि फक्त राज्यातील पत्रकारांना सोई सुविधा देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.या पलीकडे पुन्हा काहीच नाही.राज्यातील काही मोजक्याच पत्रकारांना सरकार थोड्या फार प्रमाणात सवलती देत आहे.मात्र तालुक्याच्या ठिकाणच्या आणि ग्रामीण भागातील पत्रकारांना आज पर्यंत तरी सरकारने घोर निराशाच केली आहे.

# विविध योजनेचे लाभ घेण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जिल्ह्यातल अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विविध योजनेचे लाभ घेण्याचे आवाहन विभागांकडून करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की शासनामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या योजना अंतर्गत नवीन विहीर (रु.250000), जुनी विहीर दुरुस्ती(रु.50000)जुनी विहीर असलेल्या शेतकऱ्यांना विद्युत जोडणी (रु.10000), पाईप खरेदीसाठी अनुदान (रु.30000), ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच या बाबी करिता अर्ज घेणे सुरू आहे याकरिता उपरोक्त बाबीचा लाभ घेण्यासाठी इच्छुक असलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर (MAHADBT.MAHARASHTRA.GOV.IN) ऑनलाईन अर्ज सादर करावेत तसेच अधिक माहितीसाठी कृषी अधिकारी पंचायत समिती / जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना ) कृषी विभाग जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्याशी संपर्क करावा असे अवाहन श्री प्रकाश पाटील, कृषी विकास अधिकारी,जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

# आबासो धायगुडे यांची भाजप सोशल मीडिया सहसंयोजकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** नुकतीच २८ डिसेंबर २०२३



रोजी भारतीय जनता पार्टी सातारा जिल्हा सोशल मीडिया कार्यकारीणी जाहीर करण्यात आलेली असून सहसंयोजक आणि सदस्य पदांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.या कार्यकारीणी मध्ये पाडळी ता.खंडाळा येथील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार आबासो धायगुडे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन सोशल मीडियाच्या सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम आणि सोशल मीडिया संयोजक रविंद्र लाहोटी यांनी आबासो धायगुडे यांची नियुक्ती केल्याबद्दल पाडळी सह पंचक्रोशीतून त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच खंडाळा तालुक्याचे युवा नेते ऋषिकेश अविनाश धायगुडे पाटील यांनी आबासो धायगुडे यांच्या सामाजिक कामाची दखल घेत त्यांनी पक्षाकडे शिफारस केली होती. या बद्दल आबासो धायगुडे यांनी सुद्धा ऋषिकेश अविनाश धायगुडे पाटील यांचे आभार मानलेले आहेत.भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून सोशल मिडियाचे मिळालेले सहसंयोजक पद हे प्रामाणिकपणे निभावणार आहे.जनतेची कामे करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असणार आहे.जनतेची कामे करण्याची संधी पक्षाने उपलब्ध करून दिल्याबद्दल आबासो धायगुडे यांनी जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम आणि सोशल मीडिया संयोजक रविंद्र लाहोटी यांचे आभार मानलेले आहेत. पत्रकार म्हणून आबासो धायगुडे हे गेली अनेक वर्षांपासून लोकांच्या समस्या मांडण्याचे काम करत आलेले आहेत. अनेक सामाजिक उपक्रमांना प्रकाश झोतात आणण्याचे काम करीत असतात. तसेच सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक कार्यक्रमाना हात भार लावत असतात. आजपर्यंत भारतीय जनता पार्टीशी एकनिष्ठेने राहून काम करणाऱ्या आबासो धायगुडे यांच्या कार्याची दखल घेऊन पदावर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल लोकांनी सुद्धा समाधान व्यक्त केलेले आहे. तसेच या निवडीबद्दल भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम,सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती आनंदराव शेळके पाटील,खंडाळा तालुका पंचायत समितीच्या उपसभापती वंदनाताई अविनाश धायगुडे पाटील, खंडाळा तालुका भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष अनिरुद्ध गाढवे, जिल्हा संयोजक रवींद्र लाहोटी,युवा नेते ऋषिकेश धायगुडे, मा. चेअरमन तात्यासाहेब धायगुडे, मा.सरपंच विश्वास धायगुडे(नांगरे पाटील ), मा.सरपंच हनुमंत धायगुडे, मा. सरपंच लक्ष्मण बरकडे, भानुदास गावडे गुरुजी, राहुल ठोंबरे, दीपक धायगुडे उपसरपंच, सचिन निकम, लक्ष्मण शेंडगे, सचिन धायगुडे (तात्या) नवनाथ धायगुडे, अशोक धायगुडे, अक्षय नांगरे पाटील, संतोष दुरगुडे, धनाजी माने, संतोष जाधव महाराज यांनी या निवडीबद्दल अभिनंदन केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# ISTE विद्याशाखा अधिवेशन छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील कांचनवाडीस्थित छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था संचलित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये ISTE (INTERNATIONAL SOCIETY FOR TECHNOLOGY IN EDUCATION.) वार्षिक विद्याशाखा अधिवेशन-२०२३ अंतर्गत राज्यस्तरीय ISTE पारितोषिक समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्ही. एम. मोहितकर (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई), प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. के. व्ही. काळे (कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे) हे होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणुन डॉ. प्रतापसिंह देसाई (अध्यक्ष, ISTE, नवी दिल्ली), डॉ. रणजित सावंत, (अध्यक्ष, ISTE, महाराष्ट्र-गोवा विभाग), डॉ. के. पी. कुंभार (सचिव, ISTE महाराष्ट्र गोवा विभाग), डॉ. उमेश नागदिवे (सह-संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर), डॉ. श्रीकांत देशमुख (प्रशासकीय अधिकारी, छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था) या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. व्ही. एम. मोहितकर यांनी विद्यार्थी व शिक्षक यांनी आपसात संवाद साधने गरजेचे असून नवीन पिढी घडविण्याचे जबाबदारी शिक्षकांनी व शिक्षण संस्थांनी यांनी घेणे आवश्यक आहे असे सांगितले. छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयाने तांत्रिक शिक्षणाच्या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून त्यांचा सर्वांगीण विकास केला. त्यांनी सीएसएमएसएस छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयाने मागील दहा वर्षात शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कुलगुरू प्रा. डॉ. के. व्ही. काळे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आपलं चारित्र्य जोपासले पाहिजे, तसेच येणारा काळ हा आव्हानात्मक असून विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण आणि कौशल्य घेणे अत्यावश्यक असून त्यांनी त्यावर भर द्यावा असे सांगितले. डॉ. प्रतापसिंह देसाई यांनी ISTE, नवी दिल्ली या संस्थेशी भारतातील अडीच हजारापेक्षा जास्त संस्था, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक लाखापेक्षा जास्त प्राध्यापक, अभियांत्रिकी शाखेचे लाखो विद्यार्थी जोडले गेले आहेत, अशी माहिती दिली.

सर्वांच्या उपस्थितीत छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ISTE विद्यार्थी शाखेचे उदघाट्न करून महाविद्यालयात शाखा स्थापन करण्यात आली. पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयास सर्वोत्तम नाविन्यपूर्ण प्रकल्प पुरस्कार प्राप्त झालेला आहे. या कार्यक्रमास विविध ३४ महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थेचे अध्यक्ष / सचिव आणि प्राध्यापक वृंद तसेच ५०० हुन अधिक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक,



सामाजिक, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्याच प्रमाणे नवीन्यपूर्ण संशोधन, उद्योजकता विकास, कॅम्पस प्लेसमेंट अशा विविध विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमामध्ये महत्वाचा केंद्रबिंदू म्हणजे छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयास सर्वोत्तम नाविन्यपूर्ण प्रकल्प पुरस्कार व महाविद्यालयातील ISTE विद्यार्थी शाखेच्या स्थापनेबद्दल छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, श्री. अशोक आहेर, श्री. संजय अंबादास पाटील, महाविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक यांनी सर्वांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. श्रीकांत होनाडे यांनी सूत्र संचालन डॉ. मनोज मते यांनी केले.

# घंटागाडी कंत्राटी कर्मचाऱ्यावर भ्याड हल्ला

## महापालिका कंत्राटी कर्मचाऱ्यांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे महानगरपालिकेत घंटागाडीवर कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत असणारा विकी मोरे व त्याच्यासोबत असणारा भैय्या बेडसे हे दोघं व्यक्तीवर धुळ्यातील फाशी पूल चौकात काही अज्ञात व्यक्तींकडून भ्याड हल्ला करण्यात आला आहे. यात दोघेही कर्मचारी गंभीरित्या जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल आहे. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरतात महानगरपालिकेत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी एकजूट दाखवत हल्ले खोरांचा निषेध व्यक्त करीत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा या संदर्भात शहर पोलीस ठाण्यात निवेदन दिल आहे. विकी मोरे, व त्याच्यासोबत काम करणारा कर्मचारी हे दोघे जण गाडी वजन करत असताना काही अज्ञात मुलांनी धारदार शस्त्राने वार करत मारहाण केली असल्याच कंत्राटी कर्मचारी विकी मोरे यांनी सांगितलं आहे.



या हल्ल्यात विकी मोरे हा गंभीरित्या जखमी झाला असून त्याच्या डोळ्यालाही मोठी दुखापत झाली आहे. तात्काळ शासकीय रुग्णालयामध्ये हलवण्यात आले तर या घटनेचा निषेध व्यक्त करीत या हल्ले खोरांवर गुन्हा दाखल करावा. अशी मागणी या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केली आहे. एकंदरीतच या घटनेमुळे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# ग्रामीण रुग्णालय उरण येथे गुणवत्ता आश्वासन (कायाकल्प) टीमची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** गुणवत्ता आश्वासन अंतर्गत सन २०२३ वर्षातील मूल्यांकन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय उरण जि.रायगड येथे डॉ. महेश कुमार माने (DTO) बीड,व डॉ.व्यंकटेश दुडे (DAKSHATA MENTOR NANDED)यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय उरणचे वैद्यकीय अधीक्षक बाबासो काळेल उपस्थित होते.राष्ट्रीय आरोग्य अभियान गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम अंतर्गत (कायाकलप) मूल्यांककरिता आलेल्या टीमने ग्रामीण रुग्णालय उरण येथे आल्यानंतर प्रथम दवाखान्यातील बाहेरील स्वच्छतेची पाहणी केली त्यानंतर दवाखान्यातील कार्यरत सर्व विभागात जाऊन पाहणी केली यात पुरुष कक्ष ,स्त्री कक्ष प्रसुतीत विभाग ,ओटी विभाग, एक्सरे विभाग ,डेंटल विभाग ,प्रयोगशाळा विभाग, कार्यालय, इंजेक्शन विभाग, ओपीडी विभाग, औषध विभाग,



औषध भंडार, आयसीटीसी विभाग ,टीबी विभाग वरील विभागात जाऊन टीमने संबंधित कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाची विचारणा करून व नोंदणीची पाहणी केली त्यानंतर डॉ. महेश कुमार माने व डॉ. व्यंकटेश दूडे यांनी डॉ. बाबासो काळेल वैद्यकीय अध्यक्षक यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले व तसेच इतर कर्मचाऱ्यांचे कौतुक करून टीम वर्कने काम करण्यास सांगितले . व त्यानंतर सुमन या योजनेविषयी माहिती दिली व या योजनेसाठी काम करण्यास सुचविले या मूल्यांकन मध्ये डॉ. मृणालिनी कदम वैद्यकीय अधिकारी,डॉ. प्रज्ञा भगत, डॉ.प्रियंका कोळी ,डॉ. स्वाती म्हात्रे ,डॉ.स्नेहल कोळी,वैद्यकीय अधिकारी संतोष झापकर दंतचिकित्सक महादेव पवार समुपदेशक श्रीमती हेमा म्हात्रे अधिपरीचरिका श्रीम.वावरे पी. च,एन, अलिबाग व ग्रामीण रूग्णालय उरण येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर